क्रमांक : १२३

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ / भाद्रपद ३०, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

१२३. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आल्या आहेत. एकूण प्रलंबित १४३ निवेदनांपैकी आता ४८ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २१ सप्टेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना क्र. २३२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री.सुनिल केदार, श्री. निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३२ खालीलप्रमाणे आहे :-**

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास वसई-विरार महानगरपालिकेने मौजे बोळींच म्हाडा ज वसाहत आरक्षण क्रमांक १६२ मध्ये क्रीडा संकुल व क्लब हाऊस विकसित करण्यासाठी मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदार कंपनीला काम देऊन नोव्हेंबर २०१७ मध्ये या कामाचे भूमिपूजन करण्यात येणे, परंतु गेल्या सहा वर्षांत ५० टक्के कामही पूर्ण झाले नसल्याची बाब उघडकीस येणे, मूळ निविदा रक्कम ४३ कोटी १० लाख ९४ हजार २६५ असतांना १२.४० टक्के वाढीव दराने ४८ कोटी ४५ लाख ४९ हजार ९५४ इतकी रक्कम वाढवून देण्यात येणे, टेंडर प्रक्रियेमध्ये जी रक्कम होती त्यामध्ये वाढ करताना मूळ अटी व शर्ती मध्ये काय बदल करण्यात आले याबद्दल जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, १२.४०% वाढीव रक्कम निविदा रकमेपेक्षा जास्त देण्याचा प्रस्ताव कोणत्या अधिकाऱ्यांने मंजूरी देणे, ठेकेदारांनी तशी मागणी मनपा प्रशासनाकडे केव्हा करणे, याबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेले प्रश्न, निविदेमध्ये व १२.४०% वाढीव रक्कम मंजूर करतांना हे काम १८ महिन्यात पूर्ण करण्याची अट घालण्यात येणे, परंतु १८ महिन्यांत काम पूर्ण न झाल्यास सदर ठेकेदाराला किती आर्थिक दंड आकारण्यात येणे, याबाबत कोणतीही स्पष्टता मनपाने केली नसल्याचे उघडकीस येणे, आतापर्यंत ठेकेदाराला देण्यात आलेल्या २१ कोटी २२ लाख ४८ हजार रुपयांचे काम ठेकेदाराने केले आहे किंवा नाही याचा तपास मनपाच्या अधिकाऱ्यांनी न करणे, आतापर्यंत मुदत संबंधित ठेकेदाराला चार वेळा मुदत वाढ देऊनही ५०% काम पूर्ण केले नसणे, या खर्चाच्या ५०% रक्कम मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी ठेकेदारांना देणे, मनपा अधिकारी हे शासनाची फसवणूक करीत असून जनतेच्या पैशाची चोट करीत असल्यामुळे वसई विरार महानगरपालिकेच्या अक्षम्य हलगर्जीपणाबद्दल निर्माण झालेली तीव्र चिड व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मंजूर विकास आराखड्यातील मौजे बोळींज येथील आरक्षण क्र.१६२ येथे प्ले ग्राऊंड विकसित करणेकरिता महानगरपालिकेच्या सभेच्या दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या प्रशासकीय व वित्तीय मंजूरीच्या अनुषंगाने रु.४३,१०,९४,२६५/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस (जी.एस.टी. अंतर्भूत करुन) तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

सदर कामाची ई-निविदा राबविण्यात आली असता लघुत्तम निविदाधारक मे. एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा देकार १४.४०% ने जादा प्राप्त झाला होता. उक्त निविदाधारकासोबत झालेल्या वाटाघाटी/चर्चेअंती निविदेचा दर २% कमी करून १२.४०% जादा दराने काम करण्याचे मान्य केले. त्यानुसार स्थायी समिती दिनांक १२.०१.२०१८ रोजीच्या मान्यते अन्वये मे. एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या १२.४०% जादा दरानुसार रु.४८,४५,४९,९४५/-

रक्कमेच्या निविदेस संविदा करण्यास मान्यता देण्यात आली असून दिनांक १९.०१.२०१८ च्या महानगरपालिकेच्या आदेशान्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. सदर कामाची मूळ मुदत १८ महिने होती.

तथापि, त्यानुसार ठेकेदाराने कामास सुरूवात केली असता सन २०१८ या वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ३००० मी.मी. पेक्षा अधिक पर्जन्यमानाच्या घटनेच्या व पुरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स इमारत व ॲथलॅटीक ट्रॅक भविष्यात पाण्याखाली जाऊ नये याकरिता खबरदारीची उपाययोजना म्हणून तसेच सरावासाठी खेळाडुंना जास्तीत जास्त जागा मिळावी ह्या करीता इमारतीच्या मुळ आराखड्यात आवश्यक ते बदल करून घेण्यात आले. सदर कार्यवाही प्रस्तावित करण्यास कालावधी लागल्यामुळे ठेकेदारास उपरोक्त कामाकरीता दिनांक १७.०९.२०२० पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.

तसेच माहे मार्च, २०२० नंतर देशात व संपूर्ण राज्यात कोरोनाची लाट उद्भवली. त्यामुळे आपत्ती नियंत्रण कायद्याअंतर्गत सदरील काम अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात आले होते. वरील परिस्थितीमुळे ठेकेदारास पुढील ९ महिने म्हणजेच दिनांक १६.०६.२०२१ पर्यंत व्दितीय व दि.३१.१२.२०२२ पर्यंत तृतीय मुदतवाढ देण्यांत आली. शासनाकडून लॉकडाऊनमध्ये शिथीलता दिल्यानंतर देखील कोविडमुळे मजूरांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्यामुळे व अन्य साहित्य वेळेत उपलब्ध होत नसल्याने कामाची गती योग्य राखण्यास अडचणी येत होत्या ही वस्तुस्थिती आहे. सदर प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी झालेला विलंब हा त्या-त्या वेळच्या आपत्कालीन परिस्थितीमुळे उद्भवला आहे.

दरम्यान उपरोक्त प्रकल्पांतर्गत ॲथलॅटीक ट्रॅक करिता उंची वाढविणेकामी मातीभरावाचे काम, RCC भुमीगत टाकीचे व इतर अनुषंगीक कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामाची भौतिक प्रगती ५०% असून संबंधित ठेकेदारास रु.२०.१८ कोटी इतके देयक (कामाच्या किंमतीच्या ४१.६५% रक्कम) अदा करण्यात आले असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच, सद्य:स्थितीत पावसाळा चालू असल्यामुळे मैदानावरील ॲथलॅटीक ट्रॅक व अनुषंगीक कामे पावसाळ्यानंतर जलदगतीने मार्च, २०२४ अखेरीस संपूर्ण काम पूर्ण करण्याचा मानस असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र. ३५८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री.सुनिल प्रभु, श्री.अबु आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३५८ खालीलप्रमाणे आहे :-**

"वसई-विरार महापालिकेत कर्मचारी काम करीत असल्याचे दाखवत बोगस कर्मचाऱ्यांच्या नावाचे वेतन हडप करणाऱ्या व विरार पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असलेल्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याऐवजी पुन्हाःपुन्हा कंत्राट देण्यात येत असल्याच्या धक्कादायक प्रकार दिनांक २३ जून, २०२३ रोजी निदर्शनास येणे, दिनेश संख्ये, तबस्सुम ए मेमन, झाकीर के.मेमन व रवि चव्हाण या ठेकेदारांतर्फे सदरहु महापालिकेला वकील, अभियंते, डॉक्टर, आरोग्य व अग्निशमन कर्मचारी, संगणक चालक, लिपिक, मजूर, सुरक्षा रक्षक, वाहनचालक पुरविण्यात येत असणे, महापालिका आयुक्त सदर कंत्राटदाराबरोबर आर्थिक संगनमत करुन, बोगस कर्मचारी दाखवून त्यांच्या नावाने पैसे उकळण्यात येत असणे, एवढेच नव्हे तर सदर ठेकेदारांमार्फत ज्या बोगस कर्मचाऱ्यांच्या नावाने वेतन निघत असणे ते त्या कर्मचाऱ्याला पालिकेत नोकरीचे आमिष दाखवून खात्यात जमा झालेले वेतन काढुन पुन्हा स्वतःच्या खिशात घालत असल्याचा प्रकार पालिकेमध्ये कंत्राटदारामार्फत करण्यात येत असणे, मात्र आता जे कंत्राटी कामगार अस्तित्वात आहेत त्यांच्या वेतनातील अर्धी रक्कम आणि सरकारचा करही या ठेकेदारांनी हडप केल्याची बाब उघड होणे, सदरहु कंत्राटदारांनी सन २०१२ ते २०१८ पर्यंत कंत्राटी कामगारांना अर्धा पगार देऊन त्यांच्या पगारातील ९२ कोटी रुपये आणि सरकारचे कर न भरता २९ कोटी रुपये असे मिळुन शासन तथा महापालिकेचा सुमारे १२२ कोटी रुपये निधी हडप करुन भ्रष्टाचार करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदरहु ठेकेदाराकडे ३ हजार २६५ हुन अधिक कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत असणे, नियमाप्रमाणे या कंत्रांटी कामगांराना किमान वेतन, कर्मचारी भविष्य निधी, भविष्यनिर्वाह निधी देणे आवश्यक असताना सदरहु कंत्राटदार कंत्राटी कामगारांना पूर्ण पगार न देता उर्वरित रक्कम स्वतःच्या हडप करीत असणे, सदरहु २५ भ्रष्ट ठेकेदारांवर विरार पोलिस ठाण्यात गून्हे दाखल असतानादेखील ठेकेदारांस मुदतवाढ देण्यात येणे, सन २०१९ मध्ये झालेल्या प्रशासकीय ठरावाची ढाल करीत या ठेकेदारांनी मुंबई उच्च न्यायालयातुन स्थगिती मिळविल्याचे कारण पुढे करुन नियमबाह्य मुदतवाढ मिळविणे, या ठेकेदारांना २०२० पासुन तत्कालीन आयुक्त गंगाधर डी.यांनी एकदा तर विद्यमान आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दोनदा अशी एकुण तीन वेळा या सर्व ठेकेदारांना मुदतवाढ देण्यात येणे, यामुळे गुन्हे दाखल असलेल्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याऐवजी आयुक्तांनी प्रोत्साहन देऊन पुन्हा ठेके वाटप केल्याची धक्कादायक बाब उघड होणे,सदर प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन गंभीर दखल घेऊन व चौकशी करुन व त्यातील दोषी ठेकेदार, अधिकारी यांचे विरुद्ध

कारवाई करण्याची आवश्यकता,याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार प्रभाग समिती कार्यालय निहाय प्रशासकीय तांत्रिक व विविध विकास कामांच्या सेवा देणे अंतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१५-१६ या कालावधीत महानगरपालिका ठराव दिनांक ०६.०६.२०१२ व दिनांक २१.०६.२०१४ अन्वये मनुष्यबळ पुरविण्याकरीता ठेकेदाराची नेमणूक करण्यात आली होती. तथापि, महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार संबंधित ठेकेदारांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पुरवठा केला आहे.

उपरोक्त कामाकरीता एकूण २५ ठेकेदारास सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ मध्ये महानगरपालिकेने अंदाजित रु. १४३.०१ कोटी ठेकेदारास अदा केले असून त्यापैकी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनापोटीची रक्कम १०८.१६ कोटी इतकी अदा करण्यात आली आहे. तसेच शासकीय वजावटीपोटी रुपये ३४.८५ कोटी इतकी रक्कम कंत्राटदारास अदा केली आहे. दरम्यान महानगरपालिका प्रशासनाने उक्त ठेकेदारांना पुरवठा केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन/ ईपीएफ/ शासकीय वजावटी कपात केलेल्या रकमा इत्यादींचे दस्ताऐवज सादर करण्याच्या वारंवार सूचना दिल्याचे नमूद केले आहे. सदर प्रकरणी संबंधित ठेकेदाराकडून महानगरपालिकेस कोणताही प्रतिसाद दिला नाही. दरम्यान श्री. मनोज पाटील या त्रयस्थ व्यक्तीने केलेल्या वैयक्तिक तक्रारी वरुन महानगरपालिकेच्या संबंधित ठेकेदारांविरुध्द विरार पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण आर्थिक गुन्हे शाखा, पालघर यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. त्याबाबतचा तपास सुरू आहे. उक्त प्रकरणी यापूर्वी विविध विधानमंडळ आयुधांद्वारे या विषयी मुद्दे उपस्थित झाले असून शासन स्तरावरुन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे. दरम्यान प्रस्तुत लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार उल्लेखित २५ ठेकेदारांपैकी २४ ठेकेदाराने प्रलंबित शासकीय कराचा भरणा केला असून उर्वरीत ठेकेदाराची रकमेची भरणा प्रक्रिया सुरु आहे. सन २०१७-१८ नंतर उल्लेखित २५ ठेकेदारांपैकी एकही ठेकेदार महानगरपालिकेच्या आस्थापना विभागात मनुष्यबळ पुरवठ्यामध्ये कार्यरत नसल्याचे महानगरपालिकेने नमूद केले आहे.

तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत कचरा संकलन, गटार सफाई, रस्ते सफाई इत्यादी कामासाठी महानगरपालिका ठराव दिनांक २०.०२.२०१७ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान केली असून या कामासाठी नियुक्त अभिकर्त्याचा त्रैवार्षिक ठेका आजतागायत सुरु आहे. सदरील कामांतर्गत निविदाकारांची मुदत दिनांक २८.०२.२०२१ रोजी संपुष्टात आल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे. तथापि, महानगरपालिकेने सदर कामांतर्गत विविध प्रशासकीय कारणांमुळे व मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेमुळे मंजूर निविदाकार यांना मुदतवाढ देण्यात आल्याचे व सदर प्रकरणी दाखल न्यायालयीन खटल्यामधील पुढील निर्देशानुसार उक्त कामाच्या निविदेबाबत पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

***

एच-११७५ -१अ.

लक्षवेधी सूचना क्र. ४५३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री.संजय केळकर, ॲड. आशिष शेलार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४५३ खालीलप्रमाणे आहे:-**

" प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व राजकीय दबावामुळे ठाणे महानगर पालिका हद्दीत दिवसेदिवस अनाधिकृत बांधकामे वाढत असून शहराचे विद्रपीकरण होत असणे. तथापि ठामपा **हद्दतील** दिवा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र.२९ व ३३ येथील शिवली नगर दोस्ती पाठीमागील डी.पी. रोड लगत, खान कंपाऊड शीळ आचार गल्ली, शीळ ठाकूर पाडा या परिसरात गेल्या दीड वर्षापासून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे सुरु असल्याची तक्रार केल्याने सदर तक्रारीची दखल घेऊन आयुक्तांनी दखल घेणे व तेथील सहाय्यक आयुक्त फारूक शेख यांच्यावर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी कारवाई करण्यात येणे. परंतु ठाणे शहरात उथळसर प्रभाग समिती राबोडी नं - १ व २ मधील झालेले अनधिकृत बांधकामे तसेच ठाणे मुख्य मार्केट, कोपीनेश्वर मंदिराच्या दुरुस्तीच्या नावाखाली केलेले वाढीव बांधकाम तसेच लक्ष्मीनारायण मंदिर मधील आनंदभारती मंदिराच्या समाधीच्या बाजूला दुकानाचे वाढीव बांधकाम याबाबत अतिक्रमण हटवण्याची मागणी होऊनही कारवाई न करणे. तसेच माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमध्ये ढोकाळी, दादलानी, बालकुम या परीसरात फुटपाथावर अनधिकृत गाळे व इमारतही बांधून शासकीय व महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होऊनही जबाबदार अधिका-यांवर कारवाई न होणे. तसेच अनधिकृत पाईप लाईन टाकणे, बार दुकानदा-यांकडून अनाधिकृत बांधकामे करण्यात येणे. परिणामी स्थानिक रहिवाश्यांना उपद्रव होणे. तसेच खोपट येथे विकास आराखड्याप्रमाणे बांधकाम न करता परवानगीपेक्षा अधिकचे बेकायदेशीर बांधकाम रामचंद्र टावर येथे बांधण्यात येणे. खोपट येथे परदेशी चाळ येथे परवानगी नसताना डबल रूमचे बेकायदेशीर बांधकाम करणे. तसेच जांभळीनाका, स्टेशन रोड, नागरी स्टोर, दत्त मंदिर, चेंदणी कोळीवाडा, अशोक टॉकिज परिसरात हातगाडी, फेरीवाले यांचे अतिक्रमणामुळे वर्दळीच्या रस्त्यावरील नागरिकांना उपद्रव होणे. या सर्व अतिक्रमणाबाबत, बेकायदेशीर बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे मे, २०२३ रोजी आयुक्तांसह सबंधित अधिका-यांशी पत्रव्यवहार करूनही जबाबदार अधिका-यांवर कोणतीच कारवाई न होणे. तथापि दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त श्री. शेख यांना तेथील अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई केली गेली त्याच नियमानुसार राबोडी, ढोकाळी, बाळकुम, जांभळीनाका, स्टेशन परिसरातील अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामांना जबाबदार धरून येथिल अतिक्रमण विभागातील जबाबदार अधिका-यांना निलंबित करण्याची मागणी होणे. परंतु वरिष्ठ अधिकारी व राजकीय नेत्याच्या पाठबळांमुळे संबंधित अधिका-यांना वाचवण्याचा प्रयत्न होणे. तथापि जे अधिकारी तक्रारी करूनही अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास टाळाटाळ करतात तेच अधिकारी पर्वग्रहदुषित व सूड बुद्धीने सामान्य नागरिकांच्या व छोट्या व्यवसायिकांच्या लहानसहान कामावर कारवाई करीत असल्याचे उघड होणे. परिणामी नागरीकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची उच्च स्तरावरील त्रयस्थ वरिष्ठ सनदी अधिका-यामार्फत

चौकशी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी करणे व त्यातील दोषींवर निलंबनासारखी तात्काळ कारवाई करण्याची देखील मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, उपायोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे रोखण्याच्या दृष्टीकोनातून शासन निर्णय दिनांक ०२.०३.२००९ मधील मार्गदर्शक सूचना अन्वये विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून याअंतर्गत प्रभाग कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर विनाविलंब कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार ठाणे महानगरपालिका प्रशासन शहराचे विद्रुपीकरण रोखणेकामी विविध उपाययोजना राबवित असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा प्रभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२९ व ३३ यामधील शिवली नगर, दोस्ती पाठीमागे, डिपी रोड लगत, खान कंपाऊंड शिळ, आचार गल्ली, शिळ ठाकूर पाडा व इतर क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येत आहे. तथापि, सदर क्षेत्रात अनधिकृत बांधकामांवर प्रभाविपणे कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आल्याने श्री. फारुख शेख, सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाई अंतर्गत त्यांना दि. १३ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. सध्या श्री. फारुख शेख यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.

उथळसर प्रभाग कार्यक्षेत्रामधील राबोडी नं.१ व २ या परिसरात एकूण ८ अनधिकृत बांधकामे असून त्यापैकी २ बांधकामे तळ + २ मजले पक्क्या स्वरुपाची व ६ बांधकामे निम्न पक्के स्वरुपाची असून ती दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी अशा स्वरुपाची आहेत. सदर बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमान्वये नोटीसा बजावण्यात आल्या असून यामधील अव्याप्त क्षेत्रांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

ठाणे मुख्य मार्केट येथे, कोपीनेश्वर मंदिर हे पुरातन मंदिर असून मंदिरालगत मंदिर संस्थांनाचे अनिवासी क्षेत्र असून सदरचे बांधकाम हे खूप पूर्वीचे व जूने आहे. सदर अनिवासी क्षेत्रात दुरुस्ती/अंतर्गत सजावटीचे काम सुरु असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे. नौपाडा प्रभाग कार्यक्षेत्रातील गोखले रोड येथील लक्ष्मीनारायण मंदिर असलेले बांधकाम जूने असून तांत्रिक अहवालासह संबंधित बांधकामधारकांनी सदरचे बांधकाम दुरुस्तीकरिता अर्ज सादर केलेला असून महानगरपालिकेने दिनांक ०२.०३.२०२० रोजी बांधकाम दुरुस्तीची परवानगी दिली आहे.

बाळकूम येथे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम असून सदर बांधकामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलमा अन्वये नोटीस बजावण्यात आली असून महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना व नियोजन अधिनियम, १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या बांधकामामध्ये भोगवटा रिक्त करण्याकरिता भोगवटादारांना नोटीसा बजावण्यात आल्या असून पोलीस यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे. तसेच ढोकाळी, बाळकूम येथील निम्न पक्के स्वरुपाचे बांधकाम असून नंदीबाबा मंदीर ते क्लेरीयंट कंपनी येथील रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या बांधकामधारकांनी ठाणे महानगरपालिकेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार उर्वरित जागेवर

बांधकाम दुरुस्त केलेले आहे. सदर बांधकामे ही बाधीतांनी त्यांचे उर्वरित क्षेत्रामध्ये रस्त्याच्या बाहेरील जागेत केल्याचे निर्दशनास येते.

ढोकाळी ते कोलशेत या रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत सहा वाणिज्य गाळेधारकांना शहर विकास विभागाच्या अभिप्रायानुसार नोटीस बजावण्यात आल्यानंतर सदरची बांधकामे शासकीय जागेवर असल्याचा मुद्दा संबंधितांनी उपस्थित केला होता. याअनुषंगाने सदरच्या बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कार्यवाही पूर्ण करुन निष्कासनाची कारवाई हाती घेण्यात येत आहे. बाळकूम दादलानी येथील अनिवासी गाळे/पत्रा शेड माहे जून, २०२२ च्या कारवाई दरम्यान पूर्णत: निष्कासीत करण्यात आलेले आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांच्या मागणीच्या अनुषंगाने आवश्यकता तपासून रितसर मान्यता घेऊन पाईपलाईन टाकण्यात येतात. उथळसर प्रभाग कार्यक्षेत्रातील नामदेववाडी येथे विकास प्रस्ताव क्र.२००१/११२ अंतर्गत रामचंद्र टॉवर नामक इमारत विकसित असून शहर विकास विभागामार्फत स्टील्ट पार्ट + ४ मजले करीता सन २००३ मध्ये वापर परवाना अदा करण्यात आलेला आहे. तथापि, मंजूरी व्यतिरिक्त बांधकामाकरीता आवश्यक ती कार्यपध्दती अवलंबून विहित कार्यपध्दतीनंतर निष्कासनाची कारवाई हाती घेण्यात येत आहे. उथळसर प्रभाग कार्यक्षेत्रातील परदेशी चाळ ही जूनी मालमत्ता असून सदर बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये निष्कासनाची कारवाई हाती घेण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील जांभळी नाका, स्टेशन परिसर व महापालिका अंतर्गतची इतर क्षेत्र हे हातगाडी/फेरीवाले मुक्त होणेकरिता महापालिका स्तरावरुन विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. उदा. दोन सत्रामध्ये अतिक्रमण विरोधी पथके तैनात करणे, अतिक्रमण विरोधी पथकाच्या संरक्षणार्थ अतिरिक्त पोलीस यंत्रणा उपलब्ध करुन देणे, हातगाडी/फेरीवाले निदर्शनास आल्यास त्यांचेकडील सर्व सामान जप्त करणे इत्यादी.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर प्रभावीपणे कारवाई होणेकरिता तसेच फेरीवाला/हातगाडी अतिक्रमण रोखण्याकरीता आयुक्तांच्या स्तरावर नियमित आढावा बैठक घेण्यात येऊन वेळोवेळी निर्देश देण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त अनधिकृत बांधकामे कोणत्याही क्षणी निष्कासित होऊ शकतात यामुळे अशा बांधकामामध्ये घरे न घेणेबाबत वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्धी देऊन नागरिकांना आवाहन करण्यात येते.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, हातगाडी/ फेरीवाले यावर प्रभावीपणे कारवाई होणेकरिता ठाणे महानगरपालिका प्रशासनामार्फत उपरोक्त दक्षता/उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे याबाबत नियमोचित कार्यवाही करण्याबाबत शासनाने वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेस निर्देश दिले आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक ४५४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ४५४ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई वर्सोवा येथील जेव्हीएलआर मार्गावरील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल हा एस.व्ही. रोड ते इन्फिनिटी मॉल, लिंक रोड पर्यंतचा विस्तारित ब्रीज व रस्ता हा गेल्या अनेक, वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे वर्सोवा विभागात क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर ट्रॅफिक चा प्रश्न निर्माण झाला असणे, सदर ट्रैफिक चा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे बीज लिंक रोड पर्यंत विस्तारित करणे अत्यंत येणे गरजेचे असून सध्या याच मार्गावरून मेट्रोचे कामदेखील सुरु असणे व हा ब्रीज बनवण्याकरिता मुंबई महानगर पालिकेतर्फे एमएमआरडीए ला ३८४.५० कोटी रुपये (एकूण ७६८.८५ कोटी पैकी रकमेच्या ५० टक्के निधी) फंड देखील वर्ग करण्यात आलेला असणे परंतु अदयापपर्यंत सदर ब्रीज चे काम सुरु झालेले नसणे, तरी या ब्रीज चे काम त्वरित सुरु करण्याबाबत तसेच सोबत रस्ता देखील बनवण्यात येण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

वर्सोवा, मुंबई येथील जोगेश्वरी-विक्रोळी लिंक मार्गावर जोगेश्वरी रेल्वे मार्गावरुन जाण्याकरीता ०.९४ कि.मी. लांबीच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुर्ण करुन माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वाहतूकीस खुला करण्यात आला आहे. याच मार्गालगत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो मार्ग क्रमांक ६ (स्वामी समर्थ नगर - विक्रोळी) या मार्गाचे नियोजन करण्यात आले. मेट्रो मार्ग क्र ६ चे रेखांकन अस्तित्वात असलेल्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मार्गालगत येत असल्याने सदरहू उड्डाणपूल व मेट्रो प्रकल्प यामध्ये सुसुत्रीकरण राहण्यासाठी या मार्गावर दुमजली उड्डाणपूलाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे इन्फिनिटी मॉल ते महाकाली केव्हज या ५.०७ कि.मी हा मार्गापैकी २.५८ कि.मी. लांबीचा मार्ग दुमजली उड्डाणपुलाने (वरती मेट्रो, खाली उड्डाणपुल व त्या खाली रस्ता ) जोडण्याचा निर्णय घेतला. सद्यस्थितीत इन्फिनिटी मॉल ते मिल्लत स्कुल(१.१ कि.मी. लांबी) व महाकाली केव्हज ते पश्चिम द्रुतगती मार्ग (१.४८ कि.मी लांबी) पर्यंत या दोन टप्प्यामध्ये दुमजली उड्डाणपुलाचे काम सुरु असून सध्यस्थितीत ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. सदरहू डबल डेकर उड्डाणपुलाची प्रकल्प किमंत रु ३०४.६० कोटी इतकी असून आतापर्यंत अंदाजे रु २०० कोटी खर्च झाला आहे. दुमजली उड्डाणपुल व मिसिंग लिंकच्या कामाची एकूण प्रकल्प किंमत रु ७६९ कोटी इतकी आहे. त्यापैकी रु ३८४.५० कोटी निधीच्या आपल्या सहभागाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्राधिकरणाकडे वर्ग केलेली आहे.

महाकाली केव्हज ते इन्फिनिटी मॉल असा एकूण ५.०७ कि.मी लांबीचा सलग उड्डाणपुल मार्ग उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणामार्फत बांधकाम सुरु असलेले दुमजली उड्डाणपुल (एकूण लांबी २.५८कि.मी.) व अस्तित्वात असलेला हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल (लांबी ०.९४ कि.मी) या दरम्यान येत असलेल्या, (१) न्यु लिंक रोड ते डबल डेकर उड्डाणपुलाची सुरवात (रॅम्प), (२) वीर देसाई रोड ते डबल डेकर उड्डाणपुलाचा रॅम्प, (३) मिल्लत स्कुल येथील डबल डेकर उड्डाणपुलाचा शेवट ते

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल (पूर्व बाजू), (४) हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल (पश्चिम बाजू) ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडील डबल डेकर उड्डाणपुलाची सुरवात आणि (५) डबल डेकर उड्डाणपुलाचा शेवट ते पुनम नगर, महाकाली केव्हज अश्या एकूण १.५७ कि.मी लांबीच्या ५ मिसिंग लिंकचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यासाठी प्राधिकरणामार्फत निविदा प्रसिध्द करण्यात आली असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर मिसिंग लिंक या बांधकाम कालावधी ३० महिने आहे.

तसेच, इन्फिनिटी मॉल ते मिल्लत स्कूल दरम्यान मेट्रो मार्ग-६ च्या लगतच्या रस्त्याचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. सदर, ROW मधील झोपड्यांच्या निष्कासनाची कार्यवाही सुरु आहे. सदरहू रस्त्याचे साधारण ३०% काम पूर्ण झाले आहे. सदर कामासाठी आवश्यक जमिनी अधिग्रहण प्रक्रिया व झोपड्यांच्या निष्कासनाची कार्यवाही बृहन्मुंबई महापालिकेद्वारे प्रगतीपथावर आहे.

सद्यस्थितीत काम सुरु असलेल्या मेट्रो मार्ग क्र ६ व दुमजली उड्डाणपुलाच्या जोडणी कामामुळे या भागात काही प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. सदरहू वाहतूक कोंडीवर आवश्यक त्या उपाययोजना प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. सदरहू उड्डाण पुल व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर वर्सोवा विभागातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटविण्यासाठी सहायभूत ठरणार आहे.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री. रवींद्र धंगेकर, श्री. संजय जगताप, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. विजय वडेट्टीवार, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संग्राम थोपटे, श्री. सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. कुणाल पाटील, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. विश्वजित कदम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.४६१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे शहरातील अंबिल ओढा कॉलनी, सानेगुरुजीनगर मनपा वसाहतीमध्ये १२ जुलै १९६२ रोजी पुर आल्यानंतर चाळ क्र. १ ते ६ पुरग्रस्त चाळीमध्ये महानगरपालिकेत सेवक म्हणुन कार्यरत असलेल्यांचे १२० कुटुंबे हे राहत असणे, गेली ६० वर्षे हे पुरग्रस्त १० फुट बाय १२ फुट पत्र्यांच्या खोल्यांमध्ये राहत असून, मनपाच्या पुरग्रस्त खोल्यातून राहणाऱ्या सेवकांना या खोल्या कायम स्वरुपात मालकी हक्कांच्या करण्यात आल्याचा ठराव मनपाच्या सर्वसाधारण सभेत (सर्वानुमते) काही वर्षांपूर्वी मंजूर झालेला असणे, त्या अन्वये या चाळीतील सेवानिवृत्त झालेल्या सेवकांना बिगर मनपा या हेडखाली या खोल्या ९९ वर्षांच्या करारावर दिल्या असून, पण करारामध्ये बऱ्याच अटी या पुरग्रस्तांकडून घेतल्या असल्याने गेल्या ६० वर्षापासून वास्तव्य करीत असलेलया पुणे मनपाच्या सेवकांना मालकी हक्काची घरे मिळण्यास अनेक अडचणी निर्माण झाल्यामुळे तेथील १२० कुटूंबातील नागरीकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, इतर पुरग्रस्तांना ज्या सोई सुविधा उपलब्ध झाल्या त्या येथील पुरग्रस्तांना मिळाल्या नसणे, सन १९८९ ते आतापर्यंत अनेक निवेदने या पूरग्रस्तांनी मनपा आयुक्तांना दिलेले असणे, परंतु त्यावर आजमितीस पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, गेली ६० वर्षे पासून या पूरग्रस्तांवर अन्याय झालेला असणे, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन अनेक वर्षे हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या मनपा सेवकांना कायमस्वरुपी मालकी हक्काची घरे देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.."""

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेच्या आंबिल ओढा कॉलनी, सानेगुरूजी नगर वसाहतीमध्ये महानगरपालिका सेवकांना आरएफक्यू तत्वावर ३३९ खोल्या वाटप करण्यात आल्या आहेत. महानगरपालिका सेवकांच्या वेतनातून दरमहा देय असलेले संपूर्ण भाडे निवासी वापरापोटी कपात केली जाते. तसेच बैठी चाळ क्र.१ ते ६ मध्ये पूरग्रस्तबाधित कुटूंबाना एकूण १२० सदनिकांचे वाटप करण्यात आलेले आहे. पूरग्रस्त सदनिका धारकांकडून अतिशय अल्प स्वरूपाचे (एका सदनिकेचे प्रतिवर्षी भाडे रू.२४०/- + पाणीपट्टी रू.१२०) घरभाडे प्रतिवर्षाकरीता आकारले जाते.

महानगरपालिका सेवकांची सेवासमाप्त झाल्यानंतर निवासी राहण्यासाठी वाटप करण्यात आलेली सदनिका पुन्हा झोपडपट्टी निर्मूलन पुनर्वसन विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून ताब्यात घेऊन अन्य सेवकांना नियमानुसार वाटपत करण्यात येते. सदरच्या खोल्या महानगरपालिका सेवकांच्या नावे कायम मालकी हक्काने

दिल्या जात नाहीत. तथापि, पूरग्रस्त, ग.व.नि. बाधित, रस्ता रूंदीकरण अश्या प्रकल्पबाधित सदनिका वारसांच्या नावे वेळोवेळी हस्तांतरीत/वर्गीकरण केल्या जातात. या सदनिका महानगरपालिकेकडून ताब्यात घेतल्या जात नाहीत.

सदरच्या सदनिकांच्या मूलभूत सुविधाकरीता महानगरपालिकेकडून मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. मात्र या सर्व सदनिका जुन्या व जीर्ण झालेल्या असल्याने निवासी राहण्यास धोकादायक ठरल्यामुळे भवन विभागामार्फत निविदाप्रक्रिया राबवून नव्याने बांधकाम करण्याचे काम चालू असून या कामाचे पूर्वगणनपत्रक रू.१७,२२,६५,६११.७२ नुसार पहिल्या टप्यात १५२ सदनिका बांधण्याचे काम प्रगती पथावर आहे. उर्वरित टप्प्यात सानेगुरूजी वसाहतीमध्ये सर्व सदनिकांचे नव्याने बांधकाम होऊन सर्व महानगरपालिका सेवक व पूरग्रस्तांना उपलब्ध तरतूदीनुसार टप्प्याटप्प्याने निवासस्थाने बांधून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

महानगरपालिका सेवकांना आणि सेवानिवृत्त सेवकांना कायमस्वरूपी मालकी हक्काची घरे देता येणार नसल्याचे तसेच पूरग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या सदनिका या कायमस्वरूपी मालकी हक्काने देण्याबाबत धोरणात्मक निर्णय नाही.

*****

**लक्षवेधी सूचना** ४६५.

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री.रवींद्र धंगेकर, श्री.संजय जगताप, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.अमीन पटेल श्री.अस्लम शेख, श्री.विजय वडेट्टीवार, प्रा.वर्षा एकनाथ गायकवाड, श्री.संग्राम थोपटे, श्री.सुनिल केदार, ॲड.यशोमती ठाकूर(सोनावणे),श्री.बळवंत वानखडे, श्री.कुणाल पाटील, कुमारी प्रणिती शिंदे, श्री.विश्वजित कदम,ॲड. राहूल कुल विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे महापालिकेकडून पुणे शहरात जुन्या वितरण व्यवस्थेव्दारे पाणी पुरवठा केला जात असून गळतीमुळे दररोज सुमारे ८ कोटी २० लाख लिटर पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास येणे, गेल्या २ दशकापासून पुणे शहराचा विस्तार वेगाने झालेला असुन शहराच्या बहुतांश भागात ३० ते ४० वर्ष जुन्या जलवाहिन्यांमधुन पाणी पुरवठा केला जात असणे, पुणे महापालिकेने पाणी गळतीचे प्रमाण समजण्यासाठी फ्लो मीटर बसवले असले तरी अनेक जलवाहिन्या जुन्या असल्याने त्या जमिनीखाली खाली खोलवर असल्याने त्यावर अनेक सेवा वाहिनींचे जाळे पसरलेले असणे, सरसकट सगळीकडे जलवाहिनी तपासणी करणे शक्य नसल्याने नेमकी गळतीची जागा शोधण्याचे पालिके समोर मोठे आवाहन असणे, त्यामुळे पुणे शहरात अनेक भागात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने पाणी समस्येमुळे झोपडपट्टी व नागरी भागात तंटे, बखेडे होत असल्याने परिणामी नागरीकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, यासाठी पुणे शहरातील पाणी गळतीचे समस्या सोडविण्यासाठी महापालिकेला भरीव निधीची तरतूद करणे आवश्यक असून या बाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया.""

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पुणे शहरामधील वितरण व्यवस्था ३० ते ४० वर्षे जुनी आहे व त्यामध्ये सुमारे ३५% पाण्याची गळती होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

पुणे शहरासाठी समान पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेण्यात आला असून या प्रकल्पाच्या रू.२८१८.४६ कोटी खर्चास पुणे महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.६०, दि.२२.०५.२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. पुणे शहरातील पाण्याची ३५ % ते ४०% गळती कमी करून ती २०% पर्यंत आणणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

या प्रकल्पांतर्गत प्रामुख्याने आवश्यकतेनुसार पाण्याच्या टाक्या बांधणे, भूमिगत पाण्याच्या लाईनची तपासणी करून आवश्यकतेनुसार जुन्या लाईन बदलणे व हायड्रोलिक डिझाईननुसार नवीन पाण्याच्या लाईन टाकणे, अे.एम.आर. मिटर बसविणे, पाण्याच्या टाक्यांमध्ये जाणाऱ्या व वितरण लाईनवर इलेक्ट्रॉमॅगनेटिक मीटर बसविणे, प्रेशर सेन्सर बसविणे, स्काडा व ॲटोमेशन करणे, इत्यादी कामे करण्यात येणार आहेत.

सदर प्रकल्पांतर्गत शहराचे विविध भागामध्ये सोडण्यात येणारे पाणी व नागरीकांपर्यंत पोहोचणारे पाणी यांचे मोजमाप करून पाण्याचे लेखा परीक्षण करण्यात येणार आहे व त्यानुसार ज्या भागामध्ये गळती होत आहे त्या भागामध्ये गळती शोधण्याचे कामे सुरू आहेत. सदर प्रकल्पाचा आज अखेर रू.११६८.६३ कोटी खर्च झाला आहे.

सदर प्रकल्पीय कामे पुणे शहराच्या जुन्या हद्दीमध्ये (३४ गावे वगळून) सुरू असून सुमारे ६०% कामे पूर्ण झालेली आहेत.

पुणे शहराच्या जुन्या हद्दींसाठी प्रकल्प खर्चासाठी रू.२०० कोटी रकमेचे कर्ज रोखे उभारण्यात आलेले असून अमृत योजना, स्मार्ट अभियान व १५ वा वित्त आयोग अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाकडून रू.२६८.३७ कोटी निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री.सुनिल टिंगरे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-**

"पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनधिकृत होर्डिंग लावणे, किवळे, पिंपरी भागामध्ये अनधिकृत होर्डिंग पडल्यामुळे पाच जणांचा मृत्यू होणे, मृत्यू झालेल्यांच्या नातेवाईकांनी या संदर्भात आंदोलन करणे, आजतागायत होर्डिंग मालक तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर्मचारी यांच्यावर कार्यवाही न होणे, तसेच पुणे शहरात चांदणी चौक, वाघोली, नगर रोड, येरवडा याभागात हजारोंच्या वरती अनधिकृत होर्डिंग असणे, होर्डिंग लावतांना कर्मचारी व होर्डिंग मालक यांचे लागेबांधे असणे, होर्डिंग लावताना त्या जागेचे स्ट्रक्चरल ऑडिट आवश्यक असणे, गेल्या एका वर्षात पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये शेकडो नागरिक होर्डिंग पडून जखमी होणे, सदर वरील बाब गंभीर असणे, सदर घडलेल्या प्रकारामुळे सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून, या संदर्भात शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मौजे किवळे येथे दि.१७/०४/२०२३ रोजी सायंकाळी ५ वाजणेच्या दरम्यान अचानक मान्सुनपुर्व वादळवारे व पाऊस चालु झाल्याने तेथुन पायी जाणारे वाटसरु दुर्घटनाग्रस्त फलकाच्या जवळ असलेल्या शार्वी हॉटेलच्या शेडखाली आडोश्याला थांबले होते. दरम्यान जोराचे वादळीवारे व अवकाळी पाऊस यामुळे मौजे किवळे, बेंगलोर-मुंबई किवळे ओव्हर ब्रिज जवळ, सर्व्हिस रोडलगत शार्वी हॉटेलचे जवळचा जाहिरात फलक पडुन सदरची दुर्घटना घडली आहे. यामध्ये ५ व्यक्तिंना जिव गमवावा लागला असून ३ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत.

या दुर्घटनेस जबाबदार असलेले जागामालक श्री.नामदेव बारकु म्हसगुडे, होर्डिंग मालक श्री.दत्ता गुलाब तरस, होर्डीग भाड्याने घेणारे श्री.महेश तानाजी गाडे आणि जाहिरात करणारी कंपनी यांच्या विरोधात रावेत पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर.क्र.०१८५ दि.१८.०४.२०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आकाशचिन्ह व परवाना विभागातील सर्व परवाना निरीक्षकांच्या अन्यत्र बदल्या करून नवीन परवाना निरीक्षकांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

सदर घटनेतील मयतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन प्रत्येकी रूपये ३ लाख आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. तसेच जखमींना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मोफत उपचार करण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व होर्डीग्जचे स्टक्टरल प्रमाणपत्र नव्याने घेण्यात आलेले असल्याचे व दि.०९ मे २०२२ च्या जाहिरात नियमावलीचे पालन महानगरपालिकेडून करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत होर्डींग निष्कासित करण्याच्या दृष्टीने ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.०१/०४/२०२३ ते आजअखेर एकुण १६८ होर्डीग्ज निष्कासीत करण्यात आलेले आहेत.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एकूण २४८५ अधिकृत जाहिरात फलक आहेत. दि.०१.०४.२०२२ पासून दि.२१.०७.२०२३ अखेर एकूण १३६८ अनधिकृत जाहिरात फलकांवर (होर्डिंग) निष्कासन कारवाई करण्यात आलेली आहे.

पुणे महानगरपालिकेकडील १५ क्षेत्रिय कार्यालयनिहाय अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, झेंडे इत्यादींवर दैनंदिन स्वरूपात निष्कासन कारवाई पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. वाघोली, नगररोड, येरवडा या भागात १ एप्रिल, २०२३ पासून २१३ अनधिकृत होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच चांदणी चौक या भागात १५ अनधिकृत होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आलेली आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे आतापर्यंत एकूण १८०३ अधिकृत होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, उर्वरित अधिकृत होर्डिंगची स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

*****

लक्षवेधी सूचना

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री. रवींद्र धंगेकर, श्री. संजय जगताप, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. विजय वडेट्टीवार, प्रा.वर्षा गायकवाड, श्री. संग्राम थोपटे, श्री. सुनिल केदार, श्री.बळवंत वानखडे, कुमारी प्रणिती शिंदे, श्री.विश्वजित कदम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५७२ पुढीलप्रमाणे आहे :-**

“पुणे महापालिकेच्या क्रिडा निकेतन शाळेचा सुरु असलेला भोंगळ कारभार, महापालिकेच्या वतीने सिंहगड रस्ता परिसरात ऑलिम्पिक वीर खासबा जाधव क्रिडा निकेतन शाळा सुरु असणे, सदर शाळेमध्ये सन २०१८ पासून एकही क्रिडा प्रशिक्षक नसणे, विषयाकरिता असलेल्या शिक्षकाकडूनच विद्यार्थ्यांना सराव दिला जात असल्याचे माहे जुलै,२०२३ मध्ये निदर्शनास येणे, परंतु नुकतीच या शाळेतील तीन विषय शिक्षकांच्या माहे जुन,२०२३ मध्ये झालेल्या बदल्या, परिणामी शाळेची संपूर्ण जबाबदारी तीन शिक्षकावर येणे, शिक्षकावर आलेल्या अतिरिक्त ताण, परिणामी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असलेला विपरित परिणाम, शिक्षकाअभावी मोठ्या वर्गातील विद्यार्थीच छोटया मुलांचे शिक्षक झाल्याचे चित्र असणे, पुणे महापालिकेच्या आदर्श शाळेत तर क्रिडा शिक्षकाचाच वानवा असल्याचे निदर्शनास येणे, भविष्यात उत्तम खेळाडू तयार व्हावे या उद्देशाने सुरु केलेल्या महापालिका शाळेच्या क्रिडा शाळेतच शिक्षणाचा खेळखंडोबा सुरु असणे, परिणामी विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेली संतापाची लाट, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका””

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेतील सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय परिसरातील ऑलम्पिक वीर खाशाबा जाधव शाळा, हडपसर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भारतरत्न सचिन तेंडूलकर शाळा व येरवडा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रत्येकी एक क्रीडा निकेतन शाळा याप्रमाणे एकूण तीन क्रीडा निकेतन शाळा, पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत सन २००९ पासून सुरू करण्यात आलेल्या आहेत.

सन २००९ ते सन २०१९ पर्यंत क्रीडा निकेतन शाळेसाठी क्रीडा मार्गदर्शक यांचे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिने मुदतीसाठी भरती करण्यास प्रशासकी मान्यता असल्याने सन २००९ ते २०१९ पर्यंत तीन क्रीडा निकेतन शाळेत प्रत्येकी सहा याप्रमाणे एकूण १८ क्रीडा मार्गदर्शक यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या सहकार्याने विविध क्रीडा पुरस्कार या शाळेत घेण्यात आले. त्यामुळे सदर क्रीडा निकेतन शाळेमध्ये सन २०१८ पासून २०१९ पर्यत क्रीडा प्रशिक्षक होते. परंतू सन २०१९ -२० व सन २०२०-२१ या कालावधीत कोविड महामारीमुळे शाळा ऑनलाईन पध्दतीने सुरू असल्याने क्रीडा मार्गदर्शक यांची नियुक्ती करण्यात आली नाही. परंतु या क्रीडा निकेतन शाळेमध्ये विविध विषय घेणाऱ्या शिक्षकाकडूनच क्रीडा विषयक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले जात होते.

माहे जून-जुलै २०२३ दरम्यान ऑलम्पिक वीर खाशाबा जाधव, क्रीडा निकेतन शाळा, सिंहगड रोड येथील तीन शिक्षकांच्या विनंती अर्जानुसार त्यांच्या बदल्या झालेल्या आहे ही, वस्तुस्थिती असून दि.१७ जुलै २०२३ रोजी दोन

माहे जून-जुलै २०२३ दरम्यान ऑलम्पिक वीर खाशाबा जाधव, क्रीडा निकेतन शाळा, सिंहगड रोड येथील तीन शिक्षकांच्या विनंती अर्जानुसार त्यांच्या बदल्या झालेल्या आहे ही, वस्तुस्थिती असून दि.१७ जुलै २०२३ रोजी दोन शिक्षकांच्या नियुक्त्या या शाळेत करण्यात आलेले आहे. त्यामुळे शिक्षकांवर कोणतेही अतिरिक्त ताण न आल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कोणतेही परिणाम झालेले नाही.

क्रीडा शिक्षकांच्या भरती प्रक्रीयेसाठी जाहिरात देऊन भरती प्रक्रीया सुरू करण्यात येत आहे. पुणे महानगरपालिकेच्या या सर्व तीन क्रीडा निकेतन शाळेत लवकरच क्रीडा मार्गदर्शक शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून या शाळेतील विद्यार्थी व पालकांमध्ये संतापाची लाट निर्माण होणार नाही याची दक्षता पुणे महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण विभाग यांचेमार्फत घेण्यात येत आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. ६१३

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री. निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६१३ खालीलप्रमाणे आहे :-**

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास राज्याच्या सचिव निकिता पांडे यांनी वसई -विरार म.न.पा. क्षेत्रात अनधिकृत बांधकामे वाढत असून म.न.पा. प्रशासन त्या विरोधात कोणतीच कारवाई करत नसल्याचे उघडकीस आल्याने अनधिकृत बांधकाम विभागाचे प्रमुख, सहाय्यक आयुक्त आणि अभियंता यांच्या विरोधात कामात हलगर्जीपणा केल्याच्या ठपका ठेवत चौकशी करून त्यांचे विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत लेखी पत्र आयुक्त अनिल कुमार पवार यांना दिल्याची बाब उघडकीस येणे, एच.ओ.जी. प्रभाग समिती सोडून अन्य ठिकाणी उपायुक्त यांनी अनधिकृत बांधकामांना सहकार्य केल्याचे उघडकीस येणे, तसेच कारवाई मधून अनेक बेकायदा बांधकामांना वगळणे इत्यादी अनेक गंभीर आरोप व तक्रारी असल्याने प्रभाग समिती इ. मधील १८ इमारतींवर कारवाई न करणे, इत्यादी गंभीर आरोपांची चौकशी करण्याबरोबरच त्यांना सहकार्य करणाऱ्या सहाय्यक आयुक्त आणि अभियंता यांची चौकशी पूर्ण होण्यास शासनाच्या नगर विकास विभागाच्या कारवाई बद्दल व होणाऱ्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई होत नसल्याने शासनाच्या हेतू बद्दल निर्माण झालेली शंका, अनधिकृत बांधकामावर नियंत्रण मिळवण्यासोबतच ही बांधकामे पुन्हा उभी राहू नयेत म्हणून कायदेशीर न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी उपायुक्त व प्रभागांचे सहाय्यक आयुक्त व त्या-त्या विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांवर होती, या सर्वांची चौकशी सुरू आहे किंवा कसे याबाबत नागरिकांच्या मनात निर्माण झालेला संशय, वसई-विरारमध्ये दररोज एक नवीन बेकायदेशीर बांधकाम उभे राहत असून म.न.पा. प्रशासन सदर बांधकामास पूर्णतः सहकार्य करीत असल्याचे गेल्या अनेक वर्षापासून उघड होत असूनही अप्रत्यक्षरीत्या या बेकायदेशीर बांधकामांना सहकार्य करीत असल्याचे उघडकीस आल्याने लाखो करदात्यांच्या मनात राज्य शासन व वसई-विरार मनपाच्या प्रशासनाविरुद्ध निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पालिका अधिनस्त प्रभाग समिती "ई" येथील अनधिकृत इमारती बांधकामाबाबत शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना सदर प्रकरणी आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यास यापूर्वीच कळविण्यात आले आहे. सदर आशयाची बातमी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर पत्र व्यवहारास अनुसरुन आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, प्रस्तुत लक्षवेधी सूचनेत उल्लेखित प्रभाग समिती "ई" नालासोपारा (प) अंतर्गत महानगरपालिका स्तरावर झालेल्या सर्वेक्षण अंती नमूद काही इमारती या महानगरपालिका स्थापनेपूर्वीच्या तत्कालीन सिडको कालावधी मधील तसेच काही इमारती महानगरपालिकेच्या

स्थापनेनंतर बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. ज्या इमारतींना महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी दिली असून तिथे अनधिकृत वाढीव बांधकाम निदर्शनास आले, तेथे निष्कासनाची कार्यवाही करण्यात आल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. या क्षेत्रातील इतर अनधिकृत इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम मधील तरतुदी अन्वये नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यानुसार अनधिकृत बांधकाम केल्या प्रकरणी १२ जमिनमालक / विकासकांवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, यापैकी दोन इमारतींच्या विकासकांनी न्यायालयीन स्थगिती मिळविली आहे.

उर्वरित इमारतीमध्ये रहिवास असून अंदाजित ५०० कुटुंबासह २००० पेक्षा जास्त नागरिकांचा रहीवास आहे. सदर इमारतींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये निष्कासनाची कार्यवाही करण्याकरीता पोलिस बंदोबस्त आवश्यक असून त्याकरीता पोलिस विभागास महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकाम नियंत्रण व निष्कासन प्रकरणी महानगरपालिकेमार्फत नियमितपणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे. माहे जानेवारी, २०२२ ते आजतागायत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील एकूण १५६५ अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे अंतर्गत सुमारे १६,९७,२३२ चौ. फुट बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.

दरम्यान वसई विरार शहर महानगरपालिकेने त्यांच्या अहवालात काही तक्रारकर्ते वारंवार व्यक्तिनिष्ठ तक्रारी/ब्लॅकमेलिंग करण्याच्या हेतूने, प्रशासनावर विनाकारण दबाव आणण्याच्या उद्देशाने तक्रारी करत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रामाणिक व सचोटीने काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मनोबल कमी होत असल्याची बाब अधोरेखित केली आहे.

राज्यातील नागरी क्षेत्रात निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणावर निष्कासन व नियंत्रण करणेअंतर्गत शासनाने दिनांक ०२.०३.२००९ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना व कार्यपध्दती विहित केली आहे. उपरोक्त सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. सदर प्रकरणी तसेच वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण विरोधात आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात येत आहेत.

*******

एच-११७७ -१अ.

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक ६१५**

**श्री. निलेश लंके,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

“माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास मुंबई म.न.पा.च्या डी वॉर्ड मधील दोन अभियंत्यांच्या बदल्या करण्यात आल्यानंतर त्या रद्द करून त्यांची पुन्हा त्याच वॉर्ड च्या त्याच जागेवर नियुक्ती करण्यात आल्याची बाब उघडकीस येणे, दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी महानगरपालिकेने जारी केलेल्या परिपत्रकात अभियंत्यांच्या बदल्यांबाबत नवीन नियम व कायदे निश्चिती करून सुद्धा चार महिन्यात शहर अभियंता कार्यालयाने या परिपत्रकाचे उल्लंघन केल्याचे उघड होणे, माहे जुलै, २०२२ मध्ये "डी" वॉर्ड तील दोन अभियंतांना लाच घेताना ए.सी.बी.ने रंगेहात पकडणे व सुमारे १५ ते २० लाखांचा मुद्देमाल त्यांच्याकडून जप्त करणे, मलबार हिल, पेडर रोडवरील "डी" वार्डातील एका अभियंत्याला माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये बेकायदेशीर बांधकामास मदत केल्याप्रकरणी निलंबित करण्यात येणे, मग दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी त्याची बदली पुन्हा करणे, दुसरा अभियंता सन २०१५ मध्ये "डी" बोर्ड मध्ये नऊ लाखांची लाच घेताना ए.सी.बी.ने पकडणे, दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी त्यांची बदली रस्ते विभागात करूनही ते त्या ठिकाणी कामावरून रुजू न होणे, पुन्हा डी वॉर्डात बदली करण्यात येऊ नये असा नकारात्मक शेरा लिहिलेला असणे, तरीही महानगरपालिका प्रशासनाने दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी त्यांची बदली पुन्हा केल्याचे उघडकीस येणे, फाईल नोटिंग नुसार त्यांनी नेहमीच वॉर्ड ऑफिसमध्ये काम केले असून पुन्हा वोर्ड मध्ये बदली करू नये असे स्पष्ट आदेश असताना त्यांची पुन्हा "डी" वॉर्ड ऑफिसमध्ये झालेली बदली, ए.सी.बी.ने या दोन्ही अभियंतांना लाच घेतल्याप्रकरणी अटक करून त्यांचे वर कारवाई करून सुद्धा व त्यांच्या अन्य ठिकाणी बदल्या केल्यानंतर प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या आर्थिक हात मिळवणीमुळे प्रशासकीय सर्व नियम धाब्यावर बसवून पुन्हा त्यांची बदली "डी" वार्डात झाल्याने महानगरपालिकेच्या अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्या मनात बेकायदेशीर कामे करणे व लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यांना योग्य बक्षीस मिळत असल्याची निर्माण झालेली नकारात्मक भावना, गैरमार्गाला सहकार्य करीत असल्याबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष चिड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “डी” वॉर्डमधील चार कनिष्ठ अभियंत्यांच्या बदल्या माहे जून, 2023 च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास करण्यात आल्या असून, त्या रद्द करण्यात आलेल्या नाहीत. तसेच, त्या सुमारास काही दुय्यम अभियंता यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तथापि, त्यापैकी बदलीने 'डी' विभाग कार्यालयात कोणत्याही दुय्यम अभियंतांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी कनिष्ठ अभियंता यांच्या पदोन्नतीने नियुक्तीबाबत ढोबळमानाने धोरण ठरविले आहे. एखाद्या अभियंत्यास प्रशासकीय कारणास्तव व सक्षम अधिकाऱ्याच्या मंजुरीने पुन्हा विभाग कार्यालयात नियुक्ती देण्यात येते.

“डी” वॉर्डमधील श्री. अमोल चंद्रकांत थविल, सहाय्यक अभियंता व श्री. दत्तात्रय संभाजी माने,

दुय्यम अभियंता यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेमार्फत दिनांक ०५.०७.२०२२ रोजी अटक करण्यात आली होती. सदर दोन्ही अभियंत्याना त्यांना अटक केल्याच्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सदर दोन्ही अभियंत्यांविरुध्द त्यांनी केलेल्या कृत्यामुळे प्रस्थापित होणाऱ्या गुन्ह्याकरिता सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करण्याकरिता दिनांक १८.०७.२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजुरी दिली आहे. सदर प्रकरणी प्राथमिक चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

"डी" वॉर्डमधील श्री. अमित आत्माराम पाटील, कनिष्ठ अभियंता व श्री. बुध्दजन भिवा जाधव, इमारत मुकादम, यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेमार्फत दिनांक १४.०८.२०१५ रोजी दोघांना अटक करण्यात आली होती. सदर दोन्ही कर्मचाऱ्यांना त्यांना अटक केल्याच्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तद्नंतर मा. विशेष न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक २९.०४.२०१७ रोजीच्या आदेशान्वये दोन्ही अभियंत्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे व त्यानंतर त्यांना दिनांक १३.०६.२०१७ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत पुनःस्थापित करण्यात आले आहे. त्यापैकी श्री. बुध्दजन भिवा जाधव हे दिनांक ०१.०९.२०१६ पासून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त झाले आहेत. सदर दोन्ही कर्मचाऱ्यांविरुध्द करण्यात आलेल्या विभागीय चौकशीमध्ये त्यांच्याकडून कोणताही निष्काळजीपणा झाल्याचे दिसून आले नाही. यास्तव, दोन्ही कर्मचाऱ्यांचा निलंबन कालावधी हा "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात आला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी आता कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही. मा. न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पारित केलेल्या पुनःस्थापन आदेशान्वये माहे जून २०१७ मध्ये श्री. अमित आत्माराम पाटील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागात बदली करण्यात आली. तद्नंतर दिनांक १४.०७.२०२२ रोजीच्या बदली आदेशान्वये सदर अभियंत्यास "डी" विभागात रूजू करुन घेण्यात आले.

********

H-1193

लक्षवेधी सूचना क्र.६२१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री. निलेश लंके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६२१ पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास घणसोली नवी मुंबई येथील सेक्टर १६ मधील भूखंड क्र.१०६ मध्ये मार्केट होण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी म.न.पा. मध्ये ठराव मंजूर होऊन म.न.पा. ने सदर भूखंडावर मार्केटचे आरक्षण टाकल्याची बाब उघडकीस येणे, सध्या या भूखंडावर भूमाफियांनी सहा मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम केल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिक तसेच माजी नगरसेवक व्दारकानाथ भोईर यांनी सिडको व अतिक्रमण विभागाकडे पुराव्यासह वारंवार केल्याची बाब प्रसिध्दीस येणे, या बेकायदेशीर बांधकामांविरोधात व्दारकानाथ भोईर यांनी घणसोलीचे विभाग अधिकारी, उपायुक्त परिमंडळ दोन म.न.पा. अतिक्रमण, विभाग प्रमुख, सिडको अनधिकृत बांधकाम विभाग मुख्य नियंत्रक, ठाणे जिल्हाधिकारी, म.न.पा. आयुक्त इत्यादींकडे पुराव्यांसह लेखी तक्रार करुनही या अनधिकृत बांधकाम विरोधात व भूमाफियांविरोधात कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने नागरिकांच्या मनामध्ये म.न.पा. च्या कारभाराबद्दल निर्माण झालेला अविश्वास, सेक्टर नंबर १६ मधील भूखंड क्र.१०६ या २६ चौरस मीटर भूखंडावर नवी मुंबई म.न.पा. व सिडको यांनी मार्केटचे आरक्षण टाकले असून सुध्दा सदर भूखंडावर अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास येऊनही ते थांबवण्याचे कोणतेही प्रयत्न सिडको वा म.न.पा. ने केल्याचे न दिसून येणे, सिडको तसेच म.न.पा. तील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे भूमाफियांना मिळत असलेले सरंक्षण व सहकार्य असल्याबद्दल नवी मुंबईतील लाखो रहिवाशांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास व म.न.पा. प्रशासन कारवाईस हेतूत: करीत असलेली अक्षम्य दिरंगाई यामूळे नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

नवी मुंबई येथील मौजे-घणसोली मध्ये सेक्टर-१६, भूखंड क्र.१०६, क्षेत्र २,६८६ चौ.मी. हा सिडकोच्या मालकीच्या भूखंड १२.५% योजनेअंतर्गत वाटपासाठी आरक्षीत आहे. सदर भूखंडावर नवी मुंबई महानगरपालिकेने दि.१३.१२.२०१९ रोजी ठराव मंजूर करून मार्केटचे आरक्षण टाकले आहे. तथापि, सदरचा भूखंड सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित झालेला नाही. या भूखंडावरील अनधिकृत बांधकामाबाबत माजी नगरसेवक श्री.व्दारकानाथ भोईर यांनी महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे तसेच सिडको महामंडळाकडे जून २०२३ मध्ये तक्रार केली आहे. सिडको महामंडळाच्या दि.२६.८.२०२२ रोजीच्या स्थळपाहणी दरम्यान या भूखंडावर श्री.राहुल पाटील (विकासक) यांचेकडून आर.सी.सी. चे Footing बांधकाम चालू असल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने सदर अनधिकृत बांधकामाबाबत सिडकोमार्फत दि.१५.९.२०२२ रोजी चौकशी नोटीस व दि.१७.१०.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकासकास नोटीस देण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत निधी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५४ अन्वये दि.१८.७.२०२२ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. सदर अनधिकृत बांधकामाविरोधात उक्त

अधिनियमातंर्गत रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दि.४.१०.२०२२ रोजी संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, अनधिकृत बांधकामाबाबत दिलेल्या नोटिसी विरोधात श्री.नरेश वसंत पाटील यांनी मा.दिवाणी न्यायालय, वाशी येथे आर.सी.एस. क्र.३८८/२०२२ अन्वये दावा दाखल केला आहे. सदर दिवाणी दाव्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व सिडको महामंडळ प्रतिवादी आहेत. मा.न्यायालयाने दि.४.१०.२०२२ रोजीच्या आदेशान्वये "जैसे थे" (status quo) परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मा. न्यायालयाचे "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश असतांना देखील विकासकाने बांधकाम चालु ठेवले असल्याबाबतचे सिडकोमार्फत छायाचित्र व पंचनामासह अतिरिक्त म्हणणे (Additional Say) मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सदर अनधिकृत बांधकामधारकास मुलभूत सोयी-सुविधा जसे पाणी पुरवठा, वीज पुरवठा, इत्यादी न देण्याबाबत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका व कार्यकारी अभियंता, विद्युत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. यांना सिडकोमार्फत कळविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१७.८.२०२३ रोजी असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

### सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"वाढती लोकसंख्या आणि त्या प्रमाणात वाढती वाहनांची संख्या यामुळे कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील रस्ते अपुरे पडत असल्याने गल्लीबोळासह मुख्य रस्त्यांवरही मोठ्या प्रमाणात होत असलेली वाहतुक कोडी, ही वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी व वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत डोंबिवली शहरातील महत्त्वाच्या १३ चौकांमध्ये बसविण्यात आलेली सिग्नल यंत्रणा, परंतु पायाभूत सुविधांच्या अभावामुळे बऱ्याच ठिकाणच्या सिग्नल यंत्रणा ह्या देखाव्यासाठीच उभ्या असल्याची निदर्शनास आलेली गंभीर बाब, याकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असून कोट्यवधींचा खर्च करूनही सिग्नल यंत्रणा कोलमडलेली असल्याने सुरळीत वाहतुकीचे अपयशी ठरलेले उद्दिष्ट, अरूंद रस्ते, रस्त्यांच्या मधोमध असलेली सर्कल, सुरू असलेली विकासकामे सिग्नल यंत्रणा सुरू करण्यासाठी अडथळा ठरत असणे, यांमुळे वाढत असलेले अपघात तसेच बेशिस्त वाहतुक, तसेच सिग्नलच्या परिसरात उखडलेले पेव्हरब्लॉक, ड्रेनेजची खोलवर गेलेली झाकणे, झेब्रा क्रॉसिंग आणि स्टॉप लाईनचे पुसट झालेले पट्टे आदींमुळे सिग्नलची वेळ पाळण्यास येत असलेले अडथळे, त्यामुळे वाहनचालकांना ई-चलन सारख्या समस्यांचा त्रास सहन करून नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणे, या सर्व बाबींकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी वाहनचालक तसेच नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड मार्फत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात १३ ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. सदर सिग्नल यंत्रणा ही स्मार्ट आणि सुरक्षित घटक प्रकल्पाअंतर्गत बसविण्यात आलेली आहे. सदर सिग्नल यंत्रणा शहर वाहतूक पोलीस यांना हस्तांतरीत करण्यात आलेली असून, त्यांच्यामार्फत चालविण्यात येते. सिग्नल यंत्रणेच्या खांबावर बसविलेल्या RLVD ( Red Light Violation Detection) कॅमेऱ्यामार्फत घेण्यात येणाऱ्या फुटेजच्या आधारे पोलीस विभागामार्फत 'ई'-चलनाची कार्यवाही पार पाडण्यात येते.

सदरील चौकाच्या भागात सिग्नल यंत्रणा कार्यरत ठेवण्याच्या दृष्टीने शहर वाहतूक शाखा तसेच, स्मार्ट सिटी विभागाकडून केलेल्या मागणीनुसार, सिग्नलच्या भागातील झेब्रा पेंटींग, स्टॉप लाईन, मार्कींग, खराब झालेले पेव्हर ब्लॉक बदलणे, रस्त्यावरील खड्डे भरणे, चेंबर्सची झाकणे सुस्थितीत करणे इत्यादी बाबी, महानगरपालिकेकडून वेळच्या वेळी करण्यात येतात. यामध्ये सदर कार्यवाही इतर प्राधिकरणाशी संबंधित असल्यास, त्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या महानगरपालिकेमार्फत सूचना देण्यात येतात. चौकाच्या भागातील रस्ते हे किमान १२ मी. ते ३० मी. पर्यंत रूंद असून, या भागात विकास योजनेनुसार फॅनिंग मधील बहुतांश अडथळे काढण्यात आलेली आहेत.

डोंबिवली पुर्व भागातील घारडा सर्कल येथील वाहतूक बेटाच्या मोठ्या आकारामुळे होत असलेल्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने बेटाचा आकार कमी करण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे. महानगरपालिका स्तरावर वाहतूक शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी बैठका घेऊन, आवश्यक कार्यवाही करण्यात येते. बऱ्याचवेळा सदर चौकाच्या भागात विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी संबंधित संस्थांमार्फत खोदाई केल्यानंतर याठिकाणी काही काळासाठी प्रतिकुल परिस्थिती उद्भवते. तथापि, सेवा वाहिन्या टाकल्यानंतर सदर रस्ता पुर्ववत करणे व आवश्यक पट्टे मारण्याचे काम पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

********

लक्षवेधी सूचना क्र. ८९२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

श्री प्रदीप जैस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.८९२ खालीलप्रमाणे आहे :-

"जून २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास यांनी वसई-विरार म.न.पा.च्या प्रभाग समिती 'सी' घरपट्टी विभागातील अधीक्षक यांनी म.न.पा.कडे जमा झालेली करपट्टीची ७२ लाख ६८ हजार ८९९ केल्याची पुराव्यासह लेखी तक्रार म.न.पा. आयुक्त यांच्याकडे केल्याची बाब उघडकिस येणे, चरण भट यांनी पुराव्यासह दाखल केलेल्या तक्रारीमध्ये सत्यता आढळून येणे, आयुक्तांनी कर अधीक्षक यांचे चौकशी अहवालात दोषी आढळल्याने त्यांचे तात्काळ निलंबन ही करणे, अधिक्षक यांना सर्व मदत करणारे सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केला व अधिक्षक यांच्या गैरव्यवाराकडे हेतुतः दुर्लक्ष केले, याबद्दल सहाय्यक आयुक्त यांची चौकशी न करण्याची म.न.पा. प्रशासनाची भूमिका संशय निर्माण करणारी असून अधिक्षक यांनी गैरव्यवहार केल्याचे चौकशीत व तक्रारीत आढळून येऊनहीं त्यांच्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल न केल्यामुळे जनतेच्या मनात म.न.पा. आयुक्तांच्या भूमिकेबद्दल निर्माण झालेला संशय, श्री. चरण भट यांनी या प्रकरणात सहाय्यक आयुक्त व अन्य कर्मचारी यांनाही निलंबित केले गेले पाहिजे अशी वारंवार केलेली मागणी, या मागणीकडे म.न.पा. प्रशासन हेतूतः अक्षम्य दुर्लक्ष करत असल्यामुळे वसई-विरार म.न.पा.तील लाखो रहिवाशांच्या मनात म.न.पा. प्रशासना विरोधात झालेली तीव्र चीड व संताप याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिका या "क" वर्ग महानगरपालिकेची स्थापना दिनांक ३ जुलै, २००९ रोजी शासन अधिसूचनेन्वये करण्यात आली आहे. प्रस्तुत लक्षवेधी सूचनेत उल्लेखित श्री अरुण एल. जानी व श्री. गणेश पाटील, हे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी आहेत. सदरहू कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या तसेच शिस्त, अपिल इत्यादी आस्थापना विषयक बाबींकरीता आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका हे सक्षम प्राधिकारी आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार कार्यालयीन आदेश दिनांक ०८.०३.२०२२ अन्वये श्री. गणेश पाटील, अधिक्षक (वर्ग - ३) यांची प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती "सी" म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच श्री अरुण एल. जानी, अधिक्षक (वर्ग - ३) यांची दिनांक २०.१०.२०२२ च्या कार्यालयीन आदेशान्वये प्रभाग समिती "सी" (चंदनसार) येथे नेमणूक करण्यात आली. तथापि, त्यांना इतर विषयासह कर आकारणी व कर संकलन, स्थानिक संस्था कर इत्यादी विभागांचेही कामकाज सोपविण्यात आले.

श्री. चरण भट यांनी पालघर जिल्ह्यातील वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "सी" करपट्टी विभागातील कर अधिकारी श्री अरुण एल. जानी, यांनी महानगरपालिकेकडे जमा झालेली करपट्टी रकमेचा गैरव्यवहार केल्याची लेखी तक्रार वसई विरार शहर महानगरपालिकेकडे दिनांक १७.०५.२०२३ रोजी केली, ही वस्तुस्थिती आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर चौकशी केली असता, श्री अरुण एल. जानी, अधिक्षक, घरपट्टी विभाग, प्रभाग समिती "सी" (चंदनसार) यांनी दिनांक २७.०३.२०२३ ते दिनांक ३१.०३.२०२३ पर्यंतची रोख रक्कम तसेच शिक्षण कर व रोजगार हमी कर चलन रोखपालाकडे जमा न केल्याची बाब लेखा विभागाच्या निदर्शनास आली. तथापि, श्री अरुण एल. जानी, अधिक्षक यांनी कर अधिक्षक म्हणून त्यांच्याकडे रोखीने/धनादेश/धनाकर्षद्वारे जमा होणारा मालमत्ता कर, शिक्षण कर किंवा इतर कर २४ तासांच्या आत लेखाविभागाकडे जमा करणे आवश्यक होते. सदर प्रकरणी दिनांक १७.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री. जानी यांना निलंबित करण्यात आलेले आहे. दरम्यान दिनांक २७.०३.२०२३ ते दिनांक ३१.०३.२०२३ या कालावधीतील करापोटी जमा झालेले रकमेचा श्री. जानी यांनी दिनांक ०५.०४.२०२३, दिनांक ०६.०४.२०२३, दिनांक १०.०४.२०२३, दिनांक १३.०४.२०२३, दिनांक १७.०४.२०२३ व दिनांक ०३.०५.२०२३ रोजी भरणा केला आहे.

सदर प्रकरणी महानगरपालिका स्तरावर गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार श्री. अरुण जानी, अधिक्षक यांनी यापूर्वी भरणा न केलेली रक्कम महानगरपालिकेच्या फंडात भरणा केल्याचे दिसून येते. सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश पाटील, प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती "सी" चंदनसार यांना दिनांक ०३.०७.२०२३ च्या महानगरपालिकेच्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार श्री अरुण एल. जानी, अधिक्षक यांनी दिनांक १८.०४.२०२३ ते दिनांक १६.०५.२०२३ या कालावधीतील मालमत्ता करापोटी जमा झालेली रक्कम रु. ७२,६८,८९९/- रु. पैकी रु. २६,२२,६६०/- या रकमेचा भरणा दिनांक १६.०५.२०२३ तर उर्वरीत रु. रक्कम ४६,४६,२३९/- चा भरणा दिनांक १७.०५.२०२३ व दिनांक १८.०५.२०२३ अशा दोन टप्प्यात केला आहे.

उक्त प्रकरणात झालेल्या वित्तीय अनियमिततेच्या अनुषंगाने श्री. अरूण एल. जानी, अधिक्षक यांना महानगरपालिकेने निलंबित केले आहे. तसेच महानगरपालिकेच्या कोषागारात मालमत्ता कराचा उशीराने भरणा केलेला असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अगर कसे याबाबत कायदेशीर अभिप्राय घेण्यात येत असून त्या आधारे पुढील कार्यवाही करण्याची तजवीज वसई विरार शहर महानगरपालिकेने ठेवली आहे.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे द्वितीय(पावसाळी) अधिवेशन

**श्री. प्रदीप जैस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, पुणे शहरातील वारजे येथील मनपाच्या डॉ. अरविंद बारटक्के दवाखान्यात कोरोना काळात स्वॅब सेंटर मधून रुग्णालय प्रशासनाला हाताशी धरून केलेल्या भ्रष्टाचारात ८० ते ९० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांच्या सदर तक्रारीनुसार वारजे पोलीस ठाण्यातील पोलिसांनी तपास पूर्ण करून आपला लेखी अहवाल माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये पुणे मनपा प्रशासनास पाठविणे, पोलिसांनी आपल्या अहवालात तक्रारीत तथ्य असून त्या आरोपांशी पुरक असणे, पुणे मनपाची ८० ते ९० लाखांची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याची बाब व या अहवालावरून पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करावी असे वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो. निरीक्षक यांनी मनपा आयुक्त व आरोग्य प्रमुख यांना दिनांक २७ सप्टेंबरला देऊनही अद्यापी गेल्या वर्षात पुणे मनपाने पोलिसांच्या तपास अहवालानुसार कोणतीच तक्रार दाखल केली नसल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, वैद्यकीय अधिकारी यांनी वारजे पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारीत नमूद केलेले अतिशय गंभीर आरोप पोलीस यंत्रणेने तपास करून यात शंभर टक्के तथ्य असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याचे दिलेली कबुली, तरीही पुणे मनपा प्रशासन संबंधित दोषी भ्रष्टाचारी अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात कोणतीच कारवाई करण्यास पोलिसांना परवानगी देत नसल्याने, उच्च पदस्थ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा गैरकारभार व भ्रष्टाचार वारजे येथील बारटक्के रुग्णालयात झाला असल्याबद्दल नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.""

**मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

डॉ.सतीश कोळसुरे वैदयकीय अधिकारी बारटक्के दवाखाना यांनी पुणे शहरातील वारजे येथील महानगरपालिकेच्या डॉ.अरविंद बारटक्के दवाखान्यात करोना काळात स्वॅब सेंटर मधून रुग्णालय प्रशासनाला हाताशी धरून केलेल्या भ्रष्टाचारात ८० ते ९० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याबाबत लेखी तक्रार केली असून तीच तक्रार पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला देखील दिनांक २० सप्टेंबर २०२२ रोजी प्राप्त झाली. पोलिसांकडून याबाबत त्याच वेळी तपास सुरु करण्यात आला असून डॉ.अरविंद बारटक्के दवाखाना येथील त्या वेळी कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचा-याचे जबाब घेण्यात आले तसेच दवाखान्यात असलेले दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले. याकरिता पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडून वारजे पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना पुर्ण सहकार्य करण्यात आले. वारजे पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षकानी तपास पुर्ण करुन दिनांक २७ सप्टेंबर २०२२ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना पत्र पाठविले आहे.

पोलिसांनी आपल्या पत्रामध्ये सदरची बाब गंबीर स्वरुपाची असून यातील फसवणूकीची आपले विभागामार्फत चौकशी होऊन नक्की किती रकमेची फसवणूक झालेली आहे त्याबाबत खातरजमा करुन त्यासबंधी पोलीस ठाण्यात तक्रार करण्याबाबत कळविले आहे.

पोलिसांच्या पत्रावरून पुणे महानगरपालिकेकडून दिनांक ०६/१२/२०२२ रोजी एक त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली व त्या समितीने दिनांक १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ दरम्यान बारटक्के दवाखाना येथे कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर सर्व कर्मचारी यांचे समक्ष लेखी बयान घेवून सर्व दस्तऐवज व नोंदी तपासून व केंद्र

वाहनतळाची उभारणी केल्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, कस्तुरचंद पार्क मेट्रो स्थानका जवळ असलेले बाजारपेठ व व्यापारी केंद्र, रेल्वे स्टेशन, विधानभवन, वारसास्थळे, इत्यादी ठिकाणे असल्यामुळे या परिसरामध्ये मोठ्याप्रमाणात रस्त्याच्या कडेने वाहने उभी राहत असल्याने मेट्रो स्थानकाखाली असलेल्या रस्त्याच्या वाहतूकीवर त्याचा परिणाम होतो. वाहतूक सुरळीत व सुरक्षित होण्याकरीता कोणतेही वाहन स्थळाची सुविधा उपलब्ध नसल्याने मेट्रोने भविष्यातील या परिसरातील वाढणारी वर्दळ व रस्त्याच्या कडेने अनाधिकृत वाहने उभे करणे टाळण्यासाठी सामाजिक दायीत्व म्हणून वाहनतळाची उभारणी केली आहे. सदर वाहनतळाची उभारणी सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर विकसित करण्यात येऊन त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नातून झालेला खर्च वसूल होईल व महा मेट्रोस उत्पन्न देखील प्राप्त होणार आहे. त्यामुळे सदरहू करण्यात आलेला खर्च सद्यस्थितीत अधिकचा वाटत असला तरी भविष्यातील गरज विचारात घेता वाजवी ठरतो. लेखापरीक्षण कालावधीत ३८ स्थानकांपैकी २५ स्थानके कार्यरत होती. सद्यस्थितीत प्रकल्पातील सर्व ३८ मेट्रो स्थानके कार्यान्वित झालेली आहेत.

मेट्रो उभारण्याचा मूळ उद्देश हा प्रमुख वर्दळीचे ठिकाण तसेच रेल्वे स्टेशन, बाजारपेठ, हॉस्पिटल, एअरपोर्ट, इत्यादी मेट्रो मार्गिकेने जोडण्याचा आहे. या बाबीं विचारात घेऊनच एअरपोर्ट व कॉटन मार्केट येथील स्टेशनची उभारणी करण्यात आलेली आहे. सर्व मेट्रो स्टेशनची उभारणी ही या परिसरामध्ये भविष्यातील वाढणारी प्रवाशांची वर्दळ विचारात घेऊन सदर मेट्रो स्टेशनची उभारणी करण्यात आलेली आहे.

मेट्रो प्रकल्प सुरु करण्यामध्ये स्थापत्य आणि प्रणाली/उपप्रणालीसह एकत्रित नियोजन आणि इंटरफेस यांचा समावेश आहे. यामध्ये तांत्रिक समस्यांमुळे मुख्यत: दोलन चाचण्यांमुळे रोलींग स्टॉकला खरेदीयसाठी सर्वात जास्त कालावधी लागतो. महा-मेट्रो व्यवस्थापनाने फेब्रुवारी २०१८ अखेर ५.१ कि.मी. चा पहिला टप्पा सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे महामेट्रोने मेट्रो ऑपरेटर कडून रेक भाड्याने घेऊन पहिला टप्पा सुरु करण्याची शक्यता तपासली. मार्च २०१८ पर्यंत मेट्रो मार्गिकेतील असलेल्या बहुतेक स्टेशनचे काम पुर्ण झाले होते. रोलींग स्टॉक उपलब्ध होईपर्यंत बहुतांश स्थापत्य व तांत्रिक कामे पुर्ण झाली असल्याने व सीआरएमएसची तपासणी करणे आवश्यक असल्याने दोन ट्रेन संच भाड्याने घेऊन प्रकल्पाची निर्माण केलेली व्यवस्था उपयोगात आणण्यात आली. प्रकल्प खर्चामध्ये ट्रेन संचाकरीता असलेल्या खर्चामध्ये नव्याने व भाड्याने ट्रेन संच घेण्याबाबतचा खर्च अतंर्भूत असल्याने मेट्रो व्यवस्थापनाने सदर निर्णय घेतलेला आहे. डीपीआरमधील तरतुदीच्या तुलनेत प्रकल्पात कोणताही अवांछित खर्च झालेला नसल्याचे दिसून येते.

**********

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**सर्वश्री. प्रदीप जैस्वाल व रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १०८५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका या ठिकाणी भुयारी गटार योजनेसाठी स्किम फेस-२ भिवंडी निजामपूर शहर महनगरपालिका भिवंडी अंतर्गत सूवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी महापालिकेला भुयारी गटार योजनेचे योग्य प्रकारे व नियोजनबध्द भिवंडी शहरातील मलनि:स्सारणाचे काम करता यावे म्हणून कन्स्टलंटन व सरकारकडून देखरेख म्हणून ५ संस्थेची नेमणूक करणे, भुयारी गटार निविदा ४६२ कोटी रुपयांची होती त्यापैकी ६ एचटीपी व १० पंपिंग स्टेशन व नादुरुस्त केलेले रस्ते बांधण्याची निविदा दिली होती ते बांधण्यापूर्वीच या ४ संस्थानी व महानगरपालिकेने ३३७ कोटी रुपये ठेकेदारास ईगल कन्स्ट्रक्शन यांस गैरव्यवहारातून गैरलाभ मिळवून अदा केलेले असणे, भुयारी गटार योजना ही सरकारी योजना न राबवता भिवंडीच्या जनतेसाठी फसवी योजना राबविण्यात आली, सदर निविदेमध्ये ५० कोटी रुपये परस्पर गैरव्यवहारातून गैरलाभ मिळून देण्यात आलेला आहे, याची सखोल चौकशी साठी कमिटी नेमून संबधितावरची कारवाई करणे गरजेचे असणे, कारण या भुयारी गटार फसवी योजनेमध्ये अनियमितता व अगुणवत्ता आढळून आल्याने ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्ते नादुरुस्त होऊन २००० लोकांचे अपघात झालेले आहे, त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडलेले आहेत, यास सर्वस्वी जबाबदार ठेकेदार व महापालिकेचे अधिकारी असून सदर निविदेमध्ये व निकृष्ट दर्जाच्या कामामध्ये खूप मोठा घोटाळा झाला असून याची सखोल चौकशी होण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असून संबधित संस्थांनी केलेले गैरव्यवहार व ठेकेदार यांच्यावरती कठोर ती कारवाई करण्यासाठी शासनाने सखोल चौकशी अतिगंभीरतेने लक्ष घालून शासनाने कारवाई करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व शहराच्या विकासाच्या दृष्टीने भुयारी गटार योजना राबविणे आवश्यक असल्याने भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ४२७.९८ कोटी किंमतीच्या भुयारी गटार (टप्पा-२) प्रकल्पाची अंमबजावणी करण्यात येत असून सदर प्रकल्पात १५९ किमी लांबीच्या वेगवेगळया व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, एकूण ९९ द.ल.लि./दिन क्षमतेचे ४ मलशुद्धीकरण केंद्र (एस.टी.पी.) बांधणे, ७ ठिकाणी पंपिंग स्टेशन बांधणे, सुमारे १.१ किमी लांबीचे आऊटफॉल सिव्हर टाकणे व इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे.

सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या सदर प्रकल्पावर देखरेख होत असून योजनेंतर्गत झालेल्या संपूर्ण कामाची त्यांच्याकडून नियमित गुणवत्ता तपासली जाते. तसेच, भुयारी गटार योजना (टप्पा-२) मध्ये झालेल्या कामांचे उदा. मलवाहिनी अंथरणे, चेंबर बांधणे, मलशुद्धीकरण केंद्र व पंपिंग स्टेशन बांधणे, मलवाहिन्या अंथरताना खोदलेले रस्ते दुरुस्ती करणे इ. कामांचे आय.आय.टी., मुंबई व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या नामांकित संस्थेमार्फत त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण झालेले आहे. त्यांच्याकडून काम गुणवत्तापूर्वक झाले

असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच कंत्राटदारास रुपये ३८६.८८ कोटींची देयके महानगरपालिकेमार्फत प्रदान करण्यात आलेली आहेत. सदर योजनेच्या कामांतर्गत मलवाहिन्या अंथरणेकरिता खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती वेळोवेळी करण्यात आलेली असून सद्यस्थितीत या योजनेच्या कामांतर्गत एकुण १३०.५ कि. मी. मलवाहिन्यां अंथरण्यात आलेल्या असुन त्यापैकी १२७.०० कि.मी लांबीचे खोदण्यात आलेले रस्ते पुर्ववत करण्यात आले आहेत व उर्वरीत ३.५ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या मुख्य नाले व खाडी लगत अंथरण्यात आलेले असल्यामुळे रस्ता दुरुस्तीची आवश्यकता नाही. योजनेंतर्गत दुरुस्ती केलेल्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे अपघात वा जीवितहानी झाली असल्याची तक्रार महानगर पालिकेस प्राप्त नाही. सद्यस्थितीत, सदर योजनेची आर्थिक प्रगती ९२ % व भौतिक प्रगती ९३.५० % झालेली असून प्रकल्पाच्या कामाची वेळोवेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत गुणवत्ता तपासणी होते व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्यामार्फत त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करून योजनेचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

*****

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.११३६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

श्री. आशुतोष काळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ११३६ पुढीलप्रमाणे आहे:-

"कोपरगांव नगरपरिषद वैशिट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान अंतर्गत सि. अ.नं. १६२१ व १७६७ मध्ये जलतरण तलावाचे बांधकाम करणेस सन २००७ मध्ये रक्कम रु.१.१८ कोटीची प्रशासकीय मान्यता प्राप्त होणे, जलतरण तलावाचे काम सन २०१० साली काम पूर्ण होणे, सन २०१० ते २०२३ पर्यंत सदर जलतरण तलावाचा जनतेसाठी कोणताही उपयोग न होणे (खुला न करणे), शासनाने मंजूर केलेले १.१८ कोटीच्या निधीचा दुरुपयोग होणे, नगरपरिषद प्रशासनाने त्याबाबत कोणतीही भूमिका न घेणे, तत्कालीन नगराध्यक्ष व प्रशासन यांनी चुकीच्या ठिकाणी जागा प्रस्तावित करणे, वाया गेलेल्या निधीची चौकशी होणे व दोषींवर कारवाई होणे, इत्यादि प्रकरणी शासनाने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

कोपरगाव नगरपरिषद मालकीच्या सि.स.नं. १६२१ व १७६७ (आरक्षण क्र. १७ क्रिडांगण) मध्ये जलतरण तलाव बांधकाम आराखड्यांना उपसंचालक, नगररचना विभाग, नाशिक यांच्या दि.१३ जुलै, २००७ रोजीच्या पत्रान्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर कामाच्या रू. ११८.०२ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी दि. १० ऑगस्ट, २००७ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, नगर विकास विभागाच्या दि. २३ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या पत्रान्वये "वैशिष्ट्यपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान" या योजनेंतर्गत रू. ११८.०२ लक्ष इतक्या किंमतीच्या जलतरण तलाव बांधकाम व अनुषंगिक कामांकरीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

जलतरण तलाव व कंपाऊंड वॉल बांधकाम या दोन कामांसाठी कोपरगांव नगरपरिषदेने विहित निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन व नगरपरिषद ठरावान्वये मे. पटेल कंस्ट्रक्शन कोपरगाव यांना दि.०३ नोव्हेंबर, २००८ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत. या कामांसाठी कंत्राटदारास एकूण रुपये ८७.२२ लक्ष अदा करण्यात आलेले आहेत. सदर कामांची शिल्लक व उर्वरित कामांची एकूण रक्कम रुपये ४२.२४ लक्ष अदा करण्याबाबत मे. पटेल कंस्ट्रक्शन कोपरगाव यांनी दि.०८ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेस विनंती केली आहे. तथापि, नगरपरिषदेने वेळोवेळी दिलेल्या सूचना देवूनही सदर कामे अद्यापही पुर्ण झालेली नसल्याने, कंत्राटदारास शिल्लक देय रक्कम अदा केलेली नाही.

जलतरण तलावाच्या कामामध्ये मशिनरी बसविणे ( रु.२१.०६ लक्ष) व केमिकल वाटर प्रुफींग करणे (रु १२.६२ लक्ष) या कामांस तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामध्ये आर. आर. एंटरप्रायजेस, ठाणे यांच्याकडून नगरपरिषदेस मशिनरी उपलब्ध झाल्याने, त्यांना रुपये २१.२१ लक्ष पैकी २०.८२ लक्ष रक्कम अदा केलेली आहे. तसेच केमिकल वाटर प्रुफिंगचे काम मिरजगावकर के. व्ही. असोसिएट यांनी पुर्ण केल्याने, त्यांना रक्कम रुपये १२.६२ लक्ष पैकी ११.३५ लक्ष देयक अदा केली आहे.

जलतरण तलाव बांधकाम व अनुषंगिक कामांकरीता वितरीत निधी पुर्ण खर्च झालेला आहे.

जलतरण तलाव बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये काही तांत्रिक बाबींचा समाविष्ट करणे आवश्यक होते. परंतु सुधारित अंदाजपत्रक न झाल्याने व सर्वसाधारण सभेचा निर्णय न झाल्याने जलतरण तलावाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. या कामाची शिल्लक रक्कम कंत्राटदारास अदा केलेली नाही.

नगरपरिषद मालकीच्या सि.स.नं. १६२१ व १७६७ (आरक्षण क्र. १७ क्रिडांगण) हे ठिकाण नदी काठी असून, या जागेवरील जलतरण तलावाचे अपुर्ण असलेले बांधकाम पुर्ण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याकरिता त्रयस्थ तपासणी करुन, व तद्नंतर त्यासाठी आवश्यक वित्तीय उपलब्धता करुन सदरचा प्रकल्प कार्यान्वीत करण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

* * * * * * *

लक्षवेधी सूचना १३३०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री.सिध्दार्थ शिरोळे, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. सुनिल कांबळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-**

"पुणे शिवाजीनगर येथे शासकीय कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर पोलीस ग्राऊंड, COEP कॉलेज, औंध आय.टी.आय. Polytechnic कॉलेज कार्यरत असणे, या शासकीय संस्थांच्या मैदानामध्ये नागरीकांना व्यायामासाठी व खेळण्यासाठी परवानगी नाकारण्यात येणे, पुणे शिवाजीनगरमध्ये मोजकीच मैदाने असणे व त्यातही नागरिकांना व्यायामासाठी परवानगी देण्यात न येणे, यामुळे नागरिक व्यायामासाठी जाणार कुठे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होणे, त्यामुळे शिवाजीनगर येथील नागरिकांमध्ये शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, ही सर्व शासकीय संस्थांची मैदाने नागरिकांना व्यायामासाठी व मुलांना खेळण्यासाठी तातडीने खुली करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पुणे शिवाजीनगर येथे शासकीय कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर पोलीस ग्राऊंड, सी.ओ.ई.पी. (COEP) कॉलेज, औंध आय.टी.आय. Polytechnic कॉलेज या शासकीय संस्थांची मैदाने पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या अखत्यारीत एकूण १०२ क्रीडा संकुले असून शिवाजीनगर या भागातील व पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या ताब्यातील क्लायबिंग वॉल-१, जलतरण तलाव -४, व्यायामशाळा - ०६, बॅडमिंटन हॉल - ०२, योगा हॉल -१, फुटबॉल मैदाने – २, टेनिस कोर्ट - २, हॉकी -१, टेबल टेनिस - १, इत्यादी व्यायामासाठी खेळाडूंना व नागरिकांना खुली आहेत. पुणे महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या फी स्वीकारून या सर्व सुविधा खेळाडू व नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येतात.

सी.ओ.ई.पी. (COEP) तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे व शासकीय तंत्रनिकेतन, पुणे हे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीत आहेत.

सी.ओ.ई.पी. (COEP) तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे :- उच्च न्यायालयाच्या दि.१७.०४.२०१२ च्या जनहित याचिका क्र.१२३/२०११ मध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार मैदानाचा वापर फक्त खेळाचे मैदान म्हणून वापरण्यात येत आहे. यामुळे मैदानाचा वापर हा इतरांसाठी खुला करण्यात आलेला नाही. सदर शासकीय मैदानासमोर वसतीगृह असून निवासी विद्यार्थी व विद्यार्थीनी ह्या मैदानावर सकाळी तसेच संध्याकाळी व्यायाम व विविध खेळांचा सराव करतात. सदर मैदान फक्त संस्थेच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या विविध खेळांच्या उपक्रमासाठी वापरण्यात येत आहे. तसेच मैदानावर जेष्ठ नागरीक व्यायामासाठी येत असतात, त्यांना कोणत्याही प्रकारचा निर्बंध करण्यात येत नाही. सदर मैदान बाहेरच्या नागरीकांना खुले केल्यास मैदानावर अपमानास्पद अथवा धमकी देण्याचे प्रकार घडण्याची तसेच

मैदानावर विद्यार्थीनीचा वावर असल्यामुळे असभ्य तसेच अश्लील भाषा वापरणे अशा प्रकारचे घटना वारंवार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासकीय तंत्रनिकेतन, पुणे :- स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचनेनुसार व संस्थेच्या परिसरातील नागरीकांच्या मागणीनुसार दि.११.१०.२०२२ पासून सकाळी ६.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत फिरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय दि.२८.०६.२०२३ नुसार निर्गमित केलेल्या सूचनांनुसार वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत वरील परवानगीने प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महाविद्यालयातील खेळाचे मैदान बाहेरील नागरिकास खुले केल्यास महाविद्यालयीन विद्यार्थी – विद्यार्थीनी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. महाविद्यालय परिसरालगतचे येणारे मुले व मुली यांना प्रवेश दिल्यास महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. यापूर्वी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील मैदान इतर उपयोगाकरीता व बाहेरील नागरिकांना प्रवेश देऊ नये असा विद्यार्थी परिषदेने ठराव घेतला होता. तसेच यापूर्वी महाविद्यालयातील विद्यार्थी व बाहेरील प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बऱ्याच वेळा वादाच्या घटना झालेल्या आहेत. त्यामुळे महाविद्यालयाचे मैदान खुले करणे महाविद्यालयीन प्रशासनास शक्य होणार नसल्याचे कृषी विभागाने कळविलेले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या अखत्यारीत क्रीडांगण, क्रीडा संकूल खेळाडू व नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येतात.

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी (दुसरे) अधिवेशन

विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१३३६

श्री. रत्नाकर  गुट्टे,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात परभणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्यात श्री. संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या गोदावरी काठावरील स्थानास दक्षिण काशी म्हणून ही ओळखले जात असणे पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या प्राचिन व पवित्र घाटावर राज्यभरातून व शेजारील राज्यातील नागरिक येथे दशक्रिया विधी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सतत येत असणे, व संत गजानन महारांजाची पालखी तेथे विसावा घेत असणे, या घाटाची व मंदिरांची वर्षोनुवर्षे कोणतीच देखभाल दुरुस्ती होत नसल्याने या मंदिरांचे अस्तिवच नष्ट होत असणे, मंदिराच्या पाठीमागे असलेला नाला खचत असल्याचे निर्दशनास येवून मंदिरास त्याचा धोका निर्माण झाल्याचे समोर येणे, त्यासाठी या क्षेत्रास तात्काळ पर्यटन तथा तिर्थ क्षेत्र ब व क वर्गाचा दर्जा देवून पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी नागरिकांमधून व लोकप्रतिनीधी कडून वेळोवेळी करुनही प्रशासन कोणतीच दखल घेत नसणे, निधी मिळण्याबाबतची फाईल मुख्यमंत्री महोद्यांकडे प्रलंबित असणे, त्याचा प्रकरण क्र.३०० /नवी १६ असणे, त्यावर अद्याप निर्णय झालेला नसणे, शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत व थोर संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या जनाईनगरीच्या भूमिचे रक्षण करणे गरजेचे असणे, यावर शासनाने करावयाची तात्कळ कार्यवाही व उपाययोजना".

<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन:-</u>

परभणी जिल्हयातील गोदावरी तिरावरील श्री. संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या गंगाखेड स्थानास "क" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त आहे. तीर्थक्षत्र विकास आराखाडा मंजूर केल्यास सदर विकास आराखड्यानुसार विविध विकास कामे हाती घेण्यात येतात व या करीता टप्या टप्याने निधी मंजूर करण्यात येतो.

सदर प्रकरणी तीर्थक्षत्र विकास आराखडा सादर करण्याच्या सूचना नगरपरिषदेस देण्यात आल्या असून नगरपरिषदेकडून सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यास तीर्थक्षत्र विकास आराखड्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही कारण्यात येईल.

गाव

************

रोटा/एच-१२३३[७५०-९-२०२३]•

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री. शिरीष चौधरी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४७६ खालीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील सर्व महानगरपालिका नगरपरिषदा व नगरपालिका यांना त्यांच्या हद्दीतील मालमत्तेचे सर्वेक्षण करून कर आकारणी करणे, दिनांक २० जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार बंधनकारक करण्यात येणे, त्यानुसार सदर मालमत्ता सर्वेक्षण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत किंवा नगरपालिकेमार्फत निविदा काढून खाजगी ठेकेदाराकडून सदर सर्वेक्षण करण्याचे काम संपूर्ण राज्यभरात सुरू असणे, त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिनांक २६ जून, २०२२ रोजी मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याकरता ही निविदा मागविणे, सदर ई-निविदेमध्ये प्री-बीड मीटिंग आयोजित केली असता त्यामध्ये एकूण सात एजन्सीने सहभाग घेतला असणे, सर्वानुमते सदर निवेदेमधील काही अटी तथा शर्तीमध्ये शिथीलता व कमी करण्याची मागणी केलेली असणे, असे असताना देखील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोणतीही अट शिथिल न करता केवळ एकच एजन्सीला सदर निविदा देता येईल अशा प्रकारे सदर काढलेली निविदा कायम ठेवणे, त्यामुळे केवळ स्थापत्य कन्सल्टंट आणि इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड ह्याच कंपनीला सदरची निविदा भरता आली असणे, पहिल्या फेरीत एकच कंपनी आल्यामुळे सदर निविदा दुबार काढण्यात येणे, त्यावेळेस देखील फक्त सदरची कंपनीच निविदेत सहभाग घेऊ शकले असणे, सदर स्थापत्य कन्सल्टंट अँड इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड या एजन्सीने या अगोदर पनवेल महानगरपालिकेमध्ये सुद्धा मालमत्ता सर्वेक्षणाचे काम केलेले असणे, परंतु सदर काम करीत असताना पनवेल महानगरपालिकेने प्रति मालमत्ता सर्वेक्षणाचे दर हे ३८७ रुपये दिलेले असणे व वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी दर प्रति मालमत्ता ७२ रुपये असे असणे, परंतु पिंपरी चिंचवड मध्ये मात्र प्रति मालमत्ता ७८९ रुपये तर वार्षिक देखभाल दुरुस्तीचे १५२ रुपये प्रति मालमत्ता हा दर नमूद केलेला असणे, वास्तविक पाहता पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही पनवेल महानगरपालिकेपेक्षा क्षेत्रफळ व लोकसंख्याच्या तुलनेत फार मोठी असणे, त्यामुळे साधारणत: सदर महानगरपालिकेत काम करताना त्याचा दर पनवेल महानगरपालिका कमी असण्याची आवश्यकता,आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सदर ठेकेदाराशी संगनमत करून आर्थिक दृष्ट्या ठेकेदाराचा फायदा व महानगरपालिकेचा नुकसान होईल अशा प्रकारचे निविदा काढून हेतू परस्पर ठेकेदाराला फायदा पोहोचवण्याचा प्रयत्न करणे, सदर चुकीच्या पद्धतीने काढलेल्या निविदेमुळे व स्पर्धात्मक निविदा न काढल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे म्हणजेच शासनाचे जवळपास ५० ते ६० कोटी रुपयांचे नुकसान होणे, यामुळे येथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांमध्ये आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका व सदर ठेकेदाराविरुद्ध मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने त्वरित आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे निलंबन करून, उच्चस्तरीय चौकशी लावून सदर ठेकेदाराला देखील काळ्या यादीत समावेश करण्याच्या दृष्टीने करावयाची कडक कारवाई व उपाययोजना.""

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या अनुषंगाने भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.मॅपिंग) प्रणालीवर अधारीत मालमत्ता करप्रणालीची राज्यातील क व ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये अंमलबजावणी करण्याबाबत दि.२०.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

शेप H/1130 (५०-४-२३)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वाढते नागरिकीकरण व त्याबाबत द्यावयाच्या नागरी सुविधा व विकास कामे यांच्याकरिता महानगरपालिकांचे स्वउत्पन्न असलेल्या मालमत्ता कर या प्रमुख उत्पन्नाचे स्तोत्राचे बळकटीकरण करून उत्पन्नात स्थायी स्वरूपात वाढ करणे आवश्यक होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात नव्याने झालेली बांधकामे, बांधकामात सुधारणा, उपयोगात बदल तथा वाढीव बांधकामे व वाढते औद्योगीकरणामुळे महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण मालमत्तांचे अद्यावत तंत्रज्ञानाद्वारा प्रत्यक्ष मालमत्ता स्थळ तपासणी करणे, सर्वेक्षण करणे, विविध माहिती संकलित करणे, करमूल्यांकनात सुधारणा तसेच संगणकीकृत कर प्रणालीचे विकसीकरण करण्याकरीता राज्य शासनाचे विविध मार्गदर्शक तत्त्वानुसार व केंद्रीय दक्षता आयोग यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कंत्राटाबाबत संस्थेची नियुक्ती करण्याकरिता राष्ट्रीय स्तरावर निविदा प्रकाशित करून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रिया ही नियमानुसार गुणवत्ता आधारित निवड पध्दतीने (QCBS) मागविण्यात आल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण व करमुल्यांकनाकरिता विहित अटी व शर्ती, तसेच कामाच्या तपशिलानुसार राष्ट्रीय स्तरावर प्रथम निविदा राष्ट्रीय वृत्तपत्रात तथा महाटेडर्स या वेबसाईट वर दिनांक १७/०६/२०२२ रोजी निविदा क्रमांक ०१/२०२२-२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली होती.

यानिविदेची अंदाजपत्रकीय रक्कम ही ४८ कोटी येवढी होती. निविदा पुर्व बैठक दि.२४/०६/२०२२ रोजी बोलविण्यात आलेली होती. त्यास एकूण १० इच्छुक निविदाकारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व स्पष्टीकरणांसह निविदापुर्व बैठकीचे सभावृत्तांत (CSD) दि.२८/०६/२०२२ रोजी महाटेंडर वेबसाईट वर अपलोड करण्यात आले होते. त्यानंतर एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.२३/०७/२०२२ ते १२/०८/२०२२ या कालावधीत फेरनिविदा मागविण्यात आलेली होती. या फेरनिविदेमध्ये दि.२६/०७/२०२२ अखेर ईमेलवर शंका व सूचना मागविण्यात आलेल्या होत्या. या फेरनिविदेस शुध्दीपत्रक क्र. १ अन्वये दि. १४/०८/२०२२ ते २६/०८/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. यानंतर शुध्दीपत्रक क्र. २ अन्वये दि. २६/०८/२०२२ ते १५/०९/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

या फेरनिविदेसाठी प्राप्त झालेले प्रश्न व सूचनांचा खुलासा महाटेंडर या वेबसाईट वर दि.०१/०९/२०२२ रोजी करण्यात आलेला आहे. त्यानंतरही एकच निविदा प्राप्त झालेली होती. यामध्ये मे.स्थापत्य कंन्सल्टंट प्रा.लि. यांच्या तांत्रिक छाननीनंतर आर्थिक लिफाफा दि.२७/०२/२०२३ रोजी उघडण्यात आलेला होता. त्यामध्ये मे. स्थापत्य कंन्सल्टंट प्रा.लि. यांनी सुमारे ६१.०५ कोटी रुपयांची निविदा सादर केलेली होती. अंतिम वाटाघाटी अंती ४७.९५ कोटी म्हणजेच अंदापत्रकीय दरापेक्षा कमी दराने स्विकृत करण्यात आलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१६५१ दि.०२/०५/२०२३ नुसार सदर निविदा मान्य करण्यात आलेली आहे. स्थायी समितीच्या मंजुर ठरावानुसार मे. स्थापत्य कंन्सल्टंट प्रा.लि. यांना दि.०७/०६/२०२३ रोजी कामकाज आदेश देण्यात आलेले आहेत. सदर निविदा तयार करतेवेळी त्यावेळचे इतर महानगरपालिका व नगरपालिका यांचे दर लक्षात घेऊन तयार करण्यात आलेली होती. प्राप्त झालेल्या दरांची सध्याच्या इतर महानगरपालिका व नगरपालिका यांच्याशी तुलना करता कमी दराचे आहेत.

पनवेल महानगरपालिकेचे उद्धृत केलेले प्रति मालमत्ता दर रक्कम रुपये ३८६/- हे सुमारे ६ वर्षापूर्वीचे आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजुर केलेला प्रति मालमत्ता दर हा रुपये ७८९/- नसुन रुपये ६८९/- इतका आहे. तसेच पनवेल महानगरपालिकेचा वार्षिक देखभाल दुरुस्तीचा प्रति मालमत्ता दर रक्कम रुपये ११८/- इतका आहे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा दर हा रुपये ९७/- इतका आहे. निविदा वाजवी दराने मंजुर करण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे भौगोलिक क्षेत्र हे व्यामिश्र स्वरुपाचे असुन त्यामध्ये जुना ग्रामिण भाग, गावठाण, विविध विकास प्राधिकरणामार्फत विकसित झालेल्या बैठ्या मालमत्ता, औद्योगिक मालमत्ता, नव्याने विकसित होत असलेल्या आयटी उद्योगांमुळे नव्याने विकसित होत असलेल्या मालमत्तांचा समावेश आहे. त्यामुळे लहान किंवा मोठे भौगोलिक क्षेत्र अशा निकष लावणे योग्य होणार नाही. सदर निविदा ही सर्वंकष स्वरुपाचे असुन त्यामध्ये प्रत्येक मालमत्तेचे हे वार्षिक भाडेमुल्य व भांडवली मुल्य हे निश्चित होणार आहे. शहरामध्ये समन्यायी कर प्रणाली लागू करण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्प पूर्ण होणे महानगरपालिकेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

या सर्वेक्षणामध्ये शहरातील भोगोलिक परिस्थिती विचारात घेता नव्याने निर्माण झालेल्या व जुन्या मालमत्तांची माहिती संकलन करणे, एजन्सीमार्फत सर्वेक्षणामध्ये संकलीत केलेल्या माहितीची व प्रत्यक्ष मालमत्तांची जूळवणूक करणे, महापालिकेच्या विद्यमान संगणक प्रणालीची माहिती अद्ययावत करणे, तसेच संगणक प्रणाली नव्याने विकसित करणे, इ. कामकाजाचे स्वरूप असून त्यामुळे शहराचे तसेच शहरातील मालमत्तांचे अधुनिकीकरण होणार आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १५६२

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री.निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५६२ खालीलप्रमाणे आहे :-**

"वसई-विरार महापालिकेत कर्मचारी काम करीत असल्याचे दाखवून बोगस कर्मचाऱ्यांच्या नावाचे वेतन आपल्या खिशात टाकणाऱ्या व विरार पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असलेल्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याऐवजी पुन्हा पुन्हा कंत्राट देण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, संबंधित ठेकेदारांतर्फे सदरहू महापालिकेला वकील, अभियंते, डॉक्टर, आरोग्य व अग्निशमन कर्मचारी, संगणक चालक, लिपिक, मंजुर, सुरक्षा रक्षक, वाहनचालक पुरविण्यात येत असणे, महापालिका सदर कंत्राटदारांबरोबर आर्थिक संगनमत करुन बोगस कर्मचारी दाखवून त्यांच्या नावाने पैसे उकळण्यात येत असणे, एवढेच नव्हे तर सदर ठेकेदारांमार्फत ज्या बनावट कर्मचाऱ्यांच्या नावाने वेतन निघत असणे, संबंधित कर्मचाऱ्याला पालिकेत नोकरीचे आमिष दाखवून खात्यात जमा झालेले वेतन काढून पुन्हा स्वत:च्या खिशात घालत असल्याचा प्रकार पालिकेमध्ये कंत्राटदारामार्फत करण्यात येणे, मात्र जे कंत्राटी कामगार अस्तित्वात आहेत त्यांच्या वेतनातील अर्धी रक्कम आणि सरकारचा करही या ठेकेदारांनी हडप केल्याचे उघडकीस येणे, सदरहू कंत्राटदारांनी सन २०१२ ते २०१८ पर्यंत कंत्राटी कामगारांना अर्धा पगार देऊन त्यांच्या पगारातील ९२ कोटी रुपये आणि सरकारचा कर न भरता २९ कोटी रुपये असे मिळून शासन तथा महापालिकेचे सुमारे १२२ कोटी रुपयांचा निधी हडप करुन भ्रष्टाचार करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, सदरहू ठेकेदारांकडे ३ हजार २६५ पेक्षा अधिक कर्मचारी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणे, नियमाप्रमाणे या कंत्राटी कामगारांना किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी देणे आवश्यक असताना सदरहू कंत्राटदार कामगारांना पूर्ण पगार न देता उर्वरित रक्कम स्वत:च हडप करीत असणे, सदरहू २५ भ्रष्ट ठेकेदारांवर विरार पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असतानादेखील ठेकेदारास मुदतवाढ देण्यात येणे, सन २०१९ मध्ये झालेल्या प्रशासकीय ठरावाची ढाल करीत या ठेकेदारांनी मुंबई उच्च न्यायालयातून स्थगिती मिळविल्याचे कारण पुढे करुन नियमबाहय मुदतवाढ मिळविणे, परंतु, आदेशात कुठेही मुदतवाढ देण्यासंदर्भात नमूद नसणे, असे असतानाही या ठेकेदारांना सन २०२० पासून तत्कालीन आयुक्तांनी एकदा तर विद्यमान आयुक्तांनी दोनदा अशी एकूण तीन वेळा मुदतवाढ देणे, यामुळे गुन्हे दाखल असलेल्या संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याऐवजी आयुक्तांनी प्रोत्साहन देऊन पुन्हा ठेके वाटप केल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, सदर प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन गंभीर दखल घेऊन व चौकशी करुन व त्यातील दोषी ठेकेदार / अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र संताप व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार प्रभाग समिती कार्यालय निहाय प्रशासकीय तांत्रिक व विविध विकास कामांच्या सेवा देणे अंतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१५-१६ या कालावधीत महानगरपालिका ठराव दिनांक ०६.०६.२०१२ व दिनांक २१.०६.२०१४ अन्वये मनुष्यबळ पुरविण्याकरीता ठेकेदाराची नेमणूक करण्यात आली होती. तथापि, महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार संबंधित ठेकेदारांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पुरवठा केला आहे.

उपरोक्त कामाकरीता एकूण २५ ठेकेदारास सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ मध्ये महानगरपालिकेने अंदाजित रु. १४३.०१ कोटी ठेकेदारास अदा केले असून त्यापैकी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनापोटीची रक्कम १०८.१६ कोटी इतकी अदा करण्यात आली आहे. तसेच शासकीय वजावटीपोटी रुपये ३४.८५ कोटी इतकी रक्कम कंत्राटदारास अदा केली आहे. दरम्यान महानगरपालिका प्रशासनाने उक्त ठेकेदारांना पुरवठा केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन/ ईपीएफ/ शासकीय वजावटी कपात केलेल्या रकमा इत्यादींचे दस्ताऐवज सादर करण्याच्या वारंवार सूचना दिल्याचे नमूद केले आहे. सदर प्रकरणी संबंधित ठेकेदाराकडून महानगरपालिकेस कोणताही प्रतिसाद दिला नाही. दरम्यान श्री. मनोज पाटील या त्रयस्थ व्यक्तीने केलेल्या वैयक्तिक तक्रारी वरुन महानगरपालिकेच्या संबंधित ठेकेदारांविरुध्द विरार पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण आर्थिक गुन्हे शाखा, पालघर यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. त्याबाबतचा तपास सुरू आहे. उक्त प्रकरणी यापूर्वी विविध विधानमंडळ आयुधांद्वारे या विषयी मुद्दे उपस्थित झाले असून शासन स्तरावरुन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे. दरम्यान प्रस्तुत लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार उल्लेखित २५ ठेकेदारांपैकी २४ ठेकेदाराने प्रलंबित शासकीय कराचा भरणा केला असून उर्वरीत ठेकेदाराची रकमेची भरणा प्रक्रिया सुरु आहे. सन २०१७-१८ नंतर उल्लेखित २५ ठेकेदारांपैकी एकही ठेकेदार महानगरपालिकेच्या आस्थापना विभागात मनुष्यबळ पुरवठ्यामध्ये कार्यरत नसल्याचे महानगरपालिकेने नमूद केले आहे.

तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत कचरा संकलन, गटार सफाई, रस्ते सफाई इत्यादी कामासाठी महानगरपालिका ठराव दिनांक २०.०२.२०१७ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान केली असून या कामासाठी नियुक्त अभिकर्त्याचा त्रैवार्षिक ठेका आजतागायत सुरु आहे. सदरील कामांतर्गत निविदाकारांची मुदत दिनांक २८.०२.२०२१ रोजी संपुष्टात आल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे. तथापि, महानगरपालिकेने सदर कामांतर्गत विविध प्रशासकीय कारणांमुळे व मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेमुळे मंजूर निविदाकार यांना मुदतवाढ देण्यात आल्याचे व सदर प्रकरणी दाखल न्यायालयीन खटल्यामधील पुढील निर्देशानुसार उक्त कामाच्या निविदेबाबत पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र. १६६५

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**श्री. अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६६५ खालीलप्रमाणे आहे :-**

"वसई विरार महापालिकेच्या सहाय्यक लेखाधिकारी अनुजा किणी महाराष्ट्र शासनाच्या वित्तविभाग संचालनालयाने वसई येथील रिक्त पदावर दिनांक ३१ मे, २०२३ रोजी बदली करण्यात आल्याने त्यांनी शासन स्तरावर पुन्हा तिसऱ्यांदा आर्थिक संगमताने मुदतवाढीसाठी राजकीय दबाव आणून प्रयत्न करीत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, प्रशासकीय करनास्तव प्रतिनियुक्तीने सहाय्यक लेखाधिकारी या पदावर अनुजा किणी यांची दिनांक १ जून, २०१८ रोजी नियुक्ती करण्यात येणे, त्याआधी त्यांनी म्हाडा व मुंबई उपनगरात कार्यरत असणे, वसई-विरार महापालिकेत सहाय्यक लेखाधिकारी हे पद नसतानाही हे पद निर्माण करण्यास भाग पाडून त्यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर महापालिकेत तीन वर्षे कार्यकाळ संपल्यानंतर अनु किणी यांनी शासन स्तरावर संबंधित अधिकारी यांचेबरोबर आर्थिक संगनमत करून दिनांक ३१ मे, २०२३ पर्यंतच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता मिळवून पुन्हा विरार महापालिकेत त्याच मान्यता नसलेल्या पदावर कार्यरत असणे, अशा प्रकारे एकाच मान्यता नसलेल्या सहाय्यक लेखाधिकारी पदावर पाच वर्षे काम करणे, आता त्यांची मुदत संपल्यानंतर वसई येथील रिक्त पदावर झालेली बदली रद्द करुन पुन्हा त्याच पदावर प्रतिनियुक्ती मिळावी यासाठी त्या प्रयत्नशील असणे, वसई-विरा महापालिकेत गेली पाच वर्षात फार मोठया प्रमाणात पालिका प्रशासनाच्या आशिर्वादाने अनधिकृत इमारतीची बांधकामे झाल असून त्यानुसार सदर सहाय्यक लेखाधिकारी यांच्या पाच वर्षातील मालमत्तेची शासनाने चौकशी केल्यास कोटयावधी रुपयां घवाड व मालमत्ता मिळण्याची शक्यता असणे, यासाठी किणी यांची तातडीने बदली करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंध विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

वसई विरार शहर महानगरपालिका या "क" वर्ग महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०३.०७.२००९ रोजी शासन अधिसूचनेन्वये करण्यात आली आहे. प्रस्तुत लक्षवेधी सूचनेत उल्लेखीत श्रीमती अनुजा किणी या महाराष्ट्र वित्त व लेखासेवा संवर्गातील सहाय्यक लेखाधिकारी (गट-ब) आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार श्रीमती अनुजा किणी, सहाय्यक लेखाधिकारी, गट-ब यांनी सन २०१७ मध्ये केलेल्या विनंतीस अनुसरुन महानगरपालिकेने संचालक, लेखा व कोषागारे मुंबई यांना पत्र व्यवहार केला असता संचालक लेखा व कोषागारे मुंबई यांनी दिनांक ३१.०५.२०१८ च्या प्रशासकीय बदल्यांच्या आदेशान्वये श्रीमती किणी यांना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सहाय्यक लेखाधिकारी या पदावर प्रतिनियुक्ती दिली आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लेखाधिकारी/उपलेखापाल संवर्गाची दोन पदे व लेखाधिकारी श्रेणी अ संवर्गाचे एक पद मंजूर आहे.

[कृ.मा.प.

तथापि, यापूर्वी श्रीमती अनुजा किणी या दिनांक ०१.०८.२०१४ ते दिनांक ३१.०५.२०१८ या कालावधीत म्हाडा येथे कार्यरत होत्या.

श्रीमती किणी या दिनांक ३१.०५.२०१८ च्या आदेशास अनुसरुन दिनांक ०२.०६.२०१८ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेत रुजू झाल्या आहेत. तद्नंतर श्रीमती किणी यांना वैद्यकिय कारणास्तव दिनांक ३१.०५.२०२३ पर्यंत संचालक, लेखा व कोषागारे मुंबई यांच्या मार्फत मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापि, दिनांक ०२.०६.२०२३ च्या आदेशान्वये त्यांची मिरा भाईंदर पोलीस आयुक्त कार्यालयात प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे. उपरोक्त प्रकरणी संचालक, लेखा व कोषागारे मुंबई यांनी पुनःश्च मुदतवाढ देणे शक्य नसल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेस कळविले आहे.

तथापि, सद्यस्थितीत महानगरपालिकेमध्ये स्थानिक निधी लेखा परिक्षक यांच्यामार्फत लेखा परिक्षण सुरु असल्याने श्रीमती किणी यांना दिनांक ३१.०७.२०२३ (म.न.) पासून दिनांक २४.०७.२०२३ रोजीच्या महानगरपालिकेच्या आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच श्रीमती किणी यांच्या संदर्भात महानगरपालिका स्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात आल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

****

एच-११७३ -१अ.

लक्षवेधी सुचना क्र.१८२९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
दुसरे (पावसाळी)

मा.श्री.रविशेठ पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२९ पुढीलप्रमाणे आहे :-

"रायगड जिल्हयातील ता.पेण मधील बाळगंगा धरणग्रस्तांचे प्रश्न मागील १३ वर्षापासून अजूनही न सुटल्याने प्रकल्पग्रस्तांना आजही न्याय मिळालेला नाही. बाळगंगा धरण प्रकल्प नदी मुंबईतील पाण्याची गरज पुरविण्यासाठी सिडको मार्फत राबविणेत येत आहे. तशा प्रकारचा करार सिडको व शासन यांचेमध्ये झालेला आहे. शासनाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व सोयीसुविधा पूर्ण करण्याची जबाबदारी विविध विभागांना दिलेली असणे, परंतू या विभागांचा आपआपसात ताळमेळ नसणे, त्यामुळे ती जबाबदारी रदद करून प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन सिडकोमार्फत करण्यात यावे, प्रकल्पावेळी जाहीर झालेल्या निवाडयात घरे, मंदिर, झाडे, फळझाडे, पॅकेज, आकारफोड न झालेले क्षेत्र याची फेरतपासणी, फेरमूल्यांकन व फेरनिवाडयाव्दारे सरसकट सर्वांना सारखाच दर देणे, धरणाशेजारील गावांना शाळा, दवाखाना, स्मशानभूमी, पोलिस ठाणे, पंतप्रधान किसान योजनेचे लाभ न मिळणे, पुरपरिस्थितीत होणाऱ्या नुकसानाची भरपाई न मिळणे, रस्त्यांचे प्रश्न त्याचप्रमाणे त्यांचे पुनर्वसन लाभ क्षेत्रात करणे, नागपूर अधिवेशनात मा. गृहमंत्री महोदयांना आश्वासन देवूनही आंदोलनकर्त्यांवर झालेल्या केसेस अद्याप मागे न घेणे, मुलभूत व नागरी सोवीसुविधा मिळणे, मात्र, अद्याप एकही मागणी पूर्ण न झाल्यामुळे बाळगंगा धरण संघर्ष व पुनर्वसन समितीकडून सातत्याने पुनर्वसनाची मागणी व निदर्शने केली जाणे, मा जिल्हाधिकारी, रायगड व राज्य शासनाकडे अनेक निवेदने देवूनही याबाबत शासनाने कुठल्याही प्रकारची दखल न घेणे, यामुळे प्रकल्पग्रस्तामध्ये शासनाविरुध्द पसरलेली नाराजी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांना न्याय व दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### मा.मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

बाळगंगा नदी प्रकल्प हा पाणी पुरवठा प्रकल्प असुन रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात बाळगंगा नदीवर निफाड येथे प्रस्तावित आहे. या प्रकल्पामधुन सिडको विकसीत क्षेत्रासाठी घरगुती व औद्योगिक वापरासाठी ३५० दलली/दिन पाणीपुरवठा होणार आहे. सिडकोने संचालक मंडळाच्या ठराव क्र.१००७०, दि.२४.०२.२००९ अन्वये बाळगंगा प्रकल्पास मान्यता प्राप्त झाली असून महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.१५.०२.२०१० च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्प जलसंपदा विभागांतर्गत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ (कोपाविम) मार्फत सिडकोसाठी ठेव तत्वावर बांधण्यात येत असून निधीची पुर्तता सिडको मार्फत करण्यात येत आहे, त्यासंदर्भात सिडको व कोपाविम मध्ये दि.२३.०९.२००९ रोजी प्रकल्पाचा करारनामा करण्यात आला आहे.

सदर कार्यारंभ आदेशानुसार व करारानाम्यानुसार भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन वळतीकरण, जलसंपत्ती प्राधिकरण मान्यता व संकल्पन व इतर संविधानीक मान्यता कोपाविमने पुर्ण करणे बंधनकारक असून सन २०१० मध्ये काम सुरू करण्यात आले.

प्रत्यक्षात मात्र कोपाविम व सिडको यांच्यामधील सामंजस्य करारातील कलम क्र. ब-१२ आणि ब-१३ नुसार ही परवानगी घेणे बंधनकारक आहे.

सदर प्रकल्पाच्या किंमतीत झालेली वाढ, अतिरिक्त बाबी व त्यांचे दर आणि अतिरिक्त जादा कामांची निविदा तरतुदी नुसार योग्यता तपासण्याकरीता एकूण ४ तांत्रिक समित्यांचे गठण करण्यात होते.

सिडकोने आजपर्यंत या प्रकल्पावर रू.१४४९ कोटी इतके  कोटी खर्च केलेले आहेत. प्रकल्पाची आज रोजीची किंमत रू.२७७५ कोटी एवढी झाली आहे.

सद्यस्थितीत, या संदर्भात सिडको संचालक मंडळाची दि.१३.०७.२०२३ रोजी बैठक झाली आहे. तसेच मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०३.२०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या ठरावानुसार "बाळगंगा प्रकल्प शासनास वर्ग करण्याचा निर्णय घेवून प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या स्तरावर मान्यता घेण्यासाठी जलसंपदा विभागास सादर करण्यात यावा व शासन स्तरावर सदर प्रकल्पासाठी पुढील निधीची उपलब्धता करावी. प्रकल्प जलसंपदा विभागाकडे वर्ग करुन त्या विभागाकडून करण्याचा निर्णय घेतल्यास सिडकोसाठी पाण्याचे दर ठरवितांना सिडकोने प्रकल्पामध्ये केलेल्या गुंतवणुकीचा विचार करुन प्रचलीत शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी," असे निर्देश देण्यात आले आहेत.

बाळगंगा नदी प्रकल्प हा कोपाविम मार्फत सिडकोसाठी ठेव तत्वावर बांधण्यात येत असून भूसंपादनाचे काम कोपाविम व जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत करण्यात येत आहे.भूसंपादनासाठी  ११२१३.०९ हे. क्षेत्राचे निवाडे  २०१५ मध्ये घोषित होवून त्यासाठी रू.६०० कोटी अदा करण्यात आले असून अदयाप पर्यंत फक्त ६०० हे. क्षेत्राचा ताबा घेण्यात आला. उर्वरीत क्षेत्राचा ताबा घेण्याचे काम अपुर्ण आहे. तसेच पुनर्वसनाचे काम कोपाविम व जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत करण्यात येत आहे.

सिडको महामंडळास पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सिडको व्यवस्थापनाने भूसंपादन, पुर्नवसन, वनजमिन वळतीकरण व इतर अनुषांगिक परवानग्या प्राप्त करण्यासाठी मागील तीन वर्षात वेळोवेळी मुख्य अभियंता जलसंपदा, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत.

तरी सदर प्रकल्प प्राधान्याने पुर्ण करुन व त्यामधून उपलब्ध होणारा ३५० दललि/दिन पाणीपुरवठा सिडकोकरीता राखीव ठेवावा व सिडकोने आतापर्यंत प्रकल्पावर केलेला खर्च पाण्याचे दर ठरविताना विचारात घ्यावा असे जलसंपदा विभागास सिडकोमार्फत कळविण्यात आले आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, श्री. विजय वडेट्टीवार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील डोंबिवली पश्चिमेकडील रेतीबंदर चौकाजवळील रेल्वे मार्गाजवळ भूमाफियांनी सात मजली इमारतीचे बेकायदा व अनधिकृत बांधकाम केल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू भुमाफियांनी रेल्वे मार्गीकेपासून ३० ते ३५ फूट अंतरावर रेल्वे नियमांचे उल्लंघन करून सात मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात येणे, तसेच रेतीबंदर चौका जवळील गावदेवी हाईट्स इमारतीच्या बाजुला आणि अतिथी हॉटेलच्या समोर मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर हिरवे जाळीचे पडदे लावून सदरहू इमारतींचे बांधकाम रात्रंदिवस करण्यात येणे, याच भागात गेली सहा महिन्यांच्या कालावधीत अन्य दोन बेकायदा इमारतींची अनधिकृत बांधकामे करण्यात येणे, भूमाफिया तथा विकासकांनी सदरहू तीनही इमारतींची अनधिकृत बांधकामे कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर आर्थिक संगनमत करून बांधण्यात येणे, कल्याण डोंबिवली महापालिकेच्या विकास आराखडयात रेतीबंदर ते सत्यवान चौक ते स्मशानभूमीचा १५ मिटर रस्ताच्या रूंदीकरणामध्ये सदरहू तीनही बेकायदा व अनधिकृत बांधकाम केलेल्या इमारतींचा अडथळा येत असल्याने रस्ता रूंदीकरणाच्या कामात सदरहू इमारती निष्कासित करण्याची आवश्यकता असणे, सदरहू बांधकाम केलेल्या तीनही अनधिकृत इमारतींपासून ३५ फूट अंतरावर रेल्वे मार्गीका असून अतिथी हॉटेलच्या बाजूने नवी दिल्ली ते जेएनपीटी (उरण) पर्यंत जलदगती रेल्वे मालवाहतूकीचा मार्ग असल्याने जलदगतीने धावणाऱ्या रेल्वेमुळे बांधकाम केलेल्या अनधिकृत इमारतींना हादरा बसून अल्पावधीतच सदरहू इमारती कोसळण्याचा निर्माण झालेला धोका, असे असतानाही बांधकाम करणारे भूमाफिया नफेखोरीच्या लालसेपोटी कायद्याचे ज्ञान नसलेल्या गरजू नागरिकांना स्वस्तात घरे विक्री करून त्यांची मोठया प्रमाणात फसवणूक होण्याचा निर्माण झालेला धोका, सदरहू अनधिकृत इमारत बांधकाम प्रकरणी महापालिका आयुक्तांनी "ह" प्रभागातील अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी प्रत्येक प्रभागात बिट मुकादमाची नेमणूक करण्यात येऊनही देवीपाडा येथील तीन अनधिकृत इमारती निष्कासित करणेबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, या सर्व प्रकाराची चौकशी करून 'ह' प्रभागाचे सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी यांचेसह बीट निरीक्षक, अभियंता सुनिल महादळेकर यांचेसह तुकाराम साबळे, योगेश गवारी, दिपक ठोंबरे, नंदकिशोर राणे, व बाळाराम भाग्यवंत यांना तात्काळ निलंबित करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया"

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या "ह" प्रभागक्षेत्राअंतर्गत डोंबिवली पश्चिमेकडील रेतीबंदर चौकाजवळ इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रभाग कार्यालयाच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६० व २६७ (१) व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२,५३ नुसार, दि. २६.९.२०२२ रोजी नोटिस देण्यात आलेली आहे. सदर बांधकामधारकास दि.०३.१०.२०२२ रोजी बांधकामासंबंधी अधिकृतते बाबतची कागदपत्रे सादर करणेकामी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. बांधकामधारक सदर सुनावणीस उपस्थित राहीले नसल्याने, तसेच, संबंधित बांधकामाबाबत अधिकृततेची कागदपत्रे सादर केली नसल्याने, सदरचे बांधकाम सुनावणीअंती तत्कालीन सहायक आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६० (२) नुसार दि.२१.१०.२०२२ रोजीच्या आदेशान्वये अनधिकृत घोषित केले आहे. तसेच, सदर बांधकामावर दि. १४.०६.२०२३ रोजी अंशत: निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे व दि. १०.८.२०२३ रोजी पुनश्चः कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

सदर बांधकामाच्या ठिकाणी बांधकामधारक पुनश्चः बांधकाम करित असल्याचे समजल्यावरून बांधकामधारक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ (२) नुसार, दि. १८.०७.२०२३ रोजी नोटिस देऊन बांधकामाचे ठिकाणी प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणच्या बांधकामापैकी गांवदेवी हाईट्स नामे या इमारतीस प्रभाग कार्यालयामार्फत दि.०६.०१.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अनधिकृत घोषित करण्यात आलेले आहे. तसेच, बांधकामधारकावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३९७ (अ)

नुसार गु.र.क. ३५, दि. २४.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर इमारतीत एकुण २८ सदनिका वापरात असुन सदर सदनिकाधारकांस सदनिका रिकामी करून घेणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६८ (१) (अ) नुसार नोटिसा देण्यात आलेल्या आहेत.

सदर बांधकाम रेल्वे मार्गीकेपासून सुमारे ५० मीटर अंतरावर असल्याचे आढळते. इमारतीपासुन ३५ फुट अंतरावर रेल्वे मार्गीका असून अतिथी हॉटेलच्या बाजुने नवी दिल्ली ते जेएनपीटी (ण) पर्यंत जलदगती रेल्वे मालवाहतूकीचा मार्ग असल्याने रेल्वेमुळे बांधकाम केलेल्या अनधिकृत इमारतींना हादरा बसून सदर इमारतीच्या निर्माण झालेला धोका असणे, अशी वस्तुस्थिती नाही. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या विकास आराखडयात रेतीबंदर ते सत्यवान चौक ते स्मशानभूमीचा रस्ता १५ मी. आहे. सदर रस्त्याच्या रूदिकरणात बांधकामे बाधित होत नाहीत.

भविष्यात अशाप्रकारची रेरा प्राधिकरणाची व नागरिकांची फसवणूक होऊ नये, याकरिता Building Plan Management System ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. त्यामुळे सदर परवानगीची बनावट कागदपत्रे तयार करणे शक्य होणार नाही. तसेच, सदर परवानग्या या महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर देखील त्वरीत प्रसिध्द करण्यात येत असून, रेरा प्राधिकरणास देखील सदर परवानगीची वैधता संकेतस्थळावरून करता येते.

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामामुळे होणाऱ्या सर्वसामान्य नागरीकांची फसवणूक टाळण्यासाठी दि.०३ मे २०१८ अन्वये शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर शासन परिपत्रकात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने या महापालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येते.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करून सन २०१० ते २०१८ अखेरपर्यंत घोषित केलेली एकूण ३५५६ अनधिकृत बांधकामांची यादी आणि एमएमआरडीए कडून प्राप्त झालेल्या २२९ अनधिकृत बांधकामांची यादी अशा एकूण ३७८५ इतकी अनधिकृत बांधकामे नागरिकांच्या पाहणीसाठी महापालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याबाबत, तशी जाहिर सूचना" वर्तमान पत्रात दि.२६/०७/२०१८ रोजी व्यापक प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, महापालिकेच्या नगररचना विभागामार्फत महापालिकेची परवानगी प्राप्त झालेल्या एकूण १०९९६ इतक्या अधिकृत बांधकामाची यादी महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. तसेच, महापालिकेच्या विधी विभागामार्फत मा. न्यायालयात अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही संदर्भात एकूण २४७६ प्रकरणी कॅव्हेट caveat दाखल करण्यात आलेले आहेत.

महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकाम संबंधाने तक्रारी करण्याकरीता टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४३९३ उपलब्ध करुन दिला आहे. बहुमजली आर. सी. सी. बांधकामाच्या संदर्भात समोचित नियोजन प्राधिकरण यांचेकडून प्रदान केलेल्या बांधकाम परवानगी विषयी खात्री करुनच खरेदी विक्रिचे व्यवहार करावेत, कोणत्याही प्रकारची चौकशी न करता घर खरेदी केल्यास आपले मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा कोणत्याही बांधकाम व्यवसायीक/एजंट/ दलाल यांच्या भुलथापांना, खोट्या आणि फसव्या वर्तमान पत्रातील जाहिरातीला नागरिकांनी बळी पडू नये असे महापालिकेतर्फे सर्व नागरिकांना "जाहिर आवाहन" देखील करण्यात आले आहे. खरेदी करत असलेली घर अधिकृत आहे किंवा नाही याची माहिती मिळण्यासाठी हेल्प लाईन क्र. १८००-२३३-७२९५ उपलब्ध करण्यात आला आहे.

नागरी क्षेत्रात होणाऱ्या अनधिकृत बांधकामामुळे सर्वासामान्य नागरिकांची विकासकाकडून होणारी फसवणूक रोखण्यासाठी, राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या नागरी क्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांना जारी करण्यारत येणारी प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे त्यांच्या संकेतस्थळावर तसेच, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) यांना उपलब्ध करून देण्याबाबत दि.२३.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दि. २ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार व शासन परिपत्रक दि. ०३ मे २०१८ रोजीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनेच्या अनुषंगाने या महापालिकेने आवश्यक ती कार्यवाही केली असून व या पुढेही निरंतर कार्यवाही करण्यात येत आहे.

********

८८.

**लक्षवेधी सूचना** **गृह विभाग**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

श्री. प्रदीप जैस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास मु.पो. मिरा-भाईंदर रोडवर सिल्वर पार्क नाका येथे चंद्रश इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर असलेल्या सदनिकेमध्ये बेकायदा बदल करून मंडोना उर्फ खुशी ऑर्केस्ट्रा बार सुरू करण्यात आल्याची बाब उघडकीस येणे, स्थानिक रहिवाश्यांनी म.न.पा. पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभाग, ठाणे यांच्याकडे केलेल्या असंख्य तक्रारी, तरीही संबंधित बेकायदा बार विरोधात कारवाई होत नसल्याने नागरिकांनी सदर बार बाहेरून बंद करून पोलिसांना बोलावून घाट टाकायला लावणे, पोलिसांनी बार मालक विरोधात नागरिकांच्या वाढत्या मागणी मुळे गुन्हा दाखल करणे, फ्लॅट क्र- १०२, १०३, १०४ एकत्र करून अनधिकृत बांधकामे केल्याचे तपासात उघड होणे, नागरिकांना डाचत ११२ वर कॉल करून पोलिसांना बोलवावे लागते, सदर इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर एका सदनिकेमध्ये लपून बसलेल्या १० मुलींना नागरिकांनी पोलिसांच्या स्वाधीन करणे, स्थानिक नागरिकांनी म.न.पा. पोलीस व राज्य उत्पादक शुल्क विभाग, ठाणे यांच्याकडे वारंवार या बेकायदा डान्स बार विरोधात केलेल्या तक्रारी, परंतु बार मालकाबरोबर झालेल्या आर्थिक हातमिळवणी मुळे एकाही विभागाने नागरिकांच्या तक्रारीकडे गांभीर्याने न बघता कारवाई करण्यास केलेला अक्षम्य हेतुता विलंब व दिरंगाई, परिणामी नागरिकांना पुढाकार घेऊन ही कारवाई करावी लागल्याने नागरिकांचा कायदा व सुव्यवस्था वरील उडालेला विश्वास व शासनाच्या डान्सबार वाल्यांना होणाऱ्या सहकाऱ्या मुळे नागरिकांच्या मनात बेकायदेशीर निर्माण झालेली चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

### मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

मंडोना उर्फ खुशी ऑर्केस्ट्रा बार ॲण्ड रेस्टॉरंट ही आस्थापना चंद्रेश आर्केड, बि.क्र. ९, सिल्वर पार्क, मिरा-भाईदर रोड, मिरारोड पूर्व, ता. जि. ठाणे येथे मिरा-भाईदर वसई विरार, पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात आहे. खुशी (मॅडोना) ऑर्केस्ट्रा बार येथे मोठया प्रमाणात मुली असल्याबाबत दिनांक १८.०६.२०२३ रोजी ११२ डायल प्रणालीवर कॉल प्राप्त झाला होता. त्यानुषंगाने मिरारोड पोलीस ठाणे बीट मार्शल क्र. १ करीता असलेले पोलीस हवालदार व पोलीस अंमलदार यांनी खुशी (मॅडोना) ऑर्केस्ट्रा बार, बिट क्रमांक ९ , चंद्रेश ॲकॉर्ड, मिरारोड पूर्व या ठिकाणची पाहणी केली असता, मॅडोना बार मध्ये महिला आढळून आल्या नाहीत. तद्नंतर पोलीस उपनिरीक्षक यांनी दोन पंचांसमक्ष खुशी (मॅडोना) ऑर्केस्ट्रा बार येथील स्थळ पाहणी पंचनामा केला असता, त्यांना बारमध्ये कोणीही महिला आढळून आली नाही. तथापि कॉलरने दिलेल्या माहीतीप्रमाणे बिट क्रमांक ९ मधील रुम क्र. २०४ ची पाहणी केली असता, रुम मध्ये एकूण १० महिला आढळून आल्या. याबाबत बार मॅनेजर यांचेकडे विचारपूस केली असता, त्यांनी सदर महिलांपैकी काही महिला दिवसपाळी डयुटी करुन घरी जाणाऱ्या व

काही महिला रात्री डयुटीकरीता येणाऱ्या असलेबाबत माहिती देऊन, त्या रुममध्ये फ्रेश होण्याकरीता किंवा कपडे बदलण्याकरीता आल्या असल्याबाबत माहिती दिली. तद्‌नंतर सदर महिलांची ओळख पटवून घेऊन, त्यांची सविस्तर माहिती नोंद करुन त्यांना सोडण्यात आले होते. तथापि, शासनाने ठरवून दिलेल्या परवानगीपेक्षा जास्त सिंगर महिला खुशी बारचे आराम रुममध्ये आढळल्याने बार मॅनेजर यांचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे अदखलपात्र (पोलीस) गुन्हा नोंद क्र. १३८/२०२३, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (डब्ल्यू)/ १३१ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. खुशी (मॅडोना) ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनेविरुध्द वेळोवेळी केलेल्या अनियमिततेच्या संदर्भात सन २०१० ते माहे जानेवारी,२०२३ पर्यंत एकूण १० दखलपात्र गुन्हयांची नोंद करण्यात आलेली आहे. ऑर्केस्ट्रा परवानाधारक वेळोवेळी परवान्यामध्ये दिलेल्या अटी व शर्तींचा भंग करीत असल्याने सदर आस्थापनेचा ऑर्केस्ट्रा परवाना दि.२४/०३/२०२३ रोजी सलग २० दिवसांसाठी निलंबित करण्यात आला आहे.

तसेच निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सी विभाग, ठाणे यांनी मे. खुशी रेस्टॉरंट व बार, एफएल-३/११५२, चंद्रेश आर्केड, सिल्व्हर पार्क , मिरारोड (पू) ठाणे या अनुज्ञप्तीचे दिनांक १६/०६/२०२३ रोजी नियमित कार्यवाहीच्या अनुषंगाने निरीक्षण करुन आढळलेल्या विसंगतीच्या अनुषंगाने अनुज्ञप्तीधारकास क्रमांक-४९ अन्वये जागीच आरोपपत्र बजावण्यात आलेले आहे. अनुज्ञप्तीधारकाने मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मधील नियम क्र. ४९ (१), ५०, ५३ (२) व ५८ तसेच मा. आयुक्त राज्य उत्पादन शुल्क म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. एफएलआर ११८५/३/४२८११/१४, दि. ०४/०९/१९८५ त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन राजपत्रामधील रोजगाराचे विनियमन करणे बाबतचे नियम १९९६ चे नियम क्र. ३ चे उल्लंघन केले असल्याने, सदर अनुज्ञप्तीधारकाविरुध्द कडक कारवाईबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर आस्थापनेने मूळ बांधकामात बदल केल्याची माहीती मिळाल्याने सदर आस्थापनेची पाहणी करून अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई होणेकरीता व कारवाई दरम्यान पोलीस बंदोबस्त पुरविण्याची तजविज ठेवल्याबाबत आयुक्त,मिरा-भाईंदर महानगर पालिका व नगररचना विभाग,मिरा-भाईंदर यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर इमारतीमधील सदनिकेच्या वापरात बदल केलेप्रकरणी आयुक्त, मिरा भाईंदर, महानगरपालिका यांच्या दि.२१.०२.२०२३ रोजीच्या आदेशानुसार बांधकाम धारक यांनी सदनिकेच्या रहिवास वापरा ऐवजी सुरु केलेला व्यावसायिक वापर बंद करणे बाबत तसेच सदर आदेशाचे पालन करण्यास बांधकाम धारक यांनी कसूर केल्यास महानगरपालिकेमार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील अनुसूची ड मधील प्रकरण १२ मधील अनुक्रमांक १० नुसार कार्यवाही करण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

-----------------

लक्षवेधी सूचना क्र. १५२३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, श्री. मोहनराव हंबर्डे, वि. स. स.

"ठाणे जिल्हयातील जेष्ठ नागरिक व महिला यांची फसवणूक करुन त्यांची जमिन व पैसा हडपल्याने त्यांच्या सुरक्षेला मोठा धोका पोहोचलेला असल्यामुळे त्यासंदर्भात वेळोवेळी जेष्ठ नागरिक पुरुषोत्तम महिजीभाई पटेल व इतर नागरिकांना अप्पर पोलिस महासंचालक नागरी हक्क संरक्षण मुंबई व पोलिस अधिक्षक नागरी हक्क संरक्षण, नवी मुंबई यांच्याकडे दिनांक २८ जून, २०२३ रोजी रितसर तकार देऊनही त्याबाबत संबंधित जेष्ठ नागरिक व महिलांना तक्रारीच्या अनुषंगाने कुठलाही कारवाई संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली नसल्यामुळे ठाणे जिल्हयातील ठाणे पोलिस आयुक्तालय, मीरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय व पोलिस अधिक्षक, ठाणे यांच्याकडे कित्येक वर्षापासून तकारी प्रलंबित असणे व त्यांची दखल गैरव्यवहारामुळे पोलिस अधिकारी घेत नसल्यामुळे संबंधित जेष्ठ नागरिक व महिलांनी नागरी हक्क संरक्षण यांच्याकडे न्याय मागणे, परंतु नागरी हक्क संरक्षण या विभागाचे कधीही ठोस कारवाई करतांना दिसून आलेले नसणे, कुठल्याही वर्तमानपत्रातून नागरी हक्क संरक्षण विभाग नेमक काय करतय नेमक हे विभाग कशासाठी आहे, याची जनतेमध्ये नागरी हक्क संरक्षण विभागाने जागरुकता निर्माण करणे, नागरी हक्क संरक्षणाचे कार्य धिम्या गतीने चालत असल्यामुळे अनुसूचित जाती-जमातीचे लोक जेष्ठ नागरिक विधवा महिला व इतर दुर्बल महिला यांची सुरक्षा धोक्यात आलेली आहे, कारण स्थानिक पोलिस स्टेशनचा गैरव्यवहार मोठया प्रमाणात वाढलेला असल्यामुळे जेष्ठ नागरिक व महिलांनी कोणाकडे दाद मागावी याचे उत्तर आजपर्यंत जनतेला मिळालेले नसणे, परंतु दुर्बल घटकांसाठी व कमजोर लोकांसाठी जेष्ठ महिलांसाठी नागरी हक्क संरक्षण विभाग कार्यरत असेल तर त्यांचे ठोस कार्य असे कोठेही दिसून येत नाही, त्यामुळे कुंपणच शेत खाते की काय अशी भावना जेष्ठ नागरिकामध्ये व महिलांमध्ये निर्माण झालेली आहे, तरी ठाणे जिल्हयातील विविध पोलिस स्टेशनला ज्या काही जेष्ठ नागरिकांनी तक्रारी करणे, त्या तक्रारीची गंभीर दखल घेऊन त्यांची जी काय संपत्ती हडपण्यात आली अथवा त्यांचे पैसे हडपण्यात आले अशा भामटे आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यासाठी व जेष्ठ नागरिकांना व महिलांना न्याय देण्यासाठी शासनाने जेष्ठ नागरिक व महिला यांच्या संपत्तीच्या संरक्षणासाठी नागरी हक्क संरक्षण विभाग यांना कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

रोटा/एच-११९०[७५०-९-२०२३]-१

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

पुरुषोत्तम महिजीभाई पटेल यांनी अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस अधिक्षक, नागरी हक्क संरक्षण, नवी मुंबई यांचेकडे दिनांक १३/०३/२०२३ रोजी दिलेल्या तक्रार अर्जात नमूद नागरिकांच्या तक्रारींची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे-

१) श्रीमती कनकीबाई हेंदर म्हात्रे यांनी जमीन मिळकतीबाबत केलेला अर्ज दिनांक ३०/०४/२०२२ रोजी नारपोली पोलीस स्टेशन येथे प्राप्त असून सदर प्रकरण मा. दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने सी.आर.पी.सी. १४९ प्रमाणे एकास शांतता भंग न करण्याची नोटीस देण्यात आली आहे. सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने तसेच दिवाणी स्वरुपाचा असल्याने सदर अर्ज हा दफ्तरी फाईल करण्यात आला आहे.

२) ज्येष्ठ नागरिक श्री. काथोड रामभाऊ नवले यांनी फसवणूक व जमिन हडपल्याबाबत दिनांक २९/०७/२०२१ रोजी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, उल्हासनगर कार्यालयात अर्ज केला होता. सदर अर्जातील विषय हा दिवाणी स्वरुपाचा असल्याने अर्जदारास मा. दिवाणी न्यायालयात दाद मागण्याची सूचना देऊन त्यांचा अर्ज दफ्तरी फाईल करण्यात आला आहे.

३) श्रीमती सॅण्ड्रा ऑगस्टीन अल्मेडा यांचेमार्फत कुलमुखत्यार पत्रधारक श्री. नागेश किसनराव निमकर यांनी उत्तन सागरी पोलीस स्टेशन येथे जमिनीच्या विवादाबाबत अर्ज केला होता. सदर अर्जामध्ये कोठेही जिवे/ठार मारण्याची धमकी दिल्याचा उल्लेख नाही. सबंधित जमिनीबाबत अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांचेकडे सुनावणी होऊन सदर जमिनीच्या ७/१२ उता-यावर सॅण्ड्रा ऑगस्टीन अल्मेडा व ऑगस्टीन जोजफ अल्मेडा यांची नावे लागल्याने त्यांची कोणाविरुद्धही तक्रार नसल्याचे कुलमुखत्यार पत्रधारक श्री. नागेश किसनराव निमकर यांनी दिनांक १०/०५/२०२२ रोजी दिलेल्या जबाबात सांगितल्याने सदरचा तक्रार अर्ज हा दफ्तरी दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर त्यांचा कोणताही तक्रार अर्ज सदर पोलीस स्टेशनला प्राप्त नसल्याचे उत्तन सागरी पोलीस स्टेशन यांनी कळविले आहे.

४) श्री. अनिल सावंत यांनी एका चिटफंड मध्ये सन २०१६ मध्ये केलेल्या गुंतवणुकीतील पैसे परत मिळण्याबाबत तक्रार केली होती. सदर प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याने त्यांना दिवाणी न्यायालयात दाद मागण्याची सूचना देण्यात आली आहे.

श्री.पुरुषोत्तम महिजीभाई पटेल यांनी अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस अधिक्षक, नागरी हक्क संरक्षण, नवी मुंबई यांचेकडे दिनांक २६/०६/२०२३ रोजी दिलेला तक्रार अर्ज दिनांक २६/०७/२०२३ रोजी नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे पाठविण्यात आला असून सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

ठाणे ग्रामिण क्षेत्रात ज्येष्ठ नागरिक व महिला यांची फसवणूक करून त्यांची जमिन व पैसा हडपल्याच्या संदर्भात सन २०२३ मध्ये आतापर्यंत १ अर्ज प्राप्त असून सदर प्रकरणी कार्यवाही करून तो दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय क्षेत्रात ज्येष्ठ नागरिक व महिला यांची फसवणूक करून त्यांची जमिन व पैसा हडपल्याच्या संदर्भात सन २०२३ मध्ये आतापर्यंत एकुण १८ अर्ज प्राप्त झाले असून त्यातील १२ प्रकरणे ही पोलीस तपासावर आहेत, ३ प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, २ प्रकरणांची अ-समरी दाखल करण्यात आली आहे तर एका प्रकरणी क-समरी दाखल करण्यात आली आहे.

महिलांच्या संदर्भातील गंभीर गुन्ह्यांबाबतच्या तक्रारी या महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाद्वारे हाताळण्यात येतात. राज्यातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

अनुसुचित जाती, जमाती, ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला व इतर दुर्बल महिला यांच्या तक्रारीची तात्काळ नोंद घेण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण विभाग यांचेमार्फत नागरी हक्क संरक्षण कायदा,१९५५ तसेच अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९८९ कायद्याच्या प्रभावी अमंलबजावणी करण्यात येते. अनुसूचित जाती व जमाती च्या लोकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये याकरिता वेळोवळी कार्यशाळा, बैठका, आढावाबैठका आयोजीत करण्यात येतात. तसेच विभागाद्वारे अट्रॉसिटीसंबंधीत गुन्हा दाखल झालेल्या ठिकाणी भेट देण्यात येते तसेच सदर गुन्ह्यातील फिर्यादी / पिडीत यांना त्यांच्या अधिकाराबाबत, शासकीय मदतीबाबत माहिति दिली जाते.

---

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन २०२३

**लक्षवेधी सूचना क्र. ९५०**

मा.श्री.अभिमन्यू पवार, विधानसभा सदस्य यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९५० पुढीलप्रमाणे आहे:-

"मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेड ही सोलापूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात कार्यरत असलेली व हैद्राबाद मुक्ती संग्रामातील अग्रणी नेते व स्वातंत्र्य सैनिक स्वामी रामानंद तीर्थ व त्यांच्या सहकार्यांनी स्थापन केलेली संस्था असणे/ सदरील संस्थेत कुशल व अकुशल अश्या २००० पेक्षाही अधिक कामगारासाठी कायस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता असणे, सदरील संस्थेअंतर्गत सद्यस्थितीत बेकायदेशीर पणे कार्यरत असलेल्या विश्वस्त मंडळाच्या अनागोंदी कारभाराबाबत व गैरव्यवहार सदरील न्यासाच्या आज रोजी कार्यरत असलेल्या विश्वस्तांविरुद्ध महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ ड प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत प्र. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ नांदेड विभाग नांदेड यांनी दि.१६/१२/२०२२ च्या पत्रान्वये धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे उचित नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव सादर केला असणे, सदरील प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रलंबित असणे, सदरील संस्थेची मालमत्ता बेकायदेशीर विक्री व लीजवर देणे, अतिक्रमण धारकांना नियमबाह्य ताबा देणे, आदी १ कोटी २० लक्ष रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता या विश्वस्त मंडळाने केली असल्याचे निदर्शनास येणे, सदरील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी सदरील विश्वस्त मंडळाकडून आर्थिक गैरव्यवहार सुरु असल्याची अत्यंत गंभीर बाब निदर्शनास येणे, सदरील संस्थेस असलेल्या मालमत्ता त्या कालावधीत अनेक नागरिकांनी संस्थेसाठी दान स्वरूपात दिली असल्याने व स्वातंत्र्य सैनिकांनी लोक कल्याणासाठी निर्माण केलेल्या संस्थेत होत असलेल्या गैरव्यवहारामुळे जनतेत तीव्र नाराजीची व संतापाची भावना निर्माण झाली असणे, संस्थेचे उत्पादने व विक्री केंद्रे बंद आवस्थेत असल्याने सदरील संस्थेतील असंख्य कुशल कामगारावर बेरोजगारीची वेळ आलेली असणे/सदरील संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी व विश्वस्तांविरुद्ध महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ ड प्रमाणे त्वरित कार्यवाही करण्याबाबत तसेच सदरील संस्थेस विशेष आर्थिक पॅकेज देऊन या संस्थेचे पुनर्जीवित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

**कृ.मा.प.**

*******

रोमुं-एच-१०३१(७००-८-२३)

## मा. उपमुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांचे निवेदन

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड ता.जि.नांदेड ही संस्था नोंदणी अधिनियम १८६०अन्वये व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये दि. २०/०९/१९६७ रोजी नोंदणीकृत झालेली संस्था असून याचा नोंदणी क्रमांक एफ-१२७ (ना) असा आहे. या न्यासाचे कार्यक्षेत्र मराठवाडा असून सोलापूर जिल्ह्यात न्यासाचे कार्य चालते. या संस्थेमार्फत संस्थेच्या नावाप्रमाणे खादी निर्मिती ते विक्री तसेच प्रचार व प्रसार देखील केला जातो. यासाठी कामगार व कर्मचारी कार्यरत आहेत.

न्यासाच्या विश्वस्त मंडळाबाबत मा. धर्मादाय उप आयुक्त, नांदेड विभाग नांदेड यांचे न्यायालयात चौ.क्र.१४७०/२०१२, १०९५/२०१७, ४५०७/२०१७, ९०२०/२०१८, ८९७/२०२१, ५०३/२०२१, ५०४/२०२१ व ७७१/२०२२ कलम २२ अन्वये दाखल प्रकरणे प्रलंबित असून ती न्यायप्रविष्ट आहेत. आज रोजी सदर न्यासाविरोधात सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड येथे कोणतेही तक्रार अर्ज प्रलंबित नाहीत.

तसेच संस्थेत झालेल्या आर्थिक गैरव्यवहार व संस्थेच्या जमिनीची बेकायदेशीर विक्री व ताबा तसेच अनागोंदी कारभार याविषयी वेळोवेळी सखोल निरीक्षक चौकशी होऊन सदरचे गैरव्यवहार व अनियमितता करणारे न्यासाचे तत्कालीन विश्वस्त मंडळाविरोधात कार्यवाही करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ ड (स्वयंखुद्द) प्रमाणेचा प्रस्ताव प्र.सहायक धर्मादाय आयुक्त-१, नांदेड विभाग, नांदेड यांनी धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडे दि.१६/१२/२०२२ रोजी सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे न्यायालयात (स्वयंखुद्द) चौकशी क्र.०४/२०२२ कलम ४१ ड अन्वये दि.२१/१२/२०२२ रोजी नोंद झालेला असून आजरोजी न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी/गैरअर्जदार तथा न्यासाचे विश्वस्त यांना सुनावणीकरिता व लेखी म्हणणे येणेकामी दि.१८/०७/२०२३ ही तारीख देण्यात आली होती. तथापि, सदर दिवशी प्रतिवादी गैरहजर होते, म्हणून पुढील तारीख २४/०७/२०२३ ही देण्यात आलेली आहे.

मराठवाडा खादी ग्रामोद्योग केंद्र, नांदेड ही संस्था महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अधिनस्त कार्यरत नसून सदर संस्था ही स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे उद्योग विभागामार्फत स्वायत्त संस्थेसाठी पॅकेज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाची कोणतीही योजना नाही.

********

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन २०२३

**लक्षवेधी सूचना क्र. १०७१**

मा.श्री.संजय जगताप, विधानसभा सदस्य यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०७१ पुढीलप्रमाणे आहे :-

"पुरंदर (जि. पुणे) तालुक्यातील श्रीक्षेत्र जेजुरी येथील खंडोबा देवस्थान हे महाराष्ट्राचे कुलदैवत असल्याने जेजुरीमध्ये दर्शनासाठी दररोज असंख्य भाविक कुलधर्म, कुलाच्या व दर्शनासाठी येत असून येणाऱ्या भाविकांना दर्शन व इतर कारणांसाठी मंदीर व शहर सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी व देवस्थानाचे संवर्धन नित्यपुजा, सोमवती, दसरा, चंपाषष्ठी यात्रा, सुरक्षा, रुढी, परंपरा जपूणक करणे, विकासासाठी स्थानिक नागरिकांचे मोलाचे योगदान व सहभाग असणे, श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थानाचे ऐतिहासिक व धार्मिक महत्व जपण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातुन आलेल्या भाविकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी जेजुरीमधील नागरिक प्रयत्न करित असून विश्वस्त मंडळाच्या नेमणुकित स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत जेजुरीमधील जनतेची मागणी असताना धर्मादाय कार्यालयाकडून नविन विश्वस्त मंडळाची नियुक्ती करताना बाहेरील व्यक्तींना प्राधान्य दिल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून त्याविरोधात जेजुरी बंदची हाक देऊन आंदोलन करण्यात येणे, सनदशीत भागाचे निषेध आंदोलन करुनही याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने स्थानिक जनतेत पसरलेली असंताषोची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन जेजुरीमधील खंडोबा देवस्थान विश्वस्त मंडळाच्या नेमणूककरीता स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.."

---

**कृ.मा.प.**

शेहा- ए५ - १०२०(७००-८-२३)

**विधी व न्याय विभाग**

## मा. उपमुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांचे निवेदन

पुरंदर (जि. पुणे) तालुक्यातील श्री क्षेत्र जेजुरी येथील खंडोबा देवस्थानामध्ये न्यासाच्या योजनेप्रमाणे विश्वस्तांची नेमणूक मुलाखतीद्वारे धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांनी केली आहे. तसेच देवस्थानच्या योजनेतील तरतुदी प्रमाणेविश्वस्त नेमणूकीमध्ये जेजुरी येथील २ स्थानिक विश्वस्त, जेजुरी परिसरातील १ विश्वस्त व इतर ४ विश्वस्त अशी एकूण ७ विश्वस्तांची नेमणूक करण्यात आली आहे.

जेजुरी येथील स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबतची कार्यवाही करण्याकरीता योजनेत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने स्थानिकांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० अ (३) अन्वये योजना दुरुस्तीचा प्रस्ताव योजना अर्ज क्र.७५/२०२३ अन्वये सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे येथे दाखल केलेला आहे.

सदरील योजना दुरुस्तीचा प्रस्ताव सद्य:स्थितीत सहायक धर्मादाय आयुक्त- २ पुणे विभाग, पुणे यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री समीर कुणावार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५८६ पुढीलप्रमाणे:-**

"वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुका येथील वर्धा नदीवरील आजनसरा वीज प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन सुध्दा २२ वर्षापासुन काम रखडलेले असणे, सदर प्रकल्प अतिशय क्रांतीकारी असणे, आजनसरा बॅरेज प्रकल्पामुळे १२ गावांचा पिण्याच्या पाण्याचा टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागत असणे, सदर आजनसरा बॅरेज प्रकल्पामुळे जवळपासचे ६२ गावांची २४००० हेक्टर जमीन क्षेत्र सिंचनाखाली येत असणे, सदर प्रकल्पाचे सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाले असणे.अंतिम वनजमीन प्रस्तावास पर्यावरण व वन जलवायु मंत्रालय यांच्या केंद्रीय कार्यालयीन पत्र क्र.६ एमएचसी-०६७/२००७ बीएचओ/९७६१ दिनांक २७/५/२०२२ पत्रानुसार मंजुरी प्रदान करणे, प्रकल्पाकरीता ९६०६५ घमी. पाणी वापराचे नियोजन असुन पाणी उपलब्धता प्रमाणपत्रात मा. मुख्य अभियंता , नियोजन जलविभाग, नाशिक यांनी दिनांक २७/०५/२०२२ ला मंजुरी प्रदान करणे, पर्यावरण मान्यतेअंतर्गत दिनांक ३०/०४/२००८ ला प्रकल्पाचे T.O.R. ला केंद्र शासनाने पर्यावरण मंत्रालयाची तत्वत: मान्यता प्राप्त झाली असणे, परंतु ५ वर्षामध्ये कार्यवाही न केल्यामुळे सुधारीत प्रस्ताव नव्याने सादर करण्याचे आदेश पर्यावरण विभागाने दिले असणे, त्यामुळे नव्याने T.O.R. प्रस्ताव सादर करण्यात आला असणे, सदर प्रस्तावास दिनांक ११/०७/२०१७ रोजी मान्यता प्रदान केलेली असणे, परंतु पर्यावरण विभागामार्फत पर्यावरण मान्यता मिळाली नसणे, सदर आजनसरा बॅरेज करणे, हे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे असणे, सदर बॅरेजला होत असलेल्या विलंबामुळे हजारो शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अभिप्राय :**

"वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुका येथील वर्धा नदीवरील आजनसरा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून, सदर प्रकल्पामुळे १२ गावांचा पिण्याच्या पाण्याचा टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागणार आहे. आजनसरा बॅरेज प्रकल्पामुळे जवळपासचे ६२ गावांची २४००० हेक्टर जमीन क्षेत्र सिंचनाखाली येणार असून प्रकल्पाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे. अंतिम वनजमीन प्रस्तावास पर्यावरण व वन जलवायु मंत्रालय यांच्या केंद्रीय कार्यालयीन पत्र क्र.६ एमएचसी-०६७/२००७ बीएचओ/९७६१, दिनांक २७/५/२०२२ रोजीच्या पत्रानुसार मंजूरी प्राप्त आहे. प्रकल्पाकरीता ९६.०६५ दलघमी. पाणी वापराचे नियोजन असून, पाणी उपलब्धता प्रमाणपत्रास मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षा, नाशिक यांची दिनांक २७/०४/२०२२ ला मंजूरी प्राप्त आहे. पर्यावरण मान्यते अंतर्गत दिनांक ३०/०४/२००८ ला प्रकल्पाचे T.O.R. ला केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाची तत्वत: मान्यता प्राप्त

झाली होती. परंतु ५ वर्षामध्ये कार्यवाही न होऊ शकल्याने सुधारीत प्रस्ताव नव्याने सादर करण्याचे आदेश पर्यावरण विभागाने दिले आहे. त्यानुसार नव्याने सादर केलेल्या T.O.R. प्रस्तावास दिनांक ११/०७/२०१७ रोजी मान्यता प्राप्त झालेली असून, T.O.R मधील अटी व शर्तीनुसार, वर्धा जिल्ह्यातील जनसुनावणी दिनांक ३१ /०१/२०२० रोजी व यवतमाळ जिल्ह्यातील जनसुनावणी दिनांक ०६/०३/२०२० रोजी घेण्यात आली आहे.

त्यानुषंगाने पर्यावरण मान्यतेचा प्रस्ताव पर्यावरण विभागाच्या संकेतस्थळावर सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाबाबत दिनांक १८/०१/२०२२ रोजी SEAC-I च्या २१५ व्या बैठकीत काही मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते. सदर उपस्थित मुद्द्यांचे अनुपालन करुन दिनांक १३.०४.२०२३ च्या पत्रान्वये आवश्यक असलेल्या सहपत्रासह पर्यावरण मान्यतेचा प्रस्ताव पर्यावरण विभागाच्या संकेतस्थळावर फेरसादर करण्यात आला आहे.

आजनसरा बॅरेज प्रकल्पाकरीता महाराष्ट्र बाधितांचे पुनर्वसन अधिनियम-१९९९ अन्वये कलम-११(१) ची अधिसूचना प्रसिध्दी व भूसंपदान कार्यवाही सुरु करण्यात आली असून सविस्तर संकल्पानसह प्रकल्पाच्या अद्ययावत किंमतीच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

************************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना

**श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परभणी यांनी ४० कर्मचाऱ्यांची शासनाचे नियम डावलून बोगस भरती केल्याची बाब निदर्शनास येणे, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या ऑडीटमध्ये तत्कालीन अधिकारी व कर्मचारी, तालुका तपासणीस व अंतर्गत तपासणी यांच्या हलगर्जीपणामुळे १ कोटी ९६ लक्ष ९० हजार ४१४ रुपयांचा अपहार झाल्याचे आढळून आला असणे, या संदर्भाची नोटीस ७३ कर्मचाऱ्यांना बजावण्यात येणे, ४० कर्मचाऱ्यांची बोगस भरती, शेतकऱ्यांना कर्जवाटपामध्ये अनियमितता व बोगस कर्जवाटप हे सर्रासपणे बँकेचे संचालक मंडळ व बँकेचे कार्यकारी संचालक मंडळ यांच्या कृपाआशिर्वादाने हा घोटाळा झालेला असणे, ड वर्ग व अनिष्ट तफावती मधील संस्थांनाही बोगस कर्जवाटप झालेले असणे, कर्जवाटपामध्ये १ लाखा मागे ४० हजार रुपयांप्रमाणे कमिशन घेऊन शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लुट केलेली असणे, बँकेने १७४ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना अनिष्ठ तफावतीबाबत रु.२४.७७ कोटींचा जमाखर्च केला असणे, दिनांक १.४.२०२२ ते ३१.३.२०२३ दरम्यान एक वर्षामध्ये बँकेने सदर व्याजाचा खर्च कोणत्या उत्पन्नातून अदा केला याबाबत खुलासा होणे आवश्यक असणे, पण तो झालेला नसणे, तसेच सदरील रु.२४.७७ कोटी रुपयांच्या रकमेमुळे बँकेचे उत्पन्न कमी होऊन बँकेत तोटा झाल्याचे निष्पन्न होत असणे, यामुळे बँक दिवाळखोरीत निघाल्याशिवाय राहणार नसणे, याबाबतही खुलासा व चौकशी होणे गरजेचे असणे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परभणी मध्ये झालेल्या घोटाळयामध्ये बँकेचे संचालक मंडळ व बँकेचे अधिकारी जबाबदार असल्याने त्यांची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, तसेच त्यांच्यावर तात्काळ कडक कारवाई करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

---

### -: मंत्री (सहकार) यांचे निवेदन :-

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित परभणी या बँकेचे कार्यक्षेत्र परभणी आणि हिंगोली या दोन जिल्ह्यांकरिता आहे. सदर बँकेत मागील पाच वर्षात कोणतीही नोकर भरती झालेली नसून बँकेची यापूर्वीची नोकर भरती सन १९९० साली भरती झालेली आहे. सन २०१९ मध्ये बँकेच्या आयटी विभागासाठी १३ तांत्रिक कर्मचारी IBPS मार्फत परीक्षा घेऊन भरती करण्यात आलेले आहेत. तद्नंतर बँकेत नोकर भरती झालेली नाही. तसेच त्यानंतर ९ कर्मचारी यांना अनुकंपा तत्वावर तसेच ६ कर्मचारी यांना मा. औद्योगिक न्यायालय, जालना यांचा आदेश विचारात घेऊन रूजू करण्यात आलेले आहे. मा. औद्योगिक न्यायालयाच्या ६ कर्मचाऱ्यांच्या बाबत दिलेल्या निकालाविरुध्द माननीय उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे बँकेने याचिका दाखल केलेली आहे.

२०२०-२१ या आर्थिक वर्षांच्या ऑडिट मध्ये मागील कालावधीत बँकेच्या शाखा कार्यालयातील बॅलेंसिंग कामकाज पूर्ण करून घेतल्यानंतर विशेष अहवालामध्ये अधिविकर्षाबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. सदर विशेष अहवालाच्या अनुषंगाने एकूण ५ शाखांमधील ४९ कर्मचाऱ्यांवर व तत्कालीन तालुका तपासणीस, तपासणीस, अंतर्गत तपासणी अधिकारी अशा एकूण ७३ कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ आणि चौकशी पूर्ण झालेली असून सदर प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी सुरू असून चौकशी अधिकाऱ्यांनी सर्व संबंधितांना नोटीसा दिल्या आहेत. सद्यस्थितीत सदर चौकशी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७२ (२) चे टप्प्यावर सुरु आहे. तसेच सदर प्रकरणी बँकेने मा. सहकार न्यायालय, नांदेड येथे १३ कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध दावे दाखल केलेले असून औंढा नागनाथ शाखेच्या ५ कर्मचाऱ्यांविरूद्ध पोलीस स्टेशन औंढा नागनाथ येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(कृ.मा.प.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणीशी संलग्न असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत शेतकरी सभासदांना नियमितपणे पीक कर्ज वाटप करण्यात येते. कर्ज वाटप करताना नाबार्ड, राज्य बँक व शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना विचारात घेऊन व बँकेच्या कर्ज धोरणाप्रमाणे आवश्यक कागदपत्र घेऊनच शाखांमार्फत पिक कर्ज वाटप करण्यात येते. यामध्ये अनियमितता अथवा बोगस कर्जवाटप करण्यात आलेले नाही. तसेच बँकेच्या कोणत्याही शाखेकडे अथवा मुख्यालयाकडे याबाबतीत तक्रारी प्राप्त नाहीत. सन २०२१-२२ मध्ये बँकेने परभणी व हिंगोली या दोन्ही जिल्ह्यांच्या उद्दिष्टांपैकी ९८.६०% एवढे, तर सन २०२२-२३ मध्ये एकूण ९२.३५% आणि सन २०२३-२४ मध्ये खरीप हंगामासाठी दिनांक २२-०७-२०२३ अखेर परभणी जिल्ह्यात उद्दिष्टाच्या ९९.१५% व हिंगोली जिल्ह्यात ७०.७०% असे दोन्ही जिल्ह्यांचे उद्दिष्टाच्या ८५.९४% एवढे कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज वाटपामध्ये कमिशन घेऊन शेतकऱ्यांची लूट केलेली असल्याबाबतची कोणतीही तक्रार बँकेस प्राप्त झालेली नाही.

बँकेशी संलग्न असलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांकडे अनिष्ट तफावत आहे. अशा संस्थांच्या कर्जखाती थकीत दंड व्याज परत जमा केले आहे. तसेच बँकेने ३१-०३-२०२२ अखेर अनिष्ट ताफावत असलेल्या संस्थांपैकी १७४ संस्थांना रक्कम रुपये २४.७७ कोटी रक्कम बँकेच्या उत्पन्नातून संस्थांच्या कर्ज खाती जमा करण्यात आली आहे. तथापि सदरील जमा खर्च केल्यामुळे बँकेत तोटा झालेला नाही. बँकेस सन २०२१-२२ व २०२२-२३ सालासाठी ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त आहे. तसेच सन २०२१-२२ या वर्षात बँकेस रु. ७७.५० लाख एवढा नफा व सन २०२२-२३ मध्ये बँकेस रु. ८९.८१ लाख इतका नफा असून मार्च २०२३ अखेर बँकेचा संचित नफा रुपये १३०७.०४ लाख इतका आहे. त्यामुळे बँकेस कोणताही तोटा झालेला नाही.

---------------

**लक्षवेधी सूचना क्रमांक-२११**

**सन २०२३ चे द्वितिय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. सुनिल केदार,श्री. निलेश लंके,श्री. प्रदीप जैस्वाल,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. अस्लम शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास जळगावचे जिल्हाधिकारी यांना विभागीय आयुक्त यांनी गिरणा पात्रातील बेसुमार वाळू उत्खननाच्या दैनिक लोकमत वृत्तपत्राच्या सचित्रवृत्ताच्या हवाला घेऊन या विरोधात काय कारवाई केली असा लेखी अहवाल मागवल्याची बाब उघडकीस येणे, या पत्रात जळगाव जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी ३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून या तक्रारींवर जिल्हाधिकारी यांनी अंतिम पूर्तता अहवाल आयुक्त कार्यालयास सादर केला नसल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात येणे, या पत्रात जिल्हाधिकारी यांना विभागीय आयुक्त यांनी गतकाळात केलेल्या कारवाया तसेच दंडात्मक वसुलीचा अहवाल मागितला असल्याची बाबही उघडकीस येणे, अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकी संदर्भात कार्यवाही प्रकरणात दिरंगाई झाली असून त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झालेले असणे, याबाबत जिल्हाधिकारी यांनी स्वयं स्पष्ट अहवाल सादर करण्याचे लेखी सूचना दिल्या असल्याची बाबही निदर्शनास येणे, दिनांक १८ मे, २०२३ च्या दैनिक लोकमत मध्ये वार्ताहाराने गिरणा नदी पात्रात वाळू माफीयांची जत्रा कशाप्रकारे भरली आहे याचा फोटो टाकून महसूल विभागातील सुरू असलेला अनागोंदी कारभार उघड करणे, गिरणा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याच्या असंख्य तक्रारी नागरिकांकडून वारंवार जिल्हाधिकारी यांना देण्यात येत असून सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांनी त्याकडे हेतूभ्रा व अर्थपूर्ण केलेले अक्षम्य दुर्लक्ष, दैनिक लोकमत मध्ये बातमी आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी या बातमीची गंभीर दखल न घेणे , यामुळे विभागीय आयुक्तांना त्याची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांकडे स्पष्टीकरण मागवण्याची आलेली वेळ, महसूल विभागात कुंपण शेत खात असल्याबद्दल नागरिकांच्या मनात निर्माण झालेला विश्वास, महसूल प्रशासनातील जिल्हाधिकारी वाळूमाफीयांना सहकार्य करीत असल्याचे उघडकीस येणे, त्यांच्याविरुद्ध महसूल प्रशासन कोणतीच कारवाई करत नसल्याचे निदर्शनास आल्याने महसूल प्रशासनाबद्दल जनतेच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

स्थानिक वृत्तपत्रात दिनांक १८/०५/२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या गिरणा नदीपात्रातील वाळू उत्खननाच्या बातमीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १९/०५/२०२३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडून अहवाल मागविलेला होता. जिल्हाधिकारी जळगाव यांनी सदर अहवाल दिनांक ०१/०६/२०२३ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांना सादर केला आहे.

स्थानिक वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने तहसिलदार, जळगाव यांनी चौकशी केली असता मौजे आव्हाणे ता. जळगाव येथून नदीपात्रातून कोणत्याही प्रकारचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आलेले नाही. जळगाव जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण ३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी २९ तक्रारी निकाली काढल्या आहेत. ३ तक्रारी उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार यांचेकडे प्रलंबित असून १ तक्रार न्यायप्रविष्ठ आहे.

गिरणा नदीपात्रातून वाळूची चोरी होऊ नये यासाठी नदीपात्रापासून गावाकडे जाणारे रस्ते जेसीबीच्या सहाय्याने चर खोदून बंद करण्यात आले आहेत. अवैध गौण खनिज व वाहतुकीची माहिती नागरिकांकडून जिल्हा प्रशासनाला कळविण्याबाबत हेल्पलाईन सुरु केली आहे. गिरणा नदीवरील रेल्वे ब्रिज व राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या पूलापासून ६०० मीटरचा परिरसर उपविभागीय दंडाधिकारी यांनी प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

जळगाव जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

जळगांव जिल्हयात दि.१/४/२०२२ ते ३०/०६/२०२३ दरम्यान अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण ८२४ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १२.६३ कोटी दंड आकारला असून ६.८७ कोटी इतक्या दंडाची वसुली केली आहे. तसेच, १३४ गुन्हे दाखल करुन २०८ आरोपींना अटक केली आहे.

*******

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र. ८०९**

**श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील तत्कालीन तहसीलदार श्रीमती नीलिमा सूर्यवंशी यांनी शहापूर तहसीलदार म्हणून कार्यरत असताना अनेक कामांमध्ये अनियमित्ता करणे, समृद्धी महामार्ग भूसंपादन प्रक्रियेत मूल्यांकन करणे, गौण खनिज उत्खनांमध्ये विकासकांना वेठीस धरून जागेवर जप्ती आदेश देणे, मोजे खातीवली येथील सर्वे नंबर ९४ शेत्र १-२७-७० च्या माती, मुरूम, डबर उत्खनाच्या रोयल्टी पावत्या असूनही जाणून-बुजून श्री अनंता हलोजी काठोले व इतर (रा. खातिवली, ता. शहापूर) यांना सुमारे दोन कोटी रुपयांचा दंड व स्वामित्वधन रक्कम बेकादेशीरपणे व जाणून बुजून लावून स्थावर मालमत्ता जप्तीच्या आदेश काढून विकासकास आर्थिक गैरव्यवहार करण्यास भाग पाडणे, त्यामुळे तत्कालीन तहसीलदार यांनी त्यांच्या कार्यकालात केलेल्या जमिन खरेदी-विक्री व्यवहार, भूसंपादनाची प्रकरणे, समृद्धी महामार्ग व खर्डी एमआयडीसी भूसंपादन व मूल्यांकन प्रकरणे, न्यायिक प्रकरणे व इतर घेतलेले निर्णय व आदेश यांची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे व त्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केलेली सखोल चौकशीची मागणी यावर शासनाने करावयाची वा करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

**मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्रीमती निलीमा सुर्यवंशी, तत्का.तहसिलदार, शहापूर, जि. ठाणे या पदावर दिनांक ०९/०९/२०१९ ते ०९/०३/२०२३ या कालावधीत कार्यरत होत्या.

समृध्दी महामार्ग भूसंपादन प्रक्रियेतील मुल्यांकनाचे कामकाज हे तालुका स्तरावरून होत नसल्याने, तत्कालीन तहसिलदार शहापूर यांनी असे कोणतेही भूसंपादनाचे मुल्यांकन केलेले दिसुन येत नाही. स्थानिक चौकशी करून किंवा ७/१२ च्या नोंदी संदर्भाने अधिकार अभिलेखाची पडताळणी करून सदर माहिती देणेची कारवाई तहसिलदार कार्यालयामार्फत केली जाते.

मौजे खातीवली येथील सर्वे नं. ९४ क्षेत्र १-२७-७ येथे अनधिकृत भरावाच्या अनुषंगाने तलाठी सजा वासिंद यांचा अहवालानुसार संबंधित खातेदार श्री.अनंता हालोजी काठोळ यांना दिनांक ०२/०३/२०२२ रोजी १४६४ ब्रास माती या गौणखनिज भरावापोटी १,५५,१८,४००/- रूपयांची दंडाची नोटीस काढण्यात आली होती व त्याबाबत कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने अंतिम दंडनिय आदेश पारित करण्यात आले आहे.

सदर आदेशाच्या अनुषंगाने पुढील वसुलीच्या कायदेशीर कार्यवाही पार पाडुन आदेशात नमुद दंडनीय रक्कमेच्या अनुषंगाने जप्ती आदेश काढुन सदर रक्कमेच्या बोजाची नोंद अधिकृतरित्या ७/१२ वर करण्यात आलेली आहे.

जमिन खरेदी विक्री व्यवहाराच्या अनुषंगाने खरेदी विक्री व्यवहाराचे, ७/१२ वरील नोंदणीबाबत कामकाज मंडळ अधिकारी व तलाठी स्तरावर होत असते. तहसिल कार्यालयाकडे खरेदी विक्री व्यवहाराचे कामकाज पार पाडले जात नाही. फेरफारच्या अनुषंगाने काही तक्रार / हरकत असल्यास त्याबाबत सुनावणी तहसिल कार्यालयामार्फत घेण्यात येवून कार्यवाही केली जाते.

श्रीमती निलीमा सुर्यवंशी, तत्का. तहसिलदार शहापूर यांच्याविरूध्द प्राप्त तक्रारींची मा.उप लोक आयुक्त महोदयांनी गांभिर्याने दखल घेतल्याने, चौकशी करण्यासाठी तसेच त्यांच्या कार्यकाळातील कामकाजाची तपासणी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिति स्थापन करण्यासाठी शासन पत्र क्रमांक लोकआ-३१२२/प्र.क्र.१८२/ई-३, दिनांक ०२/०८/२०२२ अन्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १६/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल दिनांक २८/०७/२०२३ रोजी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांच्याकडे सादर केला असून सदर अहवालामध्ये त्रुटी असल्यामुळे अंतिम अहवाल प्राप्त करुन तो शासनाकडे सादर करण्यात येईल असे विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांनी कळविले आहे.

****************************

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन –

**श्री. राजू कारेमोरे, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९६४ पुढीलप्रमाणे आहे : –**

"नागपूर जिल्हयातील धामणगाव (ता. मौदा) येथील मोरेश्वर मोटघरे हे ग्रामस्थ रहिवाशी असून त्यांची स्वमालकीची भंडारा जिल्हयातील मौजा कांद्री येथे शेतजमीन असून सदर जमिनीची मशागत व वहिवाट अनेक वर्षापासून करीत असणे तथापि सदर तेथील मंडळ अधिकारी श्री. रविंद्र बिसने याच्यासह राजेश्वर मोहरकर सोनबा आहके, अशोक जयदेव मेश्राम व प्रेमदास मदनलाल राऊत व अन्य अधिकारी यांनी संगनमताने प्रकरणार्थी श्री. मोटघरे यांचे बनावट आधारकार्ड व बँकेचे नाहरकत प्रमाणपत्र तयार करून श्री. मोटघरे यांचेऐवजी अज्ञात इसमास मोटघरे यांना दाखवून त्याचे शेतीचे दस्तऐवज तयार करून शेतजमीन विकल्याचे आढळून येणे, त्याप्रकरणी श्री. मोटघरे यांनी मोहाडी येथे पोलिसात तक्रार दाखल केलेली असणे, परंतु त्याबाबत अद्याप कारवाई झालेली नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी तेथील शेतकरीवर्गात पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सदर प्रकरणी कटकारस्थान करणारे हे शासकीय अधिकारी असल्याने त्या सर्वांना तातडीने निलंबित करुन कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच संबंधित शेतकऱ्यास त्याची शेतजमीन पूर्ववत मिळवून देण्याची गरज त्याबाबत शासनाने केलेली कारवाई व त्याबाबत शासनाची भूमिका."

---

**मा.मंत्री (महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास) यांचे निवेदन**

नागपूर जिल्हयातील धामणगाव (ता. मौदा) येथील श्री.मोरेश्वर मोटघरे यांच्या शेतजमीनीतील मौजा कांद्री, ता. मोहाडी, जि. भंडारा स्थित शेतजमीनीच्या नोंदणीकृत दस्ताचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| दस्त क्र. व दिनांक | दस्ताचा प्रकार | लिहून देणार | लिहून घेणार | मिळकतीचे वर्णन | मुद्रांक शुल्क | नोंदणी फी |
|---|---|---|---|---|---|---|
| ९१६/ २०२३, दि.१९/४/ २०२३ | विक्री पत्र | श्री.मोरेश्वर मारोती मोटघरे, रा.पो. राजीवनगर चंद्रपूर, | श्री.रविंद्र आसाराम बिसने, रा.मांगली पो.खापा, ता.तुमसर, जि.भंडारा | मौजा कांद्री, ता.मोहाडी जि.भंडारा येथील शेतजमीन गट नं.७७९/१ व ७८०/२ अनुक्रमे आराजी क्षेत्र १.०४ हे.आर. व ०.८९ हे.आर. | मोबदला रु.१४,००,०००/- व त्याची बाजारभाव किंमत रु. १६,१८,०००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे अनुच्छेद २५(२) नुसार ५ टक्केप्रमाणे मु. शु. रु.८०,९००/- | १ टक्का नों.फी रु.१६१८०/- , दि. १८/४/२०२३ रोजी ई-चलनाद्वारे भरणा केला आहे. |

उपरोक्त विक्रीपत्र दस्त क्र. ९१६/२०२३, दि. १९/०४/२०२३ ची नोंदणी, नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ व नोंदणी नियम १९६१ मधील तरतुदींचे पालन करुन करण्यात आलेली आहे.

दस्त क्र.९१६/२०२३ ची पडताळणी केली असता सदरच्या दस्तामध्ये विकणार श्री.मोरेश्वर मारोती मोटघरे यांचे आधारकार्ड व तक्रारदार श्री. मोरेश्वर मारोती मोटघरे यांनी तक्रार अर्जासोबत

जोडलेले आधारकार्ड हे एकाच नावाचे असून सदर आधारकार्डवरील दोन्ही व्यक्तिंचे फोटो तसेच आधार क्रमांक हे भिन्न असल्यामुळे वरील दोन्ही आधारकार्ड पैकी एक आधारकार्ड बनावट असल्याबाबत संभ्रम निर्माण झाल्याने तक्रार प्राप्त झाल्याच्या दिवशी म्हणजेच दि.०१/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन, मोहाडी यांना दि.०१/०६/२०२३ पत्र देवून प्रकरणाची संपूर्ण चौकशी / तपास करुन सदर दस्तामध्ये नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ नुसार खोटे कागदपत्रे सादर करुन शासनाची तसेच दुय्यम निबंधक यांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्यास नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८३ अन्वये नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत तक्रार दाखल केली आहे.

तसेच तक्रारदार श्री.मोटघरे यांचे दि.०१/०६/२०२३ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दुय्यम निबंधक कार्यालयाच्या स्तरावरुन देखील नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ चा भंग झाला आहे किंवा कसे ? याबाबत चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असून दस्तातील लिहून देणार, घेणार व साक्षीदार यांना नोटीस बजावून तसेच तक्रारदार यांचे जाबजबाब / बयाण घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सदरची कार्यवाही पूर्ण होताच पोलीस निरीक्षक, मोहाडी यांना आवश्यक त्या जाबजबाब / बयाणाच्या प्रती पुरविण्यात येतील व नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ चा भंग झाल्याची खात्री पटल्यास कलम ८३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

मौजा कांद्री येथील गट क्र.७८०/२ क्षेत्र ०.८९ हे.आर. व गट क्र.७७९/१ क्षेत्र १.०४ हे. आर. या क्षेत्राबाबतचा खरेदी-विक्री नोंदणीकृत दस्त क्र.९१६/२०२३ हा तलाठी कांद्री यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर सदर खरेदी दस्तानुसार तलाठी कांद्री, ता.मोहाडी यांनी ऑनलाईन फेरफार क्र.२३४८ दि.२२/४/२०२३ रोजी दाखल केला आहे. त्यानुसार दि.२२/४/२०२३ रोजी नोटीस बजावणी नंतर मंडळ अधिकारी कांद्री यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या फेरफार क्र.२३४८ यावर कोणतीही हरकत दाखल नसल्याने सदरचा फेरफार दि.१२/५/२०२३ रोजी मंजूर केला आहे. प्रस्तुत प्रकरणी श्री.मोटघरे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणामध्ये चौकशी करणेबाबत अप्पर जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहेत. चौकशीअंती शासकीय अधिकारी / कर्मचारी दोषी आढळून आल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

दरम्यान मौजा कांद्री येथील गट क्र.७८०/२ क्षेत्र ०.८९ हे.आर. व गट क्र.७७९/१ क्षेत्र १.०४ हे.आर. या जमिनीची विक्री खोट्या ओळखपत्राद्वारे नोंदणीकृत दस्त तयार करण्यात आल्याबाबत जमिनीचे मूळ मालक श्री.मोरेश्वर मारोती मोटघरे, रा. धामणगाव यांनी पोलीस स्टेशन मोहाडी येथे तक्रार दाखल केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याअनुषंगाने मूळ खातेदार यांनी ओळखपत्र सादर केल्यावरून फेरफार क्रमांक २३४८ मधील खरेदी दस्त क्र.९१६/२०२३ मध्ये लावलेल्या ओळखपत्राबाबत संभ्रम असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, तुमसर यांनी सदर फेरफार क्रमांक २३४८ आदेश पुनर्विलोकनात घेण्यास दि.२३/७/२०२३ रोजीच्या दिलेल्या परवानगीस अनुसरून, मौजा कांद्री येथील स.नं.७७९/१ व स.नं.७८०/२ चा अभिलेख दि.१२/०५/२०२३ रोजीच्या पूर्वीच्या स्थितीत करणेबाबत मंडळ अधिकारी कांद्री यांनी दि.२४/०७/२०२३ रोजी आदेश पारीत केले असून त्यानुसार मौजा कांद्री येथील स.नं.७७९/१ व स.नं.७८०/२ च्या ७/१२ वर नोंद घेण्यात आलेली आहे.

---

<u>लक्षवेधी सूचना क्र.९६९</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी अधिवेशन)**

**श्री.अबू आजमी,श्री.राजु(बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना ९६९ पुढीलप्रमाणे आहे:-**

---

**लक्षवेधी सूचना**

" महाराष्ट्रातील विवाहीत तरुणांमध्ये अचानक हदयविकाराने होणारे मृत्यूमुळे अनेक विधवा मुली त्यांच्या लहान मुलांसह जगत असणे, परंतु त्या विधवा महिलांच्या नवऱ्याच्या मृत्युपश्चात त्या दोन मुलांचा सांभाळ करत नवऱ्याच्या मिळकतीवर वारस म्हणुन नाव चढवण्यासाठी हेअरशिप घेणे आवश्यक असणे आणि सदर हेअरशिप घेणे आवश्यक असणे आणि सदर हेअरशिप हे संबंधित मिळकतीच्या विभागातील दिवाणी न्यायालयाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक असणे, सदर हेअरशिप मिळवण्यासाठी दिवाणी न्यायालयाकडे अर्ज करतांना कोर्ट फी स्टँप शुल्क ७५०००/- रुपयेपर्यंत करण्यात आलेले असणे, परंतु तरुणपणीच ज्यांचे पती (Husband) मृत्यू पावले आहेत त्या विधवा महिलांना त्यांच्या लहान मुलांसह एवढी मोटी कोर्ट फी स्टँम्पची रक्कम भरणे कठीण जात असल्यामुळे अशा अनेक मिळकती त्या विधवा महिला व त्यांच्या मुलांच्या नावे करणे राहून गेलेले असणे, या महागाईच्या काळामध्ये अशा विधवा महिलांना काम करुन पालन पोषण करणेच कठिण झालेले असतांना हेअरशिपसाठी ७५०००/-रुपये कोर्ट फी स्टॅम्प जमा करणे अवघड झालेले असणे,त्याचबरोबर दिवाणी कोर्टात अर्ज दाखल करणारे विधितज्ञ सुध्दा वेगळी फीची अपेक्षा करत असणे, त्यामुळे सदर विधवा महिलांना हेअरशिप मिळवण्यासाठी एक ते दीड लाख रुपयेपर्यंतचा खर्च जात असणे, ते त्यांना अशक्य असल्याकारणाने त्यांच्या पतीच्या नावे असलेले मिळकतीवरील नाव चढवणे अशक्य होत असल्याने कौटूंबिक वाद निर्माण होऊन सदर महिलेस कोर्ट कचेरीचे मागे धावाधाव करुन असंख्य मनस्ताप करुन घ्यावा लागत असणे, या विधवा महिलांसाठी अनेक योजना व अनेक सवलती शासनाने करुन ठेवलेल्या असताना या विधवा महिलांना हेअरशिपसाठी कोर्ट फी स्टॅम्प शुल्क ७५०००/- रुपयांची मर्यादा रद्द करावी अथवा कमीत कमी १००००/- शुल्क आकारण्याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया".

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री(महसूल) यांचे निवेदन**

विधवा महिलांना त्यांच्या पतीच्या मृत्यूपश्चात त्याच्या मिळकतीवर वारस म्हणून नाव नोंद करण्यासाठी दिवाणी न्यायालयाकडून हेअरशीप प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे लागते. दिवाणी न्यायालयाकडे हेअरशीप प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना मिळकतीच्या मूल्यांकनावर साधारणत: २ ते ७.५ टक्के कोर्ट फी

शुल्क भरावे लागते. कोर्ट फी ची अधिकतम मर्यादा रु. ७५,०००/- आहे. कोर्ट फी शुल्काची रक्कम व वकीलाची फी जास्त असल्यामुळे अनेकवेळा विधवा महिलांना त्यांच्या पतीच्या मृत्यूपश्चात त्याच्या मिळकतीवर नाव नोंद करणे शक्य होत नसल्यामुळे भविष्यात मिळकतीचे कौटुंबिक वाद उद्भवल्यास या विधवा महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

राज्य शासनाने महसूल व वन विभाग क्र. एस ३०/२०००/६७३/प्र.क्र.१९९/म-१,दिनांक २३.३.२००० रोजीच्या आदेशान्वये महिलांना देखभाल खर्च, विवाहाशी संबंधित मिळकतीचे वाद, हिंसा व घटस्फोट या कारणांकरिता दिवाणी, कौटुंबिक किंवा सत्र न्यायालयात तक्रार, अर्ज, याचिका, अपील किंवा या अधिनियमाच्या पहिल्या व दुसऱ्या अनुसूचीतील नमूद कोणत्याही अन्य दस्तावर लागणारे शुल्क यातून मुंबई कोर्ट फी अधिनियम, १९५९ चे कलम ४६ नुसार सूट दिली आहे. तथापि, सदर आदेशामध्ये हेअरशीपसाठी कोर्ट फी मध्ये सवलत दिलेली दिसून येत नाही.

विधवा महिलांना हेअरशीप अर्जासाठी कोर्ट फी मध्ये सवलत द्यावयाची झाल्यास, साधारणपणे राज्यातील न्यायालयांमध्ये विधवा महिलांकडून हेअरशीपसाठी येणाऱ्या अर्जांची संख्या व शासनाचे किती महसूली नुकसान होवू शकते तसेच विधवा महिलांना हेअरशीपसाठी कोर्ट फी मध्ये सवलत देता येईल किंवा कसे याबाबत विधि व न्याय विभागास अभिप्राय देण्याची विनंती केली होती. त्यानुषंगाने विधि व न्याय विभागाने मुंबई कोर्ट फी अधिनियम, १९५९ चे कलम ४६ नुसार विशिष्ट घटकास न्यायलयीन फी मधून सूट द्यावयाची किंवा नाही याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार शासनास आहे त्यानुसार शासन विधवा महिलांना कोर्ट फी मध्ये सूट देण्याबाबतचे आदेश निर्गमित करू शकते असे अभिप्राय दिले आहेत. त्याअनुषंगाने, विधवा महिलांकडून हेअरशीपसाठी येणाऱ्या अर्जांची संख्या व शासनाचे किती महसूली नुकसान होवू शकते याबाबतची माहिती मा.उच्च न्यायालयाकडून मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त करून घेण्याची तसेच विधवा महिलांना हेअरशीप प्रमाणपत्रासाठी कोर्ट फी मध्ये सवलत देण्यासाठी शासन स्तरावरून धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

--------------------

म.वि.नि.१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१२६३

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

मा.श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.:-

"महाराष्ट्रातील जमिन महसूल अधिनियम अंतर्गत तलाठीमार्फत होणारे वारस फेरफार हक्काबाबत दिवाणी न्यायालय व अर्धन्यायिक न्यायालयामध्ये मोठ्या प्रमाणावर कौटुंबिक वादाचे शेकडो दावे प्रलंबित असल्यामुळे कौटुंबिक वाद विकोपाला गेल्याने तंटामुक्तीसारखे प्रयोजन शासनाला करावे लागले याचा मूळ दस्तऐवज वारस प्रमाणपत्र अथवा १०० रुपये स्टॅम्पवरील सत्यप्रतिज्ञापत्र असून त्यामुळे महसूल खात्याचे तलाठी हे योग्यरित्या वारस चौकशी न करता भाऊ बहिणीची नावे डावलून तलाठ्याने वारस फेरफार टाकल्याने योग्य वारसांची नोंद होण्यासाठी शासनाने विलंबाचा मुद्दा आडवा आणून अशा मूळ वारसांचे नावे अपिलांती विलंबाभावी फेटाळण्यात आलेली असणे, त्यामुळे वारसांबाबत प्रचंड मोठ्या प्रमाणात उदासिनता असून एका खोट्या सत्यप्रतिज्ञापत्रावरुन भाऊ बहिणींची नावे डावलून खरेखुरे वारस चौकशी न करता वारस फेरफार टाकण्यात आलेली आहे व त्या सत्यप्रतिज्ञापत्रामध्ये खरेखुरे वारस अथवा भावाबहिणींची नावे लपवल्यास भादवि संहिता कलम १९८, १९९, २०० व १९३ मधील तरतूदीनुसार दंडास शिक्षेस पात्र राहिल असे मूळ कुटुंबाप्रमुखाने वारसांचे प्रतिज्ञापत्र करून दिलेले असणे, वारसांची नावे या सत्यप्रतिज्ञापत्रावरुन लपवल्यामुळे तात्काळ असे प्रतिज्ञापत्र रद्द करुन त्यावर झालेले फेरफार रद्द करुन खरेखुरे वारसांचे चौकशी होऊन नोंद होण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे तकार दाखल असूनही शासनाने सदर प्रकरणाबाबत धोरण आखून त्याबाबत अध्यादेश काढून ख-याखुऱ्या वारसांची नोंद होण्यासाठी कुठलीही पावले उचलण्यात आली नाही म्हणून शासनाने प्रलंबित दावांचा तात्काळ निपटारा होण्यासाठी ख-याखुऱ्या वारसांच्या नोंदीसाठी धोरण आखून अध्यादेश काढून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिकिया व भूमिका."

---

## मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ नुसार एखादा खातेदार मयत झाल्यानंतर त्याचे वारस, वारस नोंदीसाठी तलाठी कार्यालयाकडे अर्ज करतात. वारसाच्या नोंदी या त्या त्या धर्माच्या व्यक्तीच्या वैयक्तिक कायद्यानुसार होतात. हिंदू व्यक्तीचे बाबतीत हिंदू वारसा कायदा तर मुस्लिम व्यक्ती खातेदाराच्या बाबत मुस्लिम कायद्यानुसार होतात. वारस नोंदीसाठी अर्ज आल्यास तलाठी गाव नमुना नं. ६-क मध्ये (वारस नोंदवही) वारस ठराव नोंदवितात. वारस नोंदीसाठी आवश्यक कागदपत्रे वारसांकडून घेतात. या कागदपत्रात शिधापत्रिका, सात-बारा उतारा आणि खाते उतारा घेण्यात येतो.

वारस नोंदी संबंधी नोंद प्रमाणित करताना सर्व हितसंबंधितांना नोटीस बजावली गेली आहे याची खात्री केले जाते. सर्व वारसांना बोलावून सरपंच पोलीस पाटील किंवा अन्य प्रतिष्ठित व्यक्तींना विचारणा

करून स्थानिक चौकशी योग्य प्रकारे केले जाते तसेच संबधित जमिनीचे फेरफार मागवून एकत्र कुटुंब मॅनेजर/ अज्ञान पालनकर्ता याबाबतच्या नोंदी बाबत खात्री करून कोणताही वारस डावलला जाणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

सर्व वारस अर्जात नमुद आहेत याची खात्री करुन स्थानिक चौकशी, जाहीर प्रगटन काढण्यात येते. स्वयंघोषणापत्रावर सर्व वारसांची नांवे नमुद करुन या वारसा व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही असे नमुद करुन स्वाक्षरी घेण्यात येते. वारस ठराव मंजूर केल्यानंतर फेरफार रजिस्टर ला नोंद घेऊन सर्व संबंधित यांना नोटीस दिली जाते. त्यानंतर किमान १५ दिवसांनी या फेरफार नोंदीबाबत कायदेशीर आदेश पारित केले जातात. तथापि गुंतागुंतीचे प्रकरणात, कागदपत्रे विश्वासहार्य नसतील किंवा वारस बाबत वाद आहे अशा प्रकरणात मालकीहक्क दिवाणी न्यायालयातून सिध्द करून आणण्यास सांगण्यात येते. तसेच वारसांची नावे वगळुन फेरफार नोंद मंजूर झाल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपिल सादर करून दाद मागण्याची तरतुद आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार संबंधित उपविभागीय अधिकारी दाखल अपिल अर्जावर सर्व संबंधीतांची सुनावणी घेवून त्यांची बाजू ऐकुन घेवून उपलब्ध कागदपत्राआधारे नोंदविलेला फेरफार रदद करण्याचे आदेश पारित करीत असतात. यास्तव खोट्या प्रतिज्ञापत्रावरून भाऊ बहिणीचे नावे डावलून यास्तव नोंद झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच हिंदू वारसा कायदा १९५९ मधील सन २००५ च्या सुधारणेनुसार मुलीला मालमत्तेत मुलाइतकाचे हिस्सा मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. सखोल चौकशीनंतरच आणि कोणताही वारस डावलला गेला नाही याची खात्री झाल्यानंतर फेरफार घेण्यात येतो.

**************

म.वि.नि.१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १२६८

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

मा.श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.:-

"मुंबई व ठाणे जिल्हयातील सार्वजनिक न्यास नोंदणी विभागाकडे वज्रेश्वरी देवी संस्थानाची परिशिष्ट १ नमुद व अस्तित्वात असलेल्या मिळकत तक्त्याचे चेंज रिपोर्ट १९६३ साली तत्कालिन विश्वस्ताने सार्वजनिक न्याय नोंदणी विभाग, ठाणे यांच्याकडे केले होते, सन १९६३ साली वज्रेश्वरी देवस्थानाने दिलेल्या मिळकत तक्त्यावरुन महसूल खात्याने नोंद न घेता इन्टायर विलेज म्हणून चुकीची नोंद घेतली होत, परंतु सदर देवस्थानाला कुठल्या आदेशान्वये अथवा कुठल्या हुकूमान्वये कणेरी व फेणे भिवंडी ही गावे ईनाम दिल्याचे कोठेही कायदेशीर पुराव्याअंती निदर्शनास आलेले नसणे, तरी सुध्दा महसूल खाते जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये इतर हक्कात नोंद घेऊन ते काढण्यासाठी विविध क्लुप्त्यांतर्गत गैरव्यवहार करुन त्या ठिकाणी विकासकांना त्या दोन गावातील अनेक बांधकामांना परवानगी दिली आहे व आता ही नोंद कमी करण्यासाठी शासन परवानगीची गरज असल्याचे सांगत असणे, तत्कालीन महसूल मंत्री यांनी दिंडोरी येथील विहित गाव व मनोली गावे रेव्हेन्यू ग्रेंट असल्याचे दिसून आल्याने सदर जमिन मिळकती संस्थांना ईनाम दिल्याचे कोठेही उल्लेख नसल्याचे ईनाम कमिशनचा आदेश ऑलिनेशन रजिस्टर उतारा व रेव्हेन्यू ग्रेट आदिबाबत देवस्थान कमी करण्याचे आदेश देणे, वज्रेश्वरी देवी संस्थानास गावे इनाम दिल्याचे कोठेही कायदेशीर पुरावा आढळून आलेला नाही आणि उच्च न्यायालय मुंबई याच्याकडील रिटपिटीशन याचिका क्र. २७५९/२०११, १३३५३/२०१६, ३५८६६/२०१८ आणि १३४८८/२०१७ या याचिकेमध्ये दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर निर्णयाद्वारे मा. उच्च न्यायालयाने ही बाब स्पष्ट केली आहे की, ज्या जमिनी देवस्थानांनी रेव्हेन्यू ग्रेट स्वरुपात धारण केल्या आहेत, त्या जमिनीचे संदर्भात शासनाच्या महसूल विभागाच्या दिनांक ३० जुलै, २०१० व दिनांक २९ जुलै, २०११ रोजीच्या सूचना लागू होत नाहीत शासनपरिपत्र दिनांक ३० नोव्हेंबर, १९७२ ची अंमलबजावणी चुकीच्या पध्दतीने असल्याने त्याचा शेतकरी जमिनीवरतील गंभीर परिणाम झालेला असल्याचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी देवस्थान इनाम वर्ग-३ नोंद कमी करण्यासाठी प्रधान सचिव, विधी व न्याय, प्रधान सचिव, महसूल विभाग यांना निवेदन देणे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने भिवंडी येथील मौजे कणेरी व फेणे गाव येथील सर्व्हे क्र.३९,६५,५,१९,२० ईनाम वर्ग-३ ची नोंद कमी करण्यात यावी म्हणून ज्या देवस्थानाच्या जमिनीबाबत गावे इनाम दिल्याचे शासकीय उल्लेख शासकीय आदेश आणि शासकीय हुकूम नसलेल्या देवस्थानाच्या नोंदी तात्काळ शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी ईनाम-३ मधून मुक्त करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने व तत्कालिन महसूल मंत्र्यांचे देवस्थान नोंदी कमी करण्याचे जे आदेश दिंडोरी येथील प्रकरणात दिलेले आहे ते आदेश भिवंडीतील गावांना सुध्दा लागू पडत असल्यामुळे तशी देवस्थान नोंद कमी करण्यासाठी शासनाने केलेली व करावयाची कारवाई व शासनाची प्रतिकिया व भूमिका. "

# मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

देवस्थान इनामाचे प्रामुख्याने सॉईल ग्रँट व रेव्हेन्यू ग्रँट असे दोन प्रकार आहेत. सॉईल ग्रँट म्हणजे पूर्वीच्या संस्थानिकाने / शासनकर्त्याने पूर्णत: स्वामीत्व हक्क जर देवस्थानास बहाल केले असेल तर अशा जमिनींना सॉईल ग्रँट म्हणतात व ज्या जमिनींचा फक्त महसूल शासनाने सोडून दिला असेल किंवा देवस्थानास बहाल केला असेल त्यास रेव्हेन्यू ग्रँट किंवा ग्रँट रेव्हेन्यू ग्रँट असे म्हणतात. अशा जमिनींची नोंद ॲलिनेशन रजिस्टरमध्ये केली जाते.

भिवंडी तालुकामधील मौजे कणेरी व फेणे या गावाच्या तालुक्यातील Land Allienation Register पाहता वज्रेश्वरी देवी संस्थान या देवस्थानाबाबतच्या नोंदी असल्याचे दिसुन येत असुन, मौजे कणेरी व फेणे ही गावे पुर्णत: (Entire Village) देवस्थान मध्ये येत आहेत. तसेच सदर गावांचे गाव नमुना नंबर ३ पाहता सदर गावांची नोंद देवस्थान इनाम वर्ग ३ असल्याचे दिसुन आले आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. डीईव्ही-२०१०/प्र.क्र.६/ ल- ४ दिनांक ३०/०७/२०१० व परिपत्रक क्र. डीईव्ही- २०१५/प्र.क्र.१५१/ज-१अ, दिनांक ०६ नोव्हेंबर २०१८ नुसार राज्यातील देवस्थानच्या जमिनीची तपासणी तसेच या जमिनी बेकायदेशीर हस्तांतरीत झाल्या असल्यास पुर्ववत देवस्थानच्या नांवे करण्याबाबत पुरक निर्देश दिलेले आहेत. सदर परिपत्रकानुसार अंशतः व पुर्णतः सारामाफी असणारे देवस्थानच्या जमीनीची बेकायदेशीर आणि सक्षम प्राधिकारी अथवा शासनाचे पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरण झाले असल्यास त्याबाबतचे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. मौजे कणेरी व फेणे ता. भिवंडी येथील गाव नमुना नं. ३ मध्ये देवस्थान निरंतर व Land Allienation Register मध्ये Entire Village असा नमूद आहे. त्यानुसार दोन्ही गावाच्या सर्व मिळकतीचा देवस्थान इनाम वर्ग ३ मध्ये समावेश होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सदर परिपत्रकामधील निर्देश या दोनही गावांतील मिळकतींना लागू होत असून सदर गावातील मिळकतीचे हस्तांतरण करण्यास सक्षम प्राधिकारी यांच्या पुर्व परवानगीची आवश्यकता आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील याचिका क्र.२७५९/२०११, १३३५३/२०१६, ३५८६६/२०१८ आणि १३४८८/२०१७ मधील दि.२२ जानेवारी, २०२१ च्या आदेशात मा. उच्च न्यायालयाने, रेव्हेन्यू ग्रँट स्वरुपात देवस्थान यांचे नावे असलेल्या जमिनीचे संदर्भात महसूल विभागाकडील दिनांक ३० जुलै, २०१० व दिनांक २९ जून, २०११ रोजीचे दिशानिर्देश लागू होत नसल्याबाबत निष्कर्ष काढले आहेत. मात्र दिनांक ३० जुलै २०१० व दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे परिपत्रकानुसार अंशतः व पुर्णतः सारामाफी असणारे देवस्थानच्या जमिनी बेकादेशीर आणि सक्षम प्राधिकारी अथवा शासनाचे पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण झाले असल्यास कार्यवाही करणेबाबत निर्देश आहेत. यानुसार मौजे फेणे व कणेरी येथील जमिनींबाबत धोरणत्मक निर्णय होऊन, सदरच्या जमिनी इनाम वर्ग-३ मधून मुक्त करणे व दिंडोरी येथील प्रकरणात मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेले आदेश भिवंडी येथील गावांना लागू पडत असल्याने देवस्थान नोंद कमी करणेबाबत शासन स्तरावर छाननी करण्यात येत आहे.

तथापि, सदय:स्थितीत राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरिता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

एच-११३१ -१अ-

*********************

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १६०७**

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, श्री.अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"भंडारा जिल्हयात पोलीस पाटील पदासाठी करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, भंडारा जिल्हयात पोलीस पाटील पदासाठी दोन महिन्यांपूर्वी लेखी व मौखिक परिक्षा घेण्यात येणे, या संदर्भात प्राप्त तक्रारीनुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दि. २० जून २०२३ रोजी जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार तत्कालीन उपविभागीय अधिकारी रवींद्र राठोड, भंडाऱ्याचे तहसीलदार अरविंद हिंगे तसेच पवनीच्या तत्कालीन तहसीलदार नीलिमा रंगारी यांना तपासाअंती प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्याने शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येणे, सदरहू पोलीस पाटील भरतीची प्रक्रिया सुरु असताना पोलीस पाटलांच्या पाच उमेदवारांनी लेखी परिक्षा देण्यात येणे, त्या उमेदवारांचा परिक्षेचा निकाल प्रसिध्द न करताच प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात येणे, नियमानुसार लेखी परिक्षेचा निकाल प्रसिद्ध करूनच एका जागेसाठी जे निकष लावले गेले असतील त्यांनाच बोलविणे आवश्यक होते, परंतु उपविभागीय अधिकारी यांनी ज्यांना लेखी परीक्षेत कमी गुण आहेत त्यांना तोंडी परीक्षेत जास्त गुण देणे व यासाठी त्यांनी प्रत्येक उमेदवाराकडून प्रत्येकी ४ ते ५ लाख रुपये असे जवळपास कोट्यावधी रुपयांची माया जमविल्याचा आरोप असणे, यामध्ये आर्थिक संगनमताने नियुक्तीसाठी झुकते माप दिल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास येणे, यामुळे भंडारा जिल्हयातील पोलीस पाटील पदासाठी झालेल्या भरती प्रकरणाची सखोल चौकशी करुन त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे भंडाऱ्याचे तत्कालीन उपविभागीय अधिकारी श्री. रवींद्र राठोड यांनी त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या सुनावण्या व दिलेले न्यायनिवाडे यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, या सर्वांना बडतर्फ करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

### मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

उपविभाग भंडारा येथे पोलीस पाटील पदभरती -२०२३ अंतर्गत दिनांक १६/०३/२०२३ अन्वये पोलीस पाटील पदभरतीचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानुसार लेखी परीक्षा दिनांक ०८/०४/२०२३ रोजी घेण्यात आली व दिनांक ०९/०४/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता मुलाखतीस पात्र

उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली. दिनांक १०/०४/२०२३ ते १२/०४/२०२३ पर्यंत मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखत प्रक्रीया संपल्यावर दिनांक १२/०४/२०२३ रोजी अंतिम निकाल जाहिर करण्यात येऊन नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले.

परंतु सदर पोलीस पाटील भरती प्रक्रियेसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी भंडारा यांना चौकशी करणेसाठी नियुक्त करण्यात आले.

अपर जिल्हाधिकारी भंडारा यांनी पोलीस पाटील पद भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने भरती प्रक्रिया राबविणेबाबत तसेच या प्रकरणी झालेल्या अनियमिततेकरीता निवड समितीचे अध्यक्ष श्री. रविंद्र राठोड, तत्का. उपविभागीय अधिकारी, भंडारा, सदस्य सचिव श्री. अरविंद हिंगे, तहसिलदार, भंडारा व श्रीमती निलीमा रंगारी तत्का. तहसिलदार, पवनी यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरु करणेबाबतच्या शिफारशीसह अहवाल सादर करण्यात आला.

प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाचे आदेश दिनांक २७/०६/२०२३ अन्वये उक्त संबंधित अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करणेबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०६/२०२३ चे पत्रान्वये सदर पोलीस पाटील भरती प्रक्रिया रद्द करुन नव्याने पोलीस पाटील पद भरतीची प्रक्रिया राबविण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाला पोलीस पाटील भरती प्रक्रियेतील प्राथमिक चौकशी अहवाल व त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत कागदपत्रे जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात आली असुन लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडून याप्रकरणी चौकशी सुरु आहे.

****************************

**लक्षवेधी सूचना १६४६**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. सुनिल भुसारा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

मौजे रायसळ (ता.वाडा, जि.पालघर) येथे गट क्रमांक ४३/२ आणि ४३/५ या जमिनीवर बेकायदा उत्खनन झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये उघडकीस येणे, तहसीलदार वाडा यांनी हे बेकायदा उत्खनन झाल्याने १०५ कोटी रुपयाची दंडात्मक नोटीस मे.जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांना देणे, सदर नोटीसला उत्तर देण्यासाठी संबधितांना तीन आठवड्याची मुदत देणे, असे असतांना अचानक दिलेली दंडात्मक नोटीस ७५ कोटी रुपये कमी करून सुधारित नोटीस फक्त ३० कोटी रुपयाची देणे, पहिल्या नोटीसमध्ये झालेले उत्खनण हे १ लाख ३७ हजार ब्रास दाखवणे आणि अचानक दुसऱ्या नोटीस मध्ये ते ४७ हजार ब्रास दाखविणे आणि त्या अनुषंगाने दंडाची रक्कम कमी करणे, तसेच मौजे रायसळ हे गाव पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने हे उत्खनन करत असतांना पर्यावरण विषयक कोणत्याही परवानग्या न घेतल्याचे निदर्शनास येणे, एकंदर तहसीलदार वाडा यांची कृती ही संशयास्पद असणे, तहसीलदार यांच्या या कार्यवाही मुळे शासनाचे महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे, तसेच गौण खनिज माफिया यांचे मनोबल मध्ये वाढ होणे, यामुळे वाडा तालुक्यात असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे रायसळ ता. वाडा जि.पालघर येथील ग.नं.४३/२ आणि ४३/५ या जमीनीवर अनधिकृतरित्या उत्खनन झालेबाबत तहसिलदार, वाडा दिनांक ०२.०५.२०२२ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीस कोणतेही उत्खनन न करण्यास कळविण्यात आले. तसेच, मंडळ अधिकारी, कंचाड यांनी केलेल्या चौकशीत एकुण १,३७,५९७ ब्रास उत्खनन आढळून आले त्यानुषंगाने तहसिलदार, वाडा यांनी दिनांक २६.०५.२०२२ रोजी रू.१०५,२६,१७,०५०/- एवढया दंडात्मक रकमेची नोटीस संबंधीत कंपनीस बजाविण्यात आली असता, संबंधित कंपनीने नोटीसच्या अनुषंगाने उत्खननाबाबत फेरमोजणी करावी याबाबतची विंनती केली.

मंडळ अधिकारी, वाडा व कोने यांनी संयुक्तपणे केलेल्या पंचनाम्यानुसार ४७,१०६ ब्रास दगड उत्खनन व ९०४८ ब्रास माती उत्खनन केल्याबाबत व त्यापैकी सदर माती उत्खनन करून त्याच ठिकाणी साठा केलेला असल्याबाबत अहवाल तहसिलदार वाडा यांना सादर केला.

मंडळ अधिकारी, कंचाड यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये आणि मंडळ अधिकारी वाडा व कोने यांनी तहसिलदार वाडा यांना सादर केलेल्या अहवाल यामध्ये तफावत असल्याने तहसिलदार, वाडा यांनी मंडळ अधिकारी, कंचाड यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. सदर

अहवालाच्या अनुषंगाने दगड उत्खननाबाबत तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०७.०७.२०२२ अन्वये ४७,१०६ ब्रास बाबत संबंधितास दंडात्मक नोटीस देण्यात आली. सदर नोटीशीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीने सादर केलेला खुलासा विचारात घेवून तहसिलदार, वाडा यांनी दिनांक १०.०८.२०२२ रोजी रु.३०,२९,८५,९००/- एवढया रक्कमेची दंडात्मक नोटीस संबंधीत कंपनीस दिली. तद्नंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्याकडून प्राप्त दोन पत्रानुसार संबंधित कंपनीने मौजे रायसळ येथील ग.नं.४३/१ ते ४३/५ यामधून ९९८१ ब्रास व ५४३८९ ब्रास गौणखनिज परीमाण उपयोगात आणलेले आहे व त्यांबाबतची रक्कम शासन जमा झाली आहे असे नमूद केले होते. ही बाब विचारात घेता तहसिलदार,वाडा यांनी तक्रार अर्ज निकाली काढला.

तथापि, जिल्हाधिकारी, पालघर यांनी याप्रकरणी फेरचौकशी करून आदेश पारित करण्याच्या सुचना तहसिलदार, वाडा यांना देण्यात आल्या त्यांनुषंगाने मौज रायसळ येथील ग.न.४३/१ ते ४३/५ मधील उत्खननाबाबत ईटीएस मोजणी करण्यात आलेली आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचा प्राप्त ईटीएस अहवालानुसार तहसिलदार, वाडा यांनी संबंधितास सुनावणी नोटीस दिली. संबंधिताचे लेखी म्हणने/ पुरावे विचारात घेऊन तहसिलदार, वाडा यांनी दिनांक १४.०७.२०२३ रोजीच्या आदेशान्वये ३४४४२ ब्रास अवैध गौण खनिजबाबत रू.२३,७५,५०,६३५/- एवढया रक्कमेची दंडनीय आकारणी करण्यात आलेली आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र.१६८०

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. जयकुमार गोरे मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"सासपडे व माहेगाव (ता.जि. सातारा) येथे खाजगी मालकीच्या डोंगर क्षेत्रामध्ये खडीक्रेशर व्यवसाय सुरु असणे, प्रचंड प्रमाणात अनधिकृत उत्खनन केलेले असणे, पर्यावरण विभागाची परवानगी नसणे, सदर व्यवसायाच्या धुळीमुळे लगतच्या सर्व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान होत असणे, तसेच सदर व्यवसायाच्या मालाची वाहतूक करणारी जड वाहने गावामधून जात असल्याने सार्वजनिक रस्त्याचे प्रचंड नुकसान होणे, तसेच ग्रामपंचायतीच्या गावच्या पाणीपुरवठा जलवाहिनीचे प्रचंड नुकसान झालेले असणे, सदरच्या वाहन धारकांची मुजोरी वाढत चालली असून नागरी वस्तीमधून सदर वाहने जाताना वेगावर कसल्याही प्रकारे नियंत्रण नसणे, गावातील रस्ता अरुंद असल्याने सतत वाहतूक कोंडी होणे, तसेच व्यवसायाच्या ठिकाणापासुन मेन रोडपर्यंत येणारा रस्ता हा पूर्ण कच्चा व मातीचा असल्याने सदर वाहनामुळे व व्यवसायामुळे प्रचंड धुळ निर्माण होऊन नागरिकाच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने स्थानिक नागरिकांनी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांना निवेदन व तक्रार देऊन कुठलाही कारवाई झालेली नसणे, उक्त गावातील खडीक्रेशर बंद करून त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

---

## श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे सासपडे, ता.जि.सातारा येथे खाजगी मालकीच्या डोंगर क्षेत्रामध्ये एकूण सहा क्रशर व मौजे महिगांव, ता.जावली येथील एक क्रशर असे एकूण सात क्रशर आहेत. महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील तरतुदीनुसार मौजे सासपडे ता.सातारा व मौजे महिगांव ता.जावली येथे जिल्हाधिकरी, सातारा या कार्यालयाकडून खाणपट्टे व तात्पुरते परवाने मंजूर केलेले आहेत.पर्यावरण विभागाची अनुमती प्राप्त झालेनंतरच या कार्यालयाकडून मौजे सासपडे व मौजे महिगांव येथे खाणपट्टे मंजूर केलेले आहेत.

तालुका कृषि अधिकारी, जावळी यांचे अहवालानुसार मौजे मौजे महिगांव ता.जावळी येथील क्रशर व्यवसायाच्या धुळीमुळे लगतच्या सर्व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान होत असलेबाबतची तक्रार/ निवेदन प्राप्त झालेले नाही. मौजे सासपडे, ता. जि.सातारा येथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत सासपडे येथील खडीक्रशर व्यवसायामुळे शेतकऱ्यांचे पिक

नुकसानी बाबतच्या विषयाची तक्रार जिल्हाधिकारी, सातारा यांच्या कार्यालयाकडे दिनांक २१.०२.२०२३ रोजी प्राप्त झाली असून, सदर तक्रार तहसिलदार, सातारा व प्रदुषण नियत्रंण मंडळ, सातारा यांना चौकशीसाठी पाठविण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने उप-प्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ सातारा यांनी मौजे सासपडे येथे कार्यरत असलेल्या ६ क्रशर उद्योगांची पाहणी केलेली असता त्यामध्ये त्रूटी आढळून आलेल्या होत्या. सदर त्रूटींच्या अनुषंगाने दोन स्टोन क्रशरला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दि.१७.०३.२०२० रोजी उद्योग बंद करण्याचे आदेश पारीत करण्यात आले होते. तदनंतर सदर स्टोन क्रशर उद्योगांनी अनुपालन अहवाल सादर केल्यानंतर उद्योग सुरु करणेचे आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित चार क्रशर या उद्योगांची पाहणी करुन आढळलेल्या त्रूटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारणे दाखवा नोटीस दिली असता सदर स्टोन क्रशरकडून नोटीशीस अनुसरुन समाधानकारक उपाय योजना न केल्याने दि.१९.०७.२०२३ रोजी क्रशर बंद का करु नये अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस क्रशरधारकांना बजाविण्यात आली आहे

कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण) जिल्हा परिषद,सातारा यांचे अहवालात मौजे महिगांव येथील गणपतीमाळ ते इजिमा २८ रस्ता ग्रामिण मार्ग १०३ या रस्त्याबाबत स्थानिक ग्रामस्थ व ग्रामपंचायतीची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसून किरकोळ खड्डे वगळता सदरचा रस्ता नमूद केले आहे. मौजे सासपडे व मौजे महिगांव येथील खाणपट्टा क्षेत्रालगत ग्रामपंचायतीच्या गावच्या पाणीपुरवठ्याची कोणतीही योजना कार्यान्वित नसलेने जलवाहिनीचे नुकसान होणेचा प्रश्नच उद्भवत नाही.

उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा यांचेकडून भार क्षमतेपेक्षा जादा मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाते. तसेच वाहन नुतनीकरणासाठी येणाऱ्या वाहनांची मोटार वाहन निरीक्षकाकडून वेग नियंत्रकाची तपासणी करुन संबंधित वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाची कार्यवाही केली जाते. जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा यांचे अहवालानुसार मौजे सासपडे, ता.सातारा येथील गावातील खाणपट्टा व क्रशर चे क्षेत्र लोकवस्ती पासून अंदाजे २-३ कि.मी. लांब असून सद्यस्थितीत खडीक्रशर मशिन बंद होते. तर मौजे सासपडे येथील सभोवतालच्या लोकवस्तीतून कोणत्याही प्रकारची आरोग्य विषयक तक्रार प्राप्त झालेली नाही.

**************

विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. १६९७

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन-२०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. किशोर पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६९७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात सिलींग कायदयाअंतर्गत अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या नविन अविभाज्य शर्तीवरील जमिनी या मुळातच भूमिहिन व प्रकल्पाग्रस्तांना वाटप करण्यात येणे, परंतु बऱ्याच प्रकारच्या नविन अविभाज्य शर्तीच्या जमिनी या वर्ग १ करणेबाबत शासनाने वेळोवळी शासन निर्णय काढून ५० टक्के नजराणा भरुन त्या त्या जमिनी वर्ग १ करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येणे, दिनांक ९ जुलै, २००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे इनाम जमिनीसुध्दा ५० टक्के नजराणा भरुन वर्ग १ करण्यात येणे, सिलींग कायदयाअंतर्गत वाटप झालेल्या जमिनीच नजराणा रक्कम भरून वर्ग १ होत नसणे, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिलींग कायदयांतर्गत वाटप करण्यात आलेल्या नविन अविभाज्य शर्तीवरील जमिनी यांना दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयानुसार सिलींग कायद्याअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या जमिनीबाबत काढण्यात यावा किंवा लागू करण्यात यावा व सिलींग कायदयांतर्गत भूमिहिन व प्रकल्पग्रस्तांना वाटप झालेल्या जमिनींना जुनी शर्त लागू करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

---

**मा. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम,१९६१ हा २६ जानेवारी, १९६१ रोजी लागू करण्यात आला असून, उक्त अधिनियमाच्या कलम २१ अन्वये अतिरिक्त ठरलेल्या जमिनींचे उक्त अधिनियमातील २७ अन्वये भुमीहीन, माजी सैनिक व इतर यांना वाटप करण्याबाबत उक्त कलमातील पोट कलमात ठरवुन दिलेल्या प्राथम्य क्रमानुसार वाटप करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

या ठिकाणी नमुद करण्यात येते की, राज्य शासनाने विविध प्रयोजनार्थ महाराष्ट्र महसूल संहिता-१९६६ खाली वाटप करण्यात आलेल्या भोगवटादार वर्ग-२ च्या शासकीय जमिनींचे धारणाधिकार दि. ०८/०३/२०१९ च्या अधिसुचनेमधील तरतूदीअन्वये विहित अधिमुल्य आकारुन भोगवटादार वर्ग-१ करण्याबाबत तरतूद विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.), १९६१ मधील कलम २७ अन्वये भुमिहीन, माजी सैनिक व इतर यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी या उक्त कायद्यान्वये नियंत्रित झाल्या असल्याने महाराष्ट्र महसूल संहिता-१९६६ खालील जमिनीच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या दि. ०८/०३/२०१९ च्या अधिसुचनेमधील तरतूदी महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.), १९६१ मधील खालील वाटप करण्यात आलेल्या जमिनींना लागु होत नाही.

या पार्श्वभूमीवर नमुद करण्यात येते की, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार नियंत्रित करण्यात आलेल्या जमिनी ह्या देखील भोगवटादार वर्ग-२ च्या ठरत असल्याने अशा जमिनीचा भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्याच्या अनुषंगाने अशा जमिनींबाबत नियमोचित कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

*******

कोटा-एन - ११५८ (८००-८-२३)

लक्षवेधी सूचना क्र.१७३३

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन - २०२३ व्दितीय (पावसाळी) अधिवेशन**
**महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

श्री.नरेंद्र भोंडेकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

" भंडारा जिल्ह्यात दिनांक २८ मे, २०२३ रोजी कोतवाल भरती प्रक्रिया आयोजीत केली असणे, सदर भरती प्रक्रियेची लेखी परिक्षा सुरु असतांना जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपीक श्री.निमेश गेडाम यांचे भ्रमणध्वनीत लेखी परिक्षेसबंधी स्क्रिन शॉट दिसून येणे सदर स्क्रिन शॉट हा लेखी परिक्षेच्या कालावधीतील असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येणे, त्याप्रकरणी भंडारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असणे, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी निवास स्थान रोजंदारी काम करणाऱ्या मुलांना १०० पैकी १०० गुण मिळणे. त्यामुळे सदर घोळ हा जिल्हाधिकारी कार्यालयातून झाला असणे, सदर प्रकरणी शासनाची व परिक्षेच्या उमेदवारंची फसवणूक करण्यात आली असणे, कोतवाल भरती लेखी परिक्षेकरीता मोठ्या प्रमाणात पैशाचा गैरव्यवहार झाल्याचे उघड होणे, सदर परिक्षा रद्द करण्यात आलेली असणे. यामुळे परिक्षेकरीता तयारी करणाऱ्या सक्षम उमेदवारांची घोर निराशा होणे, परिणामी या सर्व प्रकरणात सहभागी वरिष्ठ अधिकारी अजून पर्यंत मोकळे असणे, याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाही बाबत लोकांना शंका निर्माण होवून मोठ्या प्रमाणात जनआंदोलन होण्याची शक्यता निर्माण होणे, परिणामी या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची तसेच रद्द झालेली परिक्षा सत्वर घेण्याची युवकांची सतत होणारी मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमीका. "

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक ०५/०९/२०१३ व शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये भंडारा उपविभाग भंडारा तालुक्यातील रिक्त असलेली १४ कोतवाल संवर्गातील पदे भरण्याकरीता कालबध्द वेळापत्रक निश्चित करुन दिनांक २५/०४/२०२३ च्या जाहीरनाम्याप्रमाणे व शुद्धीपत्रक दिनांक १८/०५/२०२३ नुसार कोतवाल भरती परीक्षेचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला होता.

त्यावेळी भंडारा उपविभागातील पोलीस पाटील भरतीचे अनुषंगाने गंभीर अनियमितता निदर्शनास आली असल्यामुळे तत्कालीन उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचे ऐवजी श्री. आकाश अवतारे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन सामान्य २ यांची नियुक्ती करण्यात आली होती. शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक ०५ सप्टेंबर २०१३ चे सुधारीत नियम व मार्गदर्शक तत्वानुसार कोतवाल भरतीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती असावी असे नमुद असल्याने श्री. आकाश अवतारे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन सामान्य २ यांची जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचे दिनांक २५/०५/२०२३ अन्वये कोतवाल भरती समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

दिनांक २८/०५/२०२३ रोजी आयोजित परीक्षेनंतर श्री. आकाश अवतारे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन यांना श्री. निमेश गेडाम, महसुल सहायक यांनी परीक्षेतील उत्तराचे अनुषंगाने उत्तराचा स्क्रीनशॉट व तक्रार त्यांचे भ्रमणध्वनीवर प्राप्त झाल्याचे निदर्शनास आणून दिले. श्री. अवतारे यांनी ही बाब मा. जिल्हाधिकारी भंडारा यांचे निदर्शनास आणून दिल्यावर त्यांना मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी तात्काळ पोलीस विभागाच्या

सायबर सेलच्या मदतीने शहानिशा करण्याचे निर्देश दिले. याबाबत पोलीस विभागाचे मदतीने श्री. अवतारे यांनी शहानिशा केल्यावर तक्रारीत तथ्य दिसून आल्याने पोलीस स्टेशन, भंडारा येथे दिनांक ०८/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल केला.

पोलीस विभागातर्फे दि. २८/०७/२०२३ रोजी सादर प्रगती अहवालानुसार सदर प्रकरणात अद्यापपर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातील कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचारी यांचा समावेश नाही. आरोपीकडून Any Desk Software च्या मदतीने प्रश्नपत्रिकेची प्रत कार्यालयाच्या बाहेरुन मिळविण्याची कार्यवाही झाल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. अटक झालेल्या आरोपीकडून प्राप्त माहितीनुसार तपास अधिकारी यांचा तपास चालू आहे.

दरम्यान दिनांक ०९/०६/२०२३ रोजीच्या जाहिरनाम्यानुसार भंडारा तालुका कोतवाल पदभरती समितीद्वारे सदर परीक्षा रद्द करण्यात येऊन त्याची प्रसिध्दी करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे भंडारा जिल्हयात कोतवाल पदभरती राबवितांना वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारीची जिल्हा प्रशासनातर्फे कोणताही भेदभाव न करता गांभीर्यपूर्वक दखल घेण्यात आली आहे. भरती प्रक्रियेशी संबंधित व्हीडिओ रेकॉर्डींगही केलेले असल्यामुळे त्याचाही आधार चौकशी करतांना घेण्यात आला आहे. भंडारा तालुक्यातील कोतवाल भरतीमध्ये FIR दाखल करुन ६ आरोपींना अटक झाल्याने व परीक्षा प्रक्रिया रद्द केल्याने तंत्रज्ञानाचा वापर करुन गैरप्रकार करु इच्छिणाऱ्या अशासकीय व्यक्तीवर जरब बसली आहे. ज्या प्रामाणिक उमेदवारांवर अन्याय झाला होता त्यांना, तसेच अभ्यासू उमेदवारांना परत भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे सदर प्रशासकीय कार्यवाहीमुळे सर्वसामान्य जनतेत नाराजी आहे, हे म्हणणे योग्य होणार नाही.

---

लक्षवेधी सूचना क्र.१७७९

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" भिवंडी तालुक्यातील मौजे शिरोळे ग्रामपंचायत हद्दीत बेकायदेशीरपणे सुरु असलेल्या तीन दगडखाणी आणी तीन क्रशर मशीन त्वरीत बंद करुन स्थानिक ग्रामस्थांच्याआरोग्यास होत असलेला त्रास दूर करणेबाबत आणि प्रदूषणामुळे होत असलेले शेतीपिकांचे नुकसान त्वरीत थांबविण्यात यावे यासाठी ग्रामपंचायतीने ठराव करुन तहसिलदार श्री अधिक पाटील यांना दिनांक २५ जुन, २०२३ रोजी लेखी तक्रार निवेदन देऊन मागणी करणे, उक्त मागणीसाठी शिरोळे ग्रामपंचायतीने तहसिल कार्यालयासमोर हजारोंच्या संख्येने तीव्र आंदोलन करण्यात येणे, सदरहू ग्रामपंचायत हद्दीत दगडखाणी व क्रशर मधून निघणाऱ्या धुळीचे साम्राज्य पसरुन येथील हजारो शेतकऱ्यांची शेतजमीन नापीक होऊन येथील ग्रामस्थ नागरिक विशेष करुन विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, अवजड वाहनांमुळे गावातील रस्ते खराब होऊन मोठे खड्डे पडणे व अपघात होणे, ब्लास्टिंगच्या वेळी मोठा आवाज होवून घरांना तडे जाणे, स्थानिक ग्रामपंचायतीने निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई न करता शासनाचे तहसिलदार व संबधितांनी सदर खाण व क्रशर मालकाबरोबर आर्थिक संगनमत केले असल्यामुळेच अद्याप अनधिकृत दगडखाण व क्रशरवर कोणतीच कारवाई न होणे, यामुळे ग्रामपंचायत हद्दीत धुळीमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण निर्माण होऊन पर्यावरणाचा झालेला प्रचंड ऱ्हास, यास्तव तात्काळ सदर तीनही दगडखाणी आणि क्रशर मशीन बंद करुन त्यांना अभय देणाऱ्या तहसिलदार व संबधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

दगडखाणींतुन दगड वाहतूक करणाऱ्या वाहनावर कापड नसल्याने धुळ पसरत आहे, पर्यावरणास व आरोग्यास धोका पोहचत असल्याबाबत तसेच अवजड वाहनामुळे रस्त्यावर खड्डे होत असणे या विषयाबाबत ग्रामपंचायत शिरोळे यांचे निवेदन तहसिलदार, भिवंडी या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

मौजे शिरोळे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथे एकूण तीन क्रशर आहेत सदर गावाच्या क्षेत्रात स्वामित्वधन रक्कम शासन जमा करून उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी २००० ब्रास व तहसिलदार, भिवंडी यांनी १२०० ब्रास दगड या गौण खनिजाचे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अन्वये तात्पुरते (अल्प मुदतीचे परवाने) परवाने निर्गमित केले आहेत.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसीलदार, भिवंडी यांनी दिनांक ०२.०५.२०२३ अन्वये प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले. त्यानुषंगाने उप प्रादेशिक अधिकारी, भिवंडी, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण महामंडळ, कल्याण, जि. ठाणे यांनी दिनांक २४.०५.२०२३ अन्वये संबंधिताना जल (प्रदुषण प्रतिबंध नियंत्रण) अधिनियम, १९७४ व हवा (प्रदुषण प्रतिबंध नियंत्रण) अधिनियम, १९८१ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

तहसिल, भिवंडी कार्यालयास प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने तहसिलदार, भिवंडी सरपंच/उपसरपंच सदस्य ग्रामपंचायत, शिरोळे यांचे समवेत झालेल्या चर्चेत सदरचा खदानीची व गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची दैनंदिन तपासणी करण्यासाठी मंडळ अधिकारी व तलाठी यांचे पथक गठित केले. सदर पथकाने केलेल्या तपासणीमध्ये वाहनावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये रू.०४,६३,२००/- एवढ्या दंडात्मक रकमेची कारवाई करून शासन जमा केले आहेत.

मंडळ अधिकारी, पडघा यांनी दिनांक १५.०५.२०२३, २०.०५.२०२३ व २८.०७.२०२३ रोजी तहसीलदार, भिवंडी यांना सादर केलेला अहवालानुसार सदर क्रशर व खदाणी बंद असल्याचा अहवाल सादर केला असुन सद्यस्थितीत मौजे शिरोळ येथील तीनही क्रशर बंद आहेत.

**************

लक्षवेधी सूचना क्र.९३९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. समाधान अवताडे, विधानसभा सदस्य यांनी नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९३९ पुढीलप्रमाणे आहे.**

"राज्य शासनाने परीक्षांचे योग्य नियोजन करून निकाल वेळेवर लावण्यासंदर्भात सर्व विद्यापीठांना सूचना दिलेली असणे, सदर सूचनेनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर या विद्यापीठातील परीक्षांचे नियोजन अचूक करण्यासाठी येथील प्रभारी कुलगुरू डॉक्टर कामत यांनी वारंवार बैठका घेतल्या असणे, योग्य त्या सूचना देऊन नियोजनासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेले असणे, तरी देखील परीक्षांच्या नियोजनात सातत्याने चुका होत असणे, परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे व वेळेवर परीक्षा न घेतल्यामुळे वेळेवर निकाल लागत नसणे, वारंवार सूचना करून देखील व मेमो देऊन देखील परीक्षांचे नियोजन न करता निकाल लावण्यात दिरंगाई करणाऱ्या परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक, परीक्षा विभागातील उपकूलसचिव यांना प्रभारी कुलगुरू डॉक्टर रजनीश कामत यांनी नोटीस बजावलेली असणे, असे असून देखील सदर जबाबदार अधिकाऱ्यांनी अद्यापपर्यंत सोलापूर विद्यापीठाचे निकाल दिलेले नसणे, निकालात दिरंगाई होत असल्यामुळे याचा प्रतिकूल परिणाम येथील विद्यार्थ्यांवर मोठ्या प्रमाणावर होत असणे, उदाहरणार्थ शासनाने नुकतेच जाहीर केलेल्या तलाठी भरतीसाठी सक्षम व पात्र असताना देखील केवळ निकाल वेळेत न लागल्यामुळे सदर तलाठी भरती पासून सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थी यांना वंचित राहावे लागणार असणे, यामुळे विद्यार्थ्यांकडून त्वरित निकाल लावण्याची व भरतीसाठी १ महिन्याची मुदतवाढ देण्याची मागणी होत असणे, याकरीता शासनाने तातडीने सदर निकाल लावण्याचे आदेश देऊन, विशेष बाब म्हणून तलाठी भरतीत १ महिन्याची मुदतवाढ देऊन निकाल देण्यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासनिक अधिकाऱ्यांवर करावयाची कारवाई व उपाययोजना....."

## मा.श्री.चंद्रकांत पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या ऑक्टो/ नोव्हें २०२२ च्या परीक्षा या २७ मार्च २०२३ रोजी संपल्या होत्या. या परीक्षाचे निकाल मे,२०२३ अखेर पर्यंत जाहीर करण्यात आले. तद्नंतर मार्च/ एप्रिल २०२३ च्या परीक्षा या वेळेतच घेण्याबाबत नियोजन विद्यापीठाकडून करण्यात आले होते. सत्र पुर्ण होऊन BA/B.Com/B.Sc B.Sc. ECS / B.Sc Biotech / B.B.A./ B.C.A. या अभ्यासक्रमाच्या अंतिम यांच्या परीक्षा या दिनांक १९.०६.२०२३ ते दिनांक ०७.०७.२०२३ या कालावधीत घेण्यात आल्या आहेत. विद्यापीठ स्तरावर मा. कुलगुरू यांनी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठांचे अधिष्ठाता व शिक्षक इत्यादी संबंधित घटकासोबत वारंवार बैठकांचे आयोजन करून निकाल विहित वेळेत जाहिर करण्याबाबत सुचना/ निर्देश दिलेले होते. निकाल दिलेल्या मुदतीत जाहीर करण्यासाठी विद्यापीठाने आवश्यक त्या सर्व उपाययोजनांचा वापर करून अंतिम वर्षाच्या जवळपास २० हजार विद्यार्थ्यांच्या अंदाजे ९० हजार उत्तरपत्रिकांचा तपासणी ८ दिवसात पूर्ण करण्यात आली. BA/B.Com/B.Sc B.Sc. ECS / B.Sc Biotech / B.B.A. / B.C.A. या अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांचे निकाल परिक्षा समाप्तीनंतर दि.१६.०७.२०२३ ते दि.१९.०७.२०२३ या कालावधीत 'जाहीर करण्यात आले आहेत.

तलाठी पदाच्या भरतीसाठीची जाहिरात ही दि. २६ जून, २०२३ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर जाहिरातीनुसार सदर पदासाठी विहित कार्यपद्धतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक २६.०६.२०२३ पासून ते दिनांक १७.०७.२०२३ रोजी रात्री २३.५५ पर्यंत असा होता. तथापि, दिनांक १७.०७.२०२३ च्या

शासन पत्रान्वये अर्ज सादर करण्यास दिनांक १८.०७.२०२३ रोजी रात्री २३.५५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलो आहे.

सदर पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराने ही जाहिरात प्रसिद्ध दिनांक २६.०६.२०२३ रोजी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मुंबई यांचेकडील दि. ०१ जुलै, २०१० च्या अधिसूचनेनुसार कोणत्याही शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा अशी शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता लक्षात घेता असे निदर्शनास येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ह्या सत्र संपल्यानंतर दिनांक १९.०६.२०२३ ते दि.०७.०७.२०२३ या कालावधीत पार पडल्या आहेत. जाहिरातीनुसार अंतिम वर्षाची परीक्षा देणारे विद्यार्थी तलाठी पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता पात्र करीत नाहीत. त्यामुळे निकाल वेळेत लागले नाहीत म्हणून विद्यार्थ्यांना तलाठी पदासाठी अर्ज सादर करण्यापासून वंचित रहावे लागले अशी वस्तुस्थिती नाही. विद्यापीठाकडून अंतिम वर्षाचे सत्र संपल्यानंतर विहित कालावधीत परीक्षा घेण्यात आल्या आहेत व परीक्षा संपल्यानंतर विहित कालावधीच्या आत १२ ते १५ दिवसांत निकाल लावण्यात आले आहेत.

************************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**ॲड.आकाश फुंडकर, श्री.रोहित पवार, श्री.सुरेश (राजूमामा) भोळे, श्री.सुनिल प्रभू विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.४९५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"बुलढाणा जिल्हयात राज्याच्या विभागाने अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी महामंडळांतर्गत बांधकाम कामगारांसाठी दिनांक १३ मार्च, २०१८ व दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार व पत्रानुसार जिल्हयातील नोंदीत, अनोंदीत व नाका बांधकाम कामगार लाभार्थ्यांना अटल आहार योजनेंतर्गत मध्यान्ह व रात्रीचे भोजन वाटप योजना सुरु करणे, या योजनेमध्ये ज्या ठिकाणी बांधकामाशी संबंधीत कामे सुरु आहेत तेथे मनरेगा व विटभट्टी कामगार व इतरही कामगार यांना या माध्यमातून दोन्ही वेळचे भोजन देण्याच्या सुचना असणे, परंतु खामगांव तालुका तसेच संपूर्ण बुलढाणा जिल्हयात कामगारांना एका वेळचे भोजन सुध्दा देण्यात येत नसल्याबाबतची गंभीर बाब माहे एप्रिल २०२३ व त्यादरम्यान निदर्शनास आली असणे, याबाबत कामगारांना विचारणा केली असता या योजनेचे भोजन मिळत नसल्याचे कामगारांकडून समजले असणे, सदर योजनेंतर्गत नियमानुसार कामगार अधिकारी बुलढाणा व क्षेत्रीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन उपस्थित कामगारांची पडताळणी करुन मगच भोजन देण्याची आवश्यकता असणे, परंतु बुलढाणा जिल्हयात असे कुठेही निदर्शनास न येणे, यामुळे बुलढाणा जिल्हयामधील हजारो कामगार या योजनेपासून वंचीत राहणे, यामध्ये कामगार अधिकारी व संबंधीत मंडळाने नियुक्त केलेली संस्था यांनी संगनमताने डिसेंबर, २०२१ पासून बोगस देयके तयार केली असणे, बांधकाम कामगार कल्याणकारी महामंडळाने सुध्दा सदर देयकांची मोका तपासणी न करता संबंधीत संस्था कंत्राटदार यांना देयके अदा करणे, त्यामुळे मागील दिड वर्षापासून बुलढाणा जिल्हयात हा गंभीर प्रकार सुरु असणे, यामध्ये आता पर्यंत कोटयावधींचा भ्रष्टाचार झाल्याची शक्यता असणे, या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशीची आवश्यकता असणे, तसेच कामगारांना भोजनापासून वंचीत ठेवणाऱ्या संबंधीत अधिकारी व कंत्राटदारावर कडक कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना"

---

**मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मोठया प्रमाणावर बांधकाम कामगार अन्य राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत. तसेच ग्रामीण भागातूनही बरेच बांधकाम कामगार रोजगार मिळण्यासाठी शहरात येतात. सदर बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी निवासाची पुरेशी व्यवस्था नसते. तसेच, स्वयंपाक करणेही जिकरीचे ठरते. परिणामी आरोग्याचे व कुपोषणाचे प्रमाण दिसून येते व त्याचा परिणाम बांधकाम कामकाजावरही होतो. यास्तव कामगार विभाग व मंडळाने मध्यान्ह योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

कृ.मा.प.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या हिताच्या विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये "मध्यान्ह भोजन" ही योजना सुद्धा राबविली जाते. सदर योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना विनाशुल्क दोनवेळचे जेवण पुरविण्यात येते. सदरची योजना राज्यामध्ये टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली असून, बुलढाणा जिल्ह्यामध्ये सदर योजना माहे मे, २०२२ पासून सुरु करण्यात आली आहे. तत्कालीन परिस्थिती विचारात घेवून मंडळाअंतर्गत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसोबतच, अनोंदीत बांधकाम कामगार, मनरेगा, विटभट्टी कामगार व इतरही कामगारांना या योजनेच्या माध्यमातून दोन वेळचे भोजन पुरविण्यात आलेले आहे.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये बांधकाम ठिकाणावरील कंत्राटदार तसेच, ग्रामसेवक, सरपंच, रोजगार सेवक, कामगार संघटना यांनी उपलब्ध करून दिलेल्या बांधकाम कामगारांच्या यादीच्या आधारे भोजनाचा पुरवठा करण्यात आला आहे. माहे एप्रिल व त्या दरम्यान खामगाव तालुक्यामध्ये एकूण ९८ साईटवर प्रतिदीन सरासरी ८३४५एवढ्या कामगारांना व बुलढाणा जिल्ह्यात एकूण ६३७ साईटवर प्रतिदिन सरासरी ५७,८२१ एवढ्या कामगारांना मध्यान्ह व रात्रीचे भोजन वितरीत करण्यात आलेले आहे. जे बांधकाम कामगार स्वत:चे भोजन सोबत आणतात व भोजनाची मागणी करीत नाहीत त्यांना भोजनाचा पुरवठा करण्यात येत नाही, भोजनाचा पुरवठा बांधकाम कामगारांच्या मागणीच्या आधारे करण्यात येतो.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या निर्देशानुसार कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठा करण्याकरिता नियुक्त संस्थेने सर्वेक्षणाअंती निवड केलेल्या बांधकामाच्या ठिकाणावरील नोंदीत व अनोंदीत कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठ्याबाबत संबंधित विकासक/ठेकेदार/आस्थापनाचे सहमती पत्र प्राप्त करुन जिल्हा कार्यालयास सादर केलेल्या कामगारांच्या यादीस जिल्हा कार्यालयामार्फत मंजूरी देण्यात येते. तद्नंतर नियुक्त संस्थेमार्फत कामगारांना भोजन वितरीत केले जाते.

त्यानुसार सदरचे भोजन मागणीनुसार खामगाव तालुका तसेच संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात नोंदित, अनोंदित बांधकाम कामगार, विटभट्टी कामगार, नाक्यावरील बांधकाम कामगार यांना पुरविण्यात आले आहे. कंत्राटदाराने सादर केलेली देयके नियमानुसार तपासणीकरून विभागीय कार्यालयाने त्यांचे शिफारशीसह मंडळास मंजुरीसाठी सादर केलेली आहे. यामध्ये कोणताही गैरप्रकार अथवा भ्रष्टाचार झालेला नाही.

---

K-1166-1A

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. विकास ठाकरे. श्री. सुनिल केदार, श्री. कुणाल पाटील, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिद्दिकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. सुरेश वरपुडकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१२५० पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाद्वारे राबविण्यात येणारी भोजन योजना ही केवळ या मंडळामध्ये असलेल्या पैशाची लूट करण्यासाठी चालविलेली योजना असून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये या योजनेतून फक्त ठेकेदार आणि अधिकारी यांनाच फायदा होणे, गडचिरोली हा अतिदुर्गम व नक्षलग्रस्त जिल्हा असून सदर जिल्हयात अजूनही खेड्यापाड्यात जाण्यासाठी दर्जेदार रस्ते नसणे, बेस्ट किचन नावाचा कंत्राटदार मध्यान्ह भोजन पुरवठा करणे, ज्याची किचन चंद्रपूरला आहे आणि चंद्रपूर वरून तो भोजन घेऊन गडचिरोली जिल्हयामध्ये वाटप करत आहे परंतु ज्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ते नाहीत अशा ठिकाणी कंत्राटदार भोजन पुरविणे, असे खोटी देयके सादर करीत असल्याचे दिसून येणे, गडचिरोली जिल्ह्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये सदरहू कंत्राटदाराने १ कोटी ६१ लाख रुपयांचे देयक सादर करून पैसे घेणे, परंतु ज्या कामगारांना मध्यान्ह भोजन दिले, त्यांची सादर केलेली यादी बनावटी, खोटी असल्याचे निष्पन्न होणे, सरकारी कामगार अधिकारी (गडचिरोली) व अप्पर कामगार आयुक्त (नागपूर) यांनी याबाबत कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता सदर ठेकेदाराला देयकाची देय रक्कम मंजूर केलेली असणे, या प्रकरणी दखल घेऊन एसआयटी गठीत करून भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची आवश्यकता असणे, परंतु वारंवार लक्ष वेधूनही शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे विभागातील नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मोठया प्रमाणावर बांधकाम कामगार अन्य राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत. तसेच ग्रामीण भागातूनही बरेच बांधकाम कामगार रोजगार मिळण्यासाठी शहरात येतात. सदर बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी निवासाची पुरेशी व्यवस्था नसते. तसेच, स्वयंपाक करणेही जिकरीचे ठरते. परिणामी आरोग्याचे व कुपोषणाचे प्रमाण दिसून येते व त्याचा परिणाम बांधकाम कामकाजावरही होतो. यास्तव कामगार विभाग व मंडळाने मध्यान्ह योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालय, गडचिरोली कार्यालयात एकूण

३६,२१९ बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत नोंदीत, अनोंदीत व नाका बांधकाम कामगार लाभार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

अटल आहार योजनेंतर्गत मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजनाची गडचिरोली जिल्हयामध्ये माहे नोव्हेंबर २०२१ पासून अंमलबजावणी सुरू आहे. अटल आहार योजनेकरीता प्रथमत: ज्या ठिकाणी बांधकामाशी संबंधीत कामे सुरू आहे, तेथील संबंधित कंत्राटदारामार्फत तसेच २१ उद्योगातील बांधकाम करणाऱ्या कामगारांकरीता व विटभट्टी कामगारांकरीता संबंधित विटभट्टी ठेकेदारांमार्फत सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली कार्यालयास कामगारांच्या यादीसह निवेदन सादर करण्यात येते. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने कामाच्या ठिकाणी क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून प्रत्यक्ष भेट देवून काम सुरु असल्याची व उपस्थित कामगारांची पडताळणी करण्यात येते. त्यानुसार कामाच्या ठिकाणी मध्यान्ह व रात्रीचे भोजन पुरविण्याकरीता गडचिरोली कार्यालयाव्दारे मंडळाने नियुक्त संस्थेला नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेसह रात्रीचे भोजनाचा लाभ देण्याकरिता शिफारस करण्यात येते.

मंडळाव्दारे ठरवून दिलेल्या रुपये ६२.७०/- प्रति लाभार्थी (वस्तू व सेवा करांसह) मध्यान्ह भोजन दरानुसार देयके नियुक्त संस्थव्दारे दरमहा सदर कार्यालयास सादर केले जातात. मंडळाव्दारे नियुक्त संस्थेमार्फत गडचिरोली कार्यालयास देयके प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यालयाव्दारे शिफारस करण्यात आलेल्या बांधकामाचे ठिकाणी व भोजन वाटप झालेल्या एकूण कामगार संख्या यांची पडताळणी करून देयके मंजूरी करीता मंडळास शिफारस करण्यात येते.

गडचिरोली जिल्हयात माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ मासिक सरासरी २,७०,५१९ इतक्या बांधकाम कामगारांनी घेतला असून त्यासाठी पुरवठादार संस्थेस अदा केलेली सरासरी रक्कम रु.१,६९,६१,५८७/- इतकी आहे. तसेच माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत रात्रीच्या भोजनाचा लाभ मासिक सरासरी २,४४,३५२ इतक्या बांधकाम कामगारांनी घेतला असून त्यासाठी पुरवठादार संस्थेस अदा केलेली सरासरी रक्कम रु.१,५३,९९,६८१/- इतकी आहे.

मध्यान्ह भोजन योजनेतील अन्न पदार्थाची गुणवत्ता चांगली असावी, या करीता सरकारी कामगार कार्यालय, गडचिरोली कार्यालयाव्दारे शासकीय/NABL या नामांकित प्रयोगशाळेकडून महिन्यातून किमान एकदा तपासणी करण्यात येते.

शासनाच्या दिनांक ०४.०५.२०२३ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार दिनांक ०१.०७.२०२३ पासून केवळ नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना भोजन वितरण कार्ड (RF Based Card) चा वापर करून मध्यान्ह भोजन वितरीत करण्याकरीता शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०१.०७.२०२३ पासून फक्त नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेसह रात्रीचे भोजनाचा लाभ वितरण करण्यात येत आहे.

सदर योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार, भ्रष्टाचार किंवा घोटाळा झालेला नसून वरील विषयाबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही कामगार संघटना व कामगारांची तक्रार गडचिरोली कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१३५१

ॲड.आकाश फुंडकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१३५१ पुढीलप्रमाणे आहे.

"शासकीय धान्य गोदामावरील हाताळणुक कामावरील हमाल कामगारांच्या सन २००८ ते २०१८ पर्यंत संघर्ष हमाल कामगार सहकारी संस्था खामगांव जि. बुलढाणा ही संस्था कार्य करीत असणे, दिनांक १८ मे, २०१८ पासून उपरोक्त संस्थेस शासकीय धान्य गोदामावरील हाताळणुक कामावरील हमाल कामगारांचा कत्राट मिळाला नसणे, तत्पुर्वीच्या सन २००४ शासन निर्णयानुसार संघर्ष हमाल कामगार सहकारी संस्था, खामगांव जि. बुलढाणा या संस्थेने मजूरीवरीची लेव्ही व भविष्य निर्वाह निधीची रक्कम माथाडी मंडळाकडे जमा केली असणे, याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांनी अध्यक्ष अकोला- वाशिम- बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षीत कामगार मंडळ, अकोला यांना सन २००८ ते २०१६, २०१६-२०१९ व २०१९-२०२० पर्यंतची प्रलंबीत लेव्हीसह रु.४१,३३,३६७/- एवढा रकमेचा भरणा केला असल्याचे पत्र दिले असणे, त्यापैकी उपरोक्तने रु.६,१४,४२७/- एवढया रकमेच्या लेव्हीचा भरणा केला असणे, असे असतांनाही सहाय्यक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षीत कामगार मंडळ, अकोला हे उपरोक्त काळात रोखीने वाटली गेलेली मजूरीचा भरणा करण्याचा तगादा लावत असणे, वास्तविक पहाता लेव्हीची रक्कम भरण्यात आली असताना उपरोक्त संस्थेने निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ नये यासाठी उपरोक्त संस्थेस विधीग्राहय प्रमाणपत्र देण्यास सहाय्यक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षीत कामगार मंडळ, अकोला हे टाळाटाळ करीत असणे, उपरोक्त संस्थेस सन २०१८ चा कंत्राट उपरोक्त संस्थेस मिळाला नसल्याने शासन निर्णय दिनांक ८ मे, २०१८ मधील परिशिष्ट अ मुददा क्र. ४ नोंदीत हमाल कामगारांना रोखीने हमाली अदा केली जाणार नसल्याचा नियम लागू होत नसणे, तसेच शासनाचा दिनांक ६ मार्च, २०२३ च्या शासन निर्णय कंत्राट १२१/ प्र.क्र.०८/ना.पु. १६-अ च्या १४ मधील १४.५ च्या अ.क्र. ८ नुसार ज्या जिल्ह्यामध्ये मजुरी रोख दिली जाणे, अशा जिल्ह्यांच्या बाबतीत मजुरीवरील संपुर्ण लेव्ही व थकीत महागाई निर्देशांक वाढ प्राप्त झालेली असल्यास त्यावरील संपुर्ण लेव्ही माथाडी मंडळात भरणा केल्याबाबतचे माथाडी मंडळाचे विधीग्राहय प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता, परंतु मागील अनेक वर्षापासून सदरील रक्कमेचा भरणा करूनदेखील त्यांना विधीग्राहय प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

संघर्ष हमाल कामगार संस्था ही माथाडी अधिनियम, १९६९ मधील तरतुदीनुसार दि.१७.०६.२००६ रोजी अकोला-वाशीम-बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे नोंदीत आहे. सदर संस्थेस २००६ साली बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव व शेगांव या दोन

तालुक्यातील शासकीय गोदामातील धान्य हाताळणीचे कंत्राट मिळाले होते. सदर संस्थेस अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दि.०४.०७.२००८ व दि.१२.०९.२०१४ मधील तरतुदीनुसार खामगाव व शेगाव या दोन तालुक्यातील शासकीय गोदामातील धान्य हाताळण्याच्या कंत्राटास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार सदर संस्था नोव्हेंबर, २०२० पर्यंत शासकीय गोदामातील अन्न धान्य हाताळणीचे काम करत होते.

अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दि.३०.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये अन्नधान्य हाताळणुकीचे काम करणाऱ्या हमाल कामगारांना अदा करावयाच्या लेव्हीच्या परिगणनेबाबत पध्दतीमध्ये अंशत: बदल केला आहे. त्यानुसार शासकीय गोदामामध्ये अन्नधान्य हाताळणुकीचे काम करणाऱ्या हमाल कामगारांना विहीत लेव्हीची रक्कम जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी परस्पर माथाडी मंडळामध्ये जमा करणे बंधनकारक केले आहे. सदर शासन निर्णयापूर्वी संबंधित हमाल कंत्राटदार संस्थेमार्फत मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात जमा केली जात होती. त्यामुळे लेव्हीची रक्कम जिल्हा पुरवठा अधिकारी व मजुरीची रक्कम संबंधित संस्थेने भरणे आवश्यक आहे.

दरम्यानच्या कालावधीत जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्याकडून सदर जिल्हयातील एकूण ८ हमाल कामगार सहकारी संस्थांची सन २००८ ते नोव्हेंबर २०२० या कालावधीतील महागाई निर्देशांक मजुरी वाढ फरकावरील ३० टक्के लेव्हीची रक्कम रु.४१,३३,३६७/- मंडळात जमा केली आहे.

तसेच सन २००८ ते नाव्हेंबर २०२० या कालावधीमधील बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव व शेगाव येथील माथाडी कामगारांची महागाई निर्देशांक वाढ (फरक) मजुरी ही सुमारे रु.२०,४८,०९०/- एवढी रक्कम संघर्ष हमाल कामगार सहकारी संस्थेने मंडळामध्ये भरणे अपेक्षित होते. त्याबाबत मंडळाने दि.२४.०३.२०२३ रोजीच्या पत्रानुसार सदर संपूर्ण रक्कम मंडळात जमा करण्याबाबत संस्थेस कळविले होते. त्यास अनुसरुन सदर संस्थेने शासकीय गोदामावरील नोंदीत हमाल माथाडी कामगारांना त्या-त्या कालावधीतील हमाली मजुरी महागाई निर्देशांकाचे रोखीने वाटप केल्याचे मंडळास कळविले असून, त्यासाठी संस्थेने कामगारांकडून लिहुन घेतलेले प्रतिज्ञापत्र मंडळास पुरावा म्हणून सादर केले आहे. तथापि, प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले असता, सदर प्रतिज्ञापत्रे ही चुकीची व शासन आणि मंडळाची दिशाभूल करणारी असल्याचे संबंधित माथाडी मंडळाने कळविले आहे.

खामगाव व शेगाव येथे शासकीय गोदामात काम करणाऱ्या माथाडी कामगारांनी संघर्ष हमाल कामगार सहकारी संस्थेद्वारे त्यांची दिशाभूल करण्यात आली असून, त्यांना वाढीव महागाई निर्देशांकानुसार मजुरीची रक्कम मिळाली नसल्याची तक्रार अकोला-वाशीम-बुलडाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे केली आहे.

तसेच एप्रिल, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कोरोना कालावधीतील प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत (PMGKY) हमाल कामगारांच्या मजुरीची रक्कम संघर्ष हमाल कामगार सहकारी संस्थेद्वारे मंडळात जमा करण्यात आली नसून, सदर रक्कम मंडळात जमा करण्याबाबत माथाडी मंडळाद्वारे

दि.२२.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कंत्राटदार संस्थेस कळविण्यात आले आहे. तथापि, सदर रक्कम ही संस्थेकडून मंडळात अद्यापही जमा करण्यात आलेली नाही.

शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणुकीसाठी हमाल कंत्राटदार सस्थांची नेमणुक ही खुल्या ई-निविदा प्रक्रियेद्वारे जिल्हाधिकारी यांच्यामार्फ़त केली जाते. ज्या संस्था सन २००८ किंवा त्यापासून पुढे शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणुकीचे काम करत आहेत, अशा संस्थांनी पूर्वीच्या कामाच्या ठिकाणची मजुरी व त्यावरील संपूर्ण लेव्ही, थकीत महागाई निर्देशांकानुसार वाढ प्राप्त झालेली असल्यास त्यावरील लेव्ही या संस्थांनी माथाडी मंडळात भरणा करणे आवश्यक आहे. तसा भरणा केल्यानंतरच माथाडी मंडळाकडून या संस्थांना विधीग्राह्य प्रमाणपत्र देणे शक्य होते.

संघर्ष हमाल कामगार संस्थेने मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार महागाई निर्देशांक मजुरी वाढ फरक व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना (PMGKY) संपूर्ण मजुरीची रक्कम मंडळाकडे रीतसर भरणा केल्यानंतरच सदर संस्थेस मंडळाकडून विधीग्राह्य प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

****************

**नगर विकास विभाग**

**लक्षवेधी सूचना क्र.१२६५**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री.राहूल पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१२६५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"परभणी महानगरपालिकेने महाराष्ट्र औद्योगिक विकास क्षेत्र (एमआयडीसी), परभणी यातील सर्व उद्योजकांना चुकीच्या पध्दतीने सामान्य कर, साफसफाई कर, शिक्षण, रोजगार हमी, अग्निशमन, वृक्ष कर इत्यादी कर वसूलीच्या नोटीसा देणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या एमआयडीसी कायदा १९६१ औद्योगिक क्षेत्रापैकी एक असून एमआयडीसी हे वेगळे प्राधिकरण असणे, परभणी औद्योगिक वसाहत ही वरील कायद्याप्रमाणे सन १९७५ यावर्षी स्थापन झालेली असणे, सर्व उद्योजक महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, परभणी येथील औद्योगिक वसाहत हे ९५ वर्षाच्या भाडे करारावर घेतलेले असून सदर भूखंडावर गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी उद्योग उभारणी केलेली असणे, महत्वाचे म्हणजे वरील भूसंपादनाची संपूर्ण कार्यवाही ही विशेष भूसंपादन अधिकारी परभणी यांच्यामार्फत पूर्ण होऊन सदर क्षेत्राचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास महाराष्ट्र शासनाकडून दिनांक ६ मे, १९७५ रोजी प्राप्त झालेला असणे, औद्योगिक क्षेत्रातील सर्व रस्ते, पाणी पुरवठा, रस्त्यावरील दिवाबत्ती ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत असणे, त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील सर्व उद्योजक दरमहा सेवाकर, पाणीपट्टी, भाडेपट्टा तसेच बांधकाम परवानगी शुल्क इत्यादी एमआयडीसीकडे भरणा करीत असणे, असे असतांनाही परभणी महानगरपालिकेले अधिकार क्षेत्रात येत नसतांना मनमानी व चुकीच्या पध्दतीने परभणी औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना नोटीसा देणे, त्यामुळे शासनाने यासर्व प्रकरणाची चौकशी करुन परभणी महानगरपालिकेने महाराष्ट्र औद्योगिक विकास क्षेत्र, परभणी येथील उद्योजगांना दिलेल्या मालकत्ता कराच्या सर्व नोटीसा रद्द करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७, १२८,१२८(अ), १२९ ते १३२ नुसार शहरातील इमारती व जमिनी यांवर मालमत्ता कर आकारण्यात येतो. मालमत्ता करामध्ये पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार कर इत्यादी करांचा समावेश होतो. दि.०१.११.२०११ रोजी परभणी नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतरण झाले आहे. यामुळे अधिनियमातील तरतूदीनुसार मालमत्ता कराची महानगरपालिकेद्वारे आकारणी व वसूली करण्यात येते.

राज्यात महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या सर्व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रामधील सर्व मालमत्तांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता

कराची आकारणी करून कर वसुली केली जाते. याप्रमाणे परभणी महानगरपालिका परिक्षेत्रात येणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रामधील मालमत्तांना मालमत्ता कर आकारणी लागू करण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून भूखंडाचे वाटप करण्यात आलेल्या उद्योजकांना रस्ते, पाणीपट्टी, दिवाबत्ती इत्यादी साठी रु.१.५०/ प्रति चौ.मी. प्रति वर्ष या दराने सेवाशुल्काची देखभाल दुरुस्ती करिता आकारणी केली जाते.

परभणी महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर सन २०१७-१८ या वर्षात महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करून मालमत्ता कराचे फेरमुल्यांकन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील सर्व मालमत्तांच्या मालमत्ता कराचे मागणी देयक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या नावे देण्यात आले. याबाबत उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उप विभाग, परभणी यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील मालमत्ता / भुखंड धारकांना स्वतंत्र मागणी देयक देण्याबाबत दि.३१.०१.२०१८ च्या पत्रान्वये महानगरपालिकेस सूचित केले. या सूचनेनुसार परभणी शहर महानगरपालिकेने वैयक्तिक स्वरुपात विशेष नोटीस बजावून, मुदतीत प्राप्त आक्षेपांवर सुनावणी घेऊन, नियमानुसार मागणी देयके दिली. या क्षेत्रातील श्रीकृष्ण ऑईल मील व महाराष्ट्र स्टेट को. ऑफ मार्केटिंग फेडरेशन यांनी त्यांच्याकडील मार्च, २०२३ पर्यंतच्या मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे..

परभणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील काही व्यावसायिक मालमत्ताधारकांनी महानगरपालिकेच्या विरोधात मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ११४२७/२०२२ दाखल केली होती. परंतु, मा. उच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४०६ मधील तरतूदीनुसार खंडपीठाने मालमत्ता कर भरणा करण्याचे संबधितांना दि.०३.०४.२०२३ रोजी आदेशीत केले आहे.

याच विषयासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयातील Civil Appeal No (s). ७३१८/२०१० Small Scale Entrepreneurs Association & Ors. V/S The State Of Maharashtra & Ors, या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १९.०४.२०२३ रोजी निर्णय पारीत केला असून त्याअन्वये मा. न्यायालयाने मालमत्ता कर भरणा करण्यापासून सूट देण्याकरिता कोणतीही स्थगिती दिलेली नसतानाही नसतानाही मालमत्ताधारक / याचिकाकर्ता यांनी महानगरपालिकेस देय कराचा भरणा केला नाही, याचिकाकर्ता यांनी अनेक वर्षापासून मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही याबाबीची गंभीर नोंद घेवून मा.न्यायालयाने महानगरपालिकेस संबंधितांकडून मालमत्ता कराचा भरणा करुन घ्यावा, प्रसंगी जप्ती संदर्भातील तरतूदीचा अवलंब करावा, असेही आदेश दिले आहेत.

परभणी महानगरपालिका परिक्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रामध्ये रु.१७ कोटी, ४० लाख, ५४ हजार, ८५०/- इतकी मालमत्ता कराची थकबाकी आहे. परभणी शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील मालमत्ताधारकांकडील या मालमत्ता कराची वसुली होणे आवश्यक आहे.

***********

विधानसभा नियम १०५ अन्वये सूचना क्रमांक - १२२१

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.राजेश एकडे, श्री.बळवंत वानखडे, श्री.अमित झनक, श्रीमती सुलभा खोडके, श्री. विकास ठाकरे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"बुलढाणा जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका मदतनीस दहा जुलै २०२३ रोजी मागणी दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या समोर निषेध आंदोलन केलेले असणे, त्यामध्ये जानेवारी २०२३ पासून आशा गटप्रवर्तकांना राज्य शासनाकडून मिळणारे वाढीव मानधन गेल्या सहा महिन्यापासून मिळालेले नसणे, जानेवारी ते मार्च पर्यंत राज्य शासनाकडून निधीची तरतूद असताना देखील बुलढाणा जिल्ह्यातील आशा सेविकांना व गटप्रवर्तकांना मानधन वाढीपासून वंचित ठेवलेले असणे, बुलढाणा जिल्ह्यातील आशा वर्कर्सला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदल्यात मिळणाऱ्या पेमेंट शीट कुठेच दिल्या जात नसल्यामुळे अनेक अशा वर्कर्सना कामाचा पूर्ण मोबदला मिळतो किंवा नाही याबाबत त्यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, एकीकडे प्रचंड महागाई वाढत असताना गेल्या पाच वर्षात पोषण आहाराच्या व इंधनाच्या आहारात शासनाने कुठलीही वाढ केलेली नसणे, डिजिटल कारभाराच्या नावाखाली पोषण ट्रॅकर नावाचा एक सदोष ॲप सेविकांच्या माथी मारलेला असणे, ॲपसी सुसंगत मोबाईल शासनाने दिलेला नसणे, सर्वोच्च न्यायालयाने सव्वा वर्षापूर्वी ग्रॅज्युटी बाबत सकारात्मक निकाल देऊनही त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासन उदासीन असणे, शासनाच्या अनास्थेमुळे अंगणवाडी कर्मचारी व आशा गटप्रवर्तक संतप्त झालेले असणे, या सर्व मागण्यांच्या संदर्भात आशा सेविका अंगणवाडी सेविका गटप्रवर्तक यांनी जिल्हा परिषदेसमोर निषेध व्यक्त केलेला असणे, शासनाप्रति अंगणवाडी सेविका, मदतनीस व गटप्रवर्तक यांचे मध्ये प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत राज्यात १०४ नागरी प्रकल्प व ४४९ ग्रामीण प्रकल्प असे एकुण ५५३ प्रकल्प कार्यान्वित असून त्याअंतर्गत अंगणवाडी सेविका यांची- ९७४७५ पदे, अंगणवाडी मदतनिस यांची- ९७४७५ पदे व मिनी अंगणवाडी सेविका यांची -१३०११ पदे अशी एकुण २,०७,९६१ पदे मंजूर असून सदर पदे मानधनी तत्वावरील आहेत. अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यास व सदर वाढ दिनांक १ एप्रिल,२०२३ पासून लागु करण्यास शासन निर्णय दिनांक ३.४.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे जुलै,२०२३ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून माहे ऑगस्ट, २०२३ चे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील आशा सेविका व गटप्रवर्तक यांना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मंजूर दरानुसार माहे जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ पर्यंतच्या कालावधीतील राज्य शासन मोबदला अदा करण्यात आलेला आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १०.४.२०२३ अन्वये आशा सेविका व गट प्रर्वतक यांना राज्य शासनाच्या निधीमधून अदा करण्यात येणाऱ्या मोबदल्यामध्ये दरमहा रुपये १५००/- एवढी वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार आशा सेविका व गटप्रर्वतक यांना माहे एप्रिल ते जून,२०२३ पर्यंतचा मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व आशा सेविका व गट प्रर्वतक यांना वैद्यकीय अधिकारी यांचे स्तरावरुन वेतन चिठ्ठी देण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पूरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ५०:५० असे आहे. त्या अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना

घरपोच आहार (Take Home Ration) तर ३ वर्ष ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार नियमित देण्यात येत आहे. ज्या ठिकाणी महिला बचत गट/महिला मंडळ यांनी आहार पुरवठा करण्याचे काम सोडून दिले आहे, त्या ठिकाणी अंगणवाडी केंद्रांना कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येतो व अंगणवाडी सेविकांकडून आहार शिजवून वितरित करण्यात येतो. सन २०१७ पूर्वी गरम ताजा आहारासाठी प्रति लाभार्थी प्रति दिन दर ६ रुपये होता. त्यापैकी ५.५० रुपये कच्चे धान्य व किराणा खरेदीसाठी तर ५० पैसे इंधन खर्च आणि आहार शिजवण्यासाठी दिले जात होते. सन २०१७ नंतर गरम ताजा आहारासाठी प्रति लाभार्थी प्रति दिन ८ रुपये दर करण्यात आला. त्यापैकी ७.३५ रुपये कच्चे धान्य,किराणा खरेदीसाठी तर ६५ पैसे इंधन खर्च आणि आहार शिजवण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत. सदर खर्चाची रक्कम अंगणवाडी सेविकांना नियमीतपणे अदा करण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत पुरक पोषण आहाराचे दर केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येतात व ते सर्व राज्यांना सारखेच असतात. सद्यस्थितीत लागू असलेले दर केंद्र शासनाने सन २०१७ मध्ये निश्चित केले आहेत. पोषण आहाराच्या दरांमध्ये वाढ करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. त्यानुसार केंद्र शासनाने दरवाढी बाबत निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करुन आहार शिजविणे व इंधन खर्चामध्ये वाढ करण्यात येईल.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेमधील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युईटी देण्याबाबतच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने अद्याप मार्गदर्शक सूचना दिलेल्या नाहीत. केंद्र शासनाचे यासंदर्भात पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. तथापि, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी कर्मचा-यांना सेवानिवृत्ती / मृत्यू/ राजीनामा इ. प्रकरणी LIC मार्फत एकरकमी लाभ देण्याची राज्य शासनाची योजना आहे. त्यामध्ये अंगणवाडी सेविकेला रु. १ लाख पर्यंत तर मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना रु. ७५ हजार पर्यंत लाभ देण्यात येतो.

सन २०१८-१९ पासून केंद्र पुरस्कृत पोषण अभियान या कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुषंगाने सदर अभियानांतर्गत Information Computer Technology enabled Real Time Monitoring (ICT-RTM) या उपक्रमाअंतर्गत सन २०१८-१९ मध्ये केंद्र शासनाने विहित केलेल्या मर्यादेत व स्पेसिफिकेशन नुसार अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका व तांत्रिक मनुष्यबळ यांचेकरिता मोबाईल संच उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर मोबाईल मध्ये Common Application Software (CAS) द्वारे लाभार्थ्यांची माहिती भरण्यात येत होती. तद्नंतर केंद्र शासनाने "पोषण ट्रॅकर" हे ॲप विकसित केले. सदर ॲपमध्ये मराठी भाषेमधून माहिती भरण्याची सूविधा देण्याबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटनांकडून मागणी करण्यात येत होती. त्यानुषंगाने केंद्र शासनाने सदर ॲपमध्ये इतर स्थानिक भाषांसह मराठी भाषेतून माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यानुसार आता केवळ लाभार्थ्याचे नाव व आधार क्रमांक इंग्रजी भाषेत नमूद करावा लागतो. सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मोबाईलची वॉरन्टी मे,२०२१ मध्ये संपलेली असल्याने राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांना मोबाईल संच उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या GeM पोर्टलवर मोबाईल फोन खरेदी संदर्भात निविदा प्रकाशित करण्यास मान्यता दिलेली आहे . त्यानुसार निविदा प्रकाशित करण्यात आलेली असून शासनाच्या दिनांक १.१२.२०१६ रोजीच्या खरेदी धोरणानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

**********